सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
धाराशिव | मंगळवार, ३० डिसेंबर २०२५ | वर्ष ३ रे अंक ३०० | पाने १२ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com




## विचारपुष्प



निराशा आणि भय तसेच जगाला वाचवण्याची इच्छा व त्यासाठी झालेले सर्व प्रयत्न आणि चळवळी या कितीही उदात्त आणि मानवतावादी असल्या तरी, मृत्यू आणि विनाशाचा दिवस टाळू शकणार नाहीत. केवळ ईश्वराला दिलेली शाश्वत हाक आणि ईश्वराच्या इच्छेला व उद्देशाला शरण जाऊन केलेली प्रार्थना व ध्यानधारणा यांचीच आवश्यकता आहे. तरच तो दयाळू परमेश्वर प्रकाशाचा मार्ग दाखवेल.

**- दादाराव परमार्थ**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

# ७९ हजार कोटींच्या संरक्षण खरेदीस मंजुरी

## अधिग्रहण समितीच्या बैठकीत निर्णय



**नवी दिल्ली, २९ डिसेंबर**

लष्करी युद्धसज्जतेला बळकटी देण्यासाठी ७९ हजार कोटी रुपयांच्या निधीतून लांब पल्ल्यावर मारा करणारे रॉकेट्स, क्षेपणास्त्रे, रडार यंत्रणा आदी लष्करी साहित्य खरेदी करण्यासाठी संरक्षण मंत्रालयाने सोमवारी मंजुरी दिली.

संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संरक्षण अधिग्रहण समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. लष्कराच्या तोफखाना रेजिमेंटसाठी आत्मघाती ड्रोन्स खरेदी करण्यास बैठकीत मंजुरी देण्यात आली. या बैठकीत भारतीय लष्करासाठी कमी उंचीवरील लक्ष्य शोधणारे हलके रडार, पिनाका रॉकेट यंत्रणा आणि एकात्मिक ड्रोन शोध आणि प्रतिबंध यंत्रणा (एमके-२) घेण्यासही मंजुरी देण्यात आली, अशी माहिती संरक्षण मंत्रालयाने दिली.

आत्मघाती ड्रोन्स धोरणात्मक लक्ष्यांवर अचूक हल्ला करतील, तर कमी उंचीवर काम करणारे हलके रडार लहान आकाराच्या मानवरहित हवाई वाहनांचा शोध घेतील. उच्च मूल्याच्या लक्ष्यांना प्रभावीपणे भेदण्यासाठी पिनाका रॉकेट श्रेणी आणि अचूकता वाढवण्यासाठी लांब पल्ल्याची दिशादर्शक रॉकेट्स खरेदी केली जात आहेत, असे संरक्षण मंत्रालयाने निवेदनात म्हटले आहे.

सुधारित पल्ल्याची एकात्मिक ड्रोन शोध आणि प्रतिबंध प्रणाली (एमके-२) भारतीय लष्कराच्या सामरिक युद्धक्षेत्रातील आणि अंतर्गत भागांतील महत्त्वाच्या मालमत्तांचे संरक्षण करतील. ऑटोमॅटिक टेक-ऑफ लॅण्डिंग रेकॉर्डिंग सिस्टिमच्या समावेशामुळे लॅण्डिंग आणि टेक-ऑफचे उच्च गुणवत्तेचे तसेच सर्वच हवामानात चालणारे स्वयंचलित रेकॉर्डिंग उपलब्ध करून एरोस्पेस सुरक्षा वातावरणातील त्रुटी भरून काढल्या जातील, असे मंत्रालयाने म्हटले आहे. वाढीव पल्ल्याच्या अस्त्र एमके-२ क्षेपणास्त्रांमुळे लढाऊ विमानांची शत्रूच्या विमानांना मोठ्या अंतरावरून निष्प्रभ करण्याची क्षमता वाढेल.

**नौदलाच्या पाळत ठेवण्याच्या क्षमतेत पडणार भर**

भारतीय नौदलासाठी हाय फ्रिक्वेन्सी सॉफ्टवेअर डिफाईन्ड रेडिओ (एचएफ एसडीआर) मॅनपॅकच्या खरेदीला तसेच हाय अल्टिट्यूड लाँग रेंज (एचएएलई) रिमोटली पायलटेड एअरक्राफ्ट सिस्टिम भाडेतत्त्वावर घेण्यास मंजुरी देण्यात आली आहे. हिंद महासागर क्षेत्रातील सातत्यपूर्ण गुप्तचर मोहिमा, पाळत आणि टेहाळणी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात आरपीएएस भाडेतत्त्वावर घेतले जात आहेत, असे मंत्रालयाने सांगितले. (वृत्तसंस्था)

### वायुदलाची ताकद वाढणार

भारतीय वायुदलासाठी ऑटोमॅटिक टेक-ऑफ लॅण्डिंग सिस्टिम, अस्त्र एमके-२ क्षेपणास्त्रे, फुल मिशन सिम्युलेटर आणि स्पाईस-१००० लांब पल्ल्याच्या दिशादर्शक किट्ससह इतर उपकरणांच्या खरेदीला मंजुरी देण्यात आली.

### तेजससाठी मिशन सिम्युलेटर

तेजस हलक्या लढाऊ विमानासाठीचे संपूर्ण मिशन सिम्युलेटर वैमानिकांच्या प्रशिक्षणाला बळ देईल. यामुळे खर्च कमी होऊन वैमानिकांची सुरक्षितता वाढेल. स्पाईस-१००० वायुदलाची लांब पल्ल्याची अचूक हल्ला करण्याची क्षमता वाढवेल.

# पिंपरी-चिंचवड, पुण्यासाठी पवार कुटुंब 'हम साथ साथ है'

## महाविकास आघाडी आणि महायुतीत फाटाफूट






**पुणे, २९ डिसेंबर**

पिंपरी-चिंचवड महापालिकेसाठी पवार कुटुंबीय एकत्र आले आहेत. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोमवारी राष्ट्रवादी काँग्रेस आणि शरद पवार गटात आघाडी झाल्याची घोषणा केली. पिंपरी-चिंचवड आणि पुणे महापालिकेसाठी परिवार एकत्र आला, असे अजित पवार यांनी सांगितले.

१५ जानेवारी रोजी होणाऱ्या निवडणुकीच्या प्रचारासाठी ते रविवारी पिंपरी-चिंचवडमध्ये होते. पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी घड्याळ आणि तुतारीत आघाडी झाली. या माध्यमातून परिवार एकत्र आला आहे, असे अजित पवार यांनी सांगितले.

विकासासाठी काम करणारे आम्हीच आहोत. महापालिकेला कर्जात बुडवण्याचा प्रयत्न केला, त्यांना या निवडणुकीत बाजूला करू, असे अजित पवार म्हणाले. दरम्यान, पुणे महापालिकेसाठीही एकत्र येण्याबाबत दोन्ही पक्षांमध्ये चर्चा सुरू आहे.

**ठाण्यात उबाठा-मनसे-शरद पवार आघाडी**

भारतीय जनता पक्षाचा जोर असलेल्या ठाणे महानगरपालिका निवडणुकीत उबाठा, महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शरद पवार यांचा राष्ट्रवादी एकत्रपणे लढणार असल्याची माहिती मनसे नेते अविनाश जाधव यांनी दिली आहे. निवडणुकीत शिंदे सेनेचे पानिपत होणार असल्याचे जाधव म्हणाले. (वृत्तसंस्था)

### पुण्यात तिरंगी लढतीची शक्यता उबाठा-काँग्रेस एकत्र लढणार

पुणे महानगरपालिका एकत्रपणे लढण्याचा निर्णय काँग्रेस आणि उबाठाने घेतला आहे. काँग्रेसचे नेते सतेज पाटील आणि उबाठाचे सचिन अहीर यांनी सोमवारी पत्रकार परिषद घेऊन ही घोषणा केली आहे. आघाडीत मनसेला घेण्याबाबत चर्चा सुरू असल्याचे पाटील यांनी सांगितले.



### 'शरद पवार गटाने आम्हाला गाफील ठेवले'

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी शरद पवार गटाने शेवटच्या क्षणापर्यंत चर्चा करीत आम्हाल गाफील ठेवले आणि राष्ट्रवादी काँग्रेससोबत हातमिळवणी केली, असा आरोप उद्धव ठाकरे गटाचे नेते गौतम चाबुकस्वार यांनी केला आहे.



### राखी जाधव भाजपात दाखल

ज्यांनी पक्ष फोडला त्या अजित पवारांसोबत हातमिळवणी केल्याने नाराज झालेले संग्राम जगताप यांनी तडकाफडकी राजीनामा देत काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर शरद पवार गटाच्या मुंबई अध्यक्ष राखी जाधव यांनीही भाजपात प्रवेश केला.

## महत्त्वाचे

### बाजारात मंदीचा सोमवार

**मुंबई :** वर्षाच्या शेवटच्या आठवड्यातील पहिल्या दिवशी भारतीय बाजारात निराशेचे वातावरण दिसून आले. गुंतवणूकदारांनी सावध पवित्रा घेतल्याने बाजारात मोठी घसरण झाली. मुंबई बाजारातील निर्देशांक ३४६ अंकांनी घसरून ८४,६९६ वर तर निफ्टी १०० अंकांनी खाली येत २५,९४२ वर बंद झाला. गेल्या काही दिवसांपासून तेजीत असलेल्या रेल्वे शेअर्समध्ये सोमवारी नफावसुली दिसून आली. धातू शेअर्सही सुरुवातीला तेजीत राहिले, पण बाजार बंद होईपर्यंत मंदीच्या सावटाखाली आले. बाजारात मंदी असतानाही टाटा ग्राहकी वस्तू आणि एशियन पेण्ट्स हे शेअर्स तेजीत राहिले.

### सूर्य घर मोफत-वीज योजनेत झाले २५ लाख कनेक्शन

**नवी दिल्ली :** पंतप्रधान सूर्य घर मोफत वीज योजनेअंतर्गत आतापर्यंत २५ लाख घरांमध्ये रूफटॉप सोलर सिस्टिम्स बसवण्यात आल्या आहेत. ही योजना १३ फेब्रुवारी २०२४ रोजी सुरू झाली होती. या अंतर्गत ३००-३०० युनिट्स मोफत वीज मिळते. या योजनेअंतर्गत रूफटॉप सोलर पॅनेल बसवणाऱ्या कुटुंबांना वार्षिक १५ हजार रुपयांचे उत्पन्नही मिळते.



### महापालिका निवडणुकीत पक्षांनी मूळ ओबीसींनाच उमेदवारी द्यावी

**सोलापूर :** सध्या सुरू असलेल्या महापालिकेच्या निवडणुकीमध्ये विविध राजकीय पक्षांनी आरक्षित जागेत मूळ ओबीसी उमेदवारांनाच उमेदवारी द्यावी, अशी मागणी ओबीसी संघर्ष समिती सोलापूरच्यावतीने संस्थेचे संस्थापक शेखर बंगाळे यांनी पत्रकार परिषदेत केली. सोलापुरात आता राजकीय वातावरण तापू लागले असून महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अनेक पक्ष उमेदवारीचे वाटप करत आहेत. मंगळवारी उमेदवारी देण्याचा शेवटचा दिवस आहे. या पार्श्वभूमीवर उमेदवारी देताना ओबीसी घटकांनाच आरक्षित जागेत उमेदवारी देणे गरजेचे आहे. कारण अनेक लोक नव्याने ओबीसीचे बोगस दाखले काढून या निवडणुकीत उतरल्याचे कळते. परंतु, अशा लोकांना उमेदवारी न देता ओबीसी समाजातील मूळ घटकांना उमेदवारी देऊन या समाजाच्या आरक्षणाचा कोटा पूर्ण करावा, असे आमच्या ओबीसी संघर्ष समितीची मागणी असल्याचे ते म्हणाले. या पत्रकार परिषदेस विलास पाटील, मनोजकुमार तम्मेवार, सुजित खुर्द, विनोद वाघमोडे, गौरव पवार, मनोज सलगर आदी उपस्थित होते.

## औद्योगिक उत्पादनाने गाठला दोन वर्षांचा उच्चांक

**नवी दिल्ली, २९ डिसेंबर**

खाणकाम आणि उत्पादन क्षेत्रातील दमदार कामगिरीमुळे या वर्षी नोव्हेंबर महिन्यात भारताच्या औद्योगिक उत्पादनात ६.७ टक्के वाढ झाली. ही मागील दोन वर्षांतील सर्वाधिक आहे.

औद्योगिक उत्पादन निर्देशांकाच्या आधारावर मोजले जाणारे कारखान्यांमधील उत्पादन नोव्हेंबर २०२४ मध्ये पाच टक्क्यांनी वाढले होते. यापूर्वीची सर्वाधिक वाढ नोव्हेंबर २०२३ मध्ये ११.९ टक्के नोंदवली गेली होती. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने (एनएसओ) मागील महिन्यात प्रसिद्ध केलेल्या ०.४ टक्के तात्पुरत्या अंदाजानुसार, ऑक्टोबर २०२५ साठी औद्योगिक उत्पादन वाढीच्या दरात सुधारणा करून तो ०.५ टक्के केला आहे. नोव्हेंबर २०२५ मध्ये उत्पादन क्षेत्राचे उत्पादन मागील वर्षीच्या याच महिन्यातील ५.५ टक्क्यांच्या तुलनेत ८ टक्क्यांनी वाढले. (वृत्तसंस्था)

# भाजपचा 'घराणेशाही'ला ब्रेक!

## महापालिकेत आमदार-खासदारांच्या मुलांना नाही मिळणार तिकीट

**मुंबई, दि.२९ डिसेंबर-**

नगरपालिका निवडणुकीत एकाच कुटुंबातील सहा जणांना संधी देणाऱ्या भाजपने महापालिका निवडणुकांसाठी मात्र आपली रणनीती पूर्णपणे बदलली आहे. पक्षासाठी राबणाऱ्या सामान्य कार्यकर्त्यांना न्याय मिळावा, या उद्देशाने विद्यमान आमदार, खासदार आणि मंत्र्यांच्या पत्नी किंवा मुलांना उमेदवारी न देण्याचा धोरणात्मक निर्णय पक्षाने घेतला आहे.




भाजपाच्या या निर्णयामुळे सोलापुरात भाजपाच्या आमदारांनी जर का आपला पुत्र अथवा कुटुंबातील कोणाला उमेदवारी दिली असल्यास त्यात बदल होणार का हे पाहणे औत्सुक्याचे लागले आहे. पक्षाचा निर्णय हा आदेश असेल तर तो सर्वांना पाळणे बंधनकारक असणार आहे. या निर्णयाची अंमलबजावणी आज उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या प्रक्रियेत प्रकर्षाने दिसून आली. मुंबई महापालिकेसह राज्यातील २९ महापालिकांसाठी येत्या १५ जानेवारीला निवडणूक होणार आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवशी निकाल घोषित होणार आहेत. उद्या उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटचा दिवस आहे. भाजपच्या उपरोक्त निर्णया मुळे आज अर्ज भरण्याच्या आदल्या दिवशी भाजपच्या आमदार आणि खासदार पुत्रांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले आहेत.

# देशभरात घुसखोरांची ओळख पटवणार

## अमित शाह यांची आसाममध्ये घोषणा

**गुवाहाटी, २९ डिसेंबर**

देशातील सर्वच घुसखोरांना हुसकावण्याचा संकल्प भाजपाने घेतला आहे. केवळ आसाम नव्हे, तर देशभरात बांगलादेशी घुसखोरांची ओळख पटवली जाईल, अशी घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सोमवारी येथे केली.



अमित शाह दोन दिवसांच्या दौऱ्यासाठी आज आसाममध्ये दाखल झाले. येथे त्यांनी काही विकास प्रकल्पांचे उद्घाटन केले. नागाव जिल्ह्यातील वैष्णव संत श्रीमंत शंकरदेव यांचे जन्मस्थळ बटाद्रवाचे उद्घाटनही त्यांच्या हस्ते झाले. २२७ कोटी रुपयांच्या निधीतून बटाद्रवाचा पुनर्विकास करण्यात आला आहे. या वेळी मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा, केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल आणि पवित्र मार्गेरिटा तसेच राज्याचे सांस्कृतिक मंत्री बिमल बोरा उपस्थित होते.

बैष्णव संत श्रीमंत शंकरदेव यांचे जन्मस्थान अतिक्रमणमुक्त करण्यात आले, असे अमित शाह यांनी बोरदुरवा येथील सभेला संबोधित करताना सांगितले. वैष्णव संत श्रीमंत शंकरदेव यांनी 'एक भारत'चे आवाहन केले होते. त्याचे पालन आता पंतप्रधान नरेंद्र मोदी करीत आहेत. आसाममधील हिमंता बिस्व सरमा यांच्या सरकारने बांगलादेशी घुसखोरांच्या ताब्यातून एक लाख बिघांपेक्षा जास्त जमीन सोडवली. आम्ही केवळ आसाम नव्हे, तर देशभरात बांगलादेशी घुसखोरांची ओळख पटवणार आहोत. आम्ही बंडखोर संघटनांसोबत शांतता करार केले आहेत. या करारांतील ९२ टक्के अटी पूर्ण झाल्या असल्याचे अमित शाह यांनी सांगितले.

पश्चिम बंगालमध्ये एसआयआर सुरू असल्याने मोठ्या प्रमाणात बांगलादेशी घुसखोर पलायन करीत आहेत. (वृत्तसंस्था)

## चांदी २१,५०० रुपयांनी गडगडली!

**नवी दिल्ली, २९ डिसेंबर**

चांदीच्या भावामध्ये होत असलेल्या घसरणीमुळे सध्या सोन्यापेक्षा चांदीची चर्चा होताना दिसून येतेय. सोमवारी सकाळच्या वेळेत चांदीचे दर वाढलेले होते. तर दुपारनंतर हे भाव कोसळले. एमसीएक्स बाजारात २.५४ लाख रुपये किलोपर्यंत भाव पोहोचला. परंतु अचानक भूकंप झाला आणि काही मिनिटात चांदी २१५०० रुपये प्रतिकिलोपर्यंत घसरली.

सराफा बाजारामध्ये सोमवारी एक मोठा मार्केट ड्रामा बघायला मिळाला. चांदीच्या भावाने दिवसाच्या सुरुवातीला इतिहास रचला. तर एका तासाच्या आत हे भाव २१ हजार ५०० रुपयांनी स्वस्त झाले. त्यामुळे बाजारातील गुंतवणूकदार पुरते गोंधळून गेले होते. सोमवारी सकाळी वर चांदीच्या भावाने २ लाख ५४ हजार १७४ रुपये प्रतिकिलोचं रेकॉर्ड तोडलं होतं. (वृत्तसंस्था)

# पवनचक्कीच्या सिमेंट मिक्सरची धडक; दोघांचा जागीच मृत्यू

- **कडकनाथवाडीत एकाच महिन्यात पवनचक्कीच्या वाहनांने घेतले तिघांचे बळी**

**तभा वृत्तसेवा,**
**वाशी, दि. २९ डिसेंबर-**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यातील तेरखेडा-कडकनाथवाडी रस्त्यावर शमशानभूमी परिसरात सोमवारी (दि.२९) सायंकाळी साडेसातच्या सुमारास टाटा पवनचक्की कंपनीच्या सिमेंट मिक्सर वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिली.

या भीषण अपघातात कडकनाथवाडी येथील चांद शेख (वय ५०) व वसंत जगताप (वय ५१) यांचा जागीच मृत्यू झाला. चांद शेख व वसंत जगताप हे दोघे दुचाकीवरून गावाकडे जात असताना तेरखेडा गावापासून काही अंतरावर चक २३ ७२९१ क्रमांकाच्या टाटा पवनचक्की कंपनीच्या सिमेंट मिक्सर कंटेनरने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की दोघेही वाहनाखाली चिरडले जाऊन जागीच ठार झाले. कडकनाथवाडी शिवारात टाटा कंपनीच्या पवनचक्क्या उभारण्याचे काम सुरू असून, या कामासाठी अवजड वाहनांची सातत्याने वर्दळ सुरू आहे. याच ठिकाणी यापूर्वी १० नोव्हेंबर रोजी कडकनाथवाडी येथील दशरथ कुंभार यांनाही पवनचक्कीच्या वाहनाने चिरडले होते. त्या अपघातात त्यांचा जागीच मृत्यू झाला होता. अवघ्या एका महिन्यात एकाच गावातील तिघांचा मृत्यू झाल्याने कडकनाथवाडी व परिसरात तीव्र शोककळा पसरली आहे.

घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलिस अधिकारी संजय पवार यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. तसेच येरमाळा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलिस अधिकारी संग्राम भालेराव हेही तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करत पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, पवनचक्कीच्या कामासाठी सुरू असलेल्या अवजड वाहनांच्या अनियंत्रित व बेफिकीर वर्दळीमुळे नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे. प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. पुढील तपास येरमाळा पोलीस करत आहेत

### एमपीएससीच्या अध्यक्षपदी विवेक भीमनवार यांची नियुक्ती

**मुंबई, दि. २९ डिसेंबर-**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी जेष्ठ सनदी अधिकारी विवेक लक्ष्मीकांत भीमनवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सामान्य प्रशासन विभागाच्यावतीने सोमवारी त्याबाबतची अधिसूचना जारी करण्यात आली. मावळते अध्यक्ष रजनीश सेठ आज वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याने या पदावर त्यांची नियुक्ती केली आहे. भीमनवार पदभार स्वीकारेपर्यंत अध्यक्षपदाचा अतिरिक्त कार्यभार आयोगाचे सदस्य डॉ. वाघ यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३१६ (१) अन्वये राज्यपालांनी ही नियुक्ती केली असून, भीमनवार यांनी अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारल्यापासून दिनांकापासून सहा वर्षे किंवा वयाची ६२ वर्षे पूर्ण होईपर्यंत ते या पदावर कार्यरत राहणार आहेत.

## पतीने केली पत्नी व चिमुरड्याची हत्या

**मेहकर :** संशयाचे भूत डोक्यात शिरल्याने एका पतीने, पत्नी व आपल्या चिमुरड्याची निर्घृण हत्या केली. माणुसकीला काळिमा फासणारी घटना येथील शिक्षक कॉलनीत सोमवारी पहाटे २ वाजताच्या सुमारास घडली. राहुल हरी मस्के (३३) हा त्याची पत्नी रूपाली (२८) हिच्या चारित्र्यावर सतत संशय घेत होता. हा संशय टोकाला गेल्याने त्याने सोमवार, २९ डिसेंबरला पहाटे २ वाजता पत्नी व ४ वर्षांचा मुलगा रियांश यांच्या डोक्यावर कुऱ्हाडीने वार केले. या हल्ल्यात माय-लेक गंभीर जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच नातलगांनी तत्काळ पोलिसांना कळवले.

# सोलापुरात सोमवारी ३१६ नामनिर्देशन अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ डिसेंबर-**

सोलापूर महापालिका निवडणुकीसाठी सोमवारी ३१६ नामनिर्देशन अर्ज दाखल करण्यात आले आहेत. आजपर्यंत एकूण ३५१ उमेदवारी अर्ज विविध निवडणूक कार्यालयात दाखल झाले आहेत, अशी माहिती महापालिका प्रशासनाकडून देण्यात आली.

मंगळवारी उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असल्यामुळे विविध पक्षांच्या उमेदवारांसह अपक्ष उमेदवारांची अर्ज भरण्यासाठी मोठी झुंबड उडणार आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनासह पोलीस प्रशासनावरही बंदोबस्ताचा मोठा ताण असणार आहे. कोण कोणत्या पक्षातून अर्ज दाखल करणार हे मंगळवारी स्पष्ट होणार आहे.

| सोमवार, दि.२९ डिसेंबर रोजी दाखल झालेले उमेदवारी अर्ज याप्रमाणे |
| --- |
| निवडणूक अधिकारी-१ : येथे एकूण अर्ज -७१ (प्रभाग व जागा १अ-२, १ब-१, १क-१, १ड-८, २अ-४, २ब-४, २क-२, २ड-६ ३अ-६, ३ ब-४, ३क-५, ३ड-७, ४अ-१, ४ ब-६, ४क-८, ४ड-६). |
| निवडणूक अधिकारी-२ : एकूण प्राप्त अर्ज-५० (प्रभाग व जागा ५अ-२, ५ब-४, ५क- ६, ५ड -६, ६अ -४, ६ब-५, ६क-४ ६ड-४ ७अ-१, ७ब-३, ७क-२ ७, ड-१, १५अ-१, १५ब-१, १५ क-२, १५ड-४). |
| निवडणूक अधिकारी-३ : एकूण प्राप्त अर्ज-४४ (प्रभाग व जागा ८अ-४, ८ब-२, ८क-४, ८ड ३, ९अ -५, ९ब-७, ९क-३, ९ड-८ १४अ-0, १४ब-२, १४क-१, १४ड-५). |
| निवडणूक अधिकारी-४ : एकूण प्राप्त अर्ज-३१ (प्रभाग व जागा १0 अ-0, १0ब-१, १0क-२, १0ड-२, ११अ-३, ११ब-३, ११क-१ ११ड-६, १२अ-१, १२ब-0, १२क -१, १२ड-१, १३अ-३, १३ब-४, १२क-१, १३ड-२). |
| निवडणूक अधिकारी-५ : एकूण प्राप्त अर्ज-५२ (प्रभाग व जागा १६अ-३, १६ब-१, १६क-४, १६ड-३, १७अ-३, १७ब-४, १७क-५ १७क -६, १८अ -२, १८ब-१, १८क-३, १८ड-३, २१अ-२, १८ब-१, १८क -३, १८ड -३, २१अ-४, २१ब-५, २१क-२, २१ड-३). |
| निवडणूक अधिकारी-६ : एकूण प्राप्त अर्ज-३३ (प्रभाग व जागा १९अ-२, १९ब-५, १९क ५, १९ड-५, २0अ-३, २0ब-0, २0क-२ २0ड-0, २५अ-३, २५ब-३, २५क-५). |
| निवडणूक अधिकारी-७ : एकूण प्राप्त अर्ज-३५ (प्रभाग व जागा २२अ -४, २२ब-१, २२क-0, २२ड-३, २३अ-६, २३ब-१, २३क-३, २३ड-७, २४अ-१, २४ब-0, २४क-१, २४ड-४, २६अ-३, २६ब-१, २६क-0). |




CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# कुलदीप सेंगरचा जामीन रद्द

## उन्नाव बलात्कार प्रकरण; सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

**नवी दिल्ली, २९ डिसेंबर**

उन्नाव बलात्कार प्रकरणातील आरोपी आणि माजी आमदार कुलदीप सेंगर यांच्या जामिनावर सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. न्यायालयाने सेंगर यांना नोटीस बजावून उत्तर मागवले आहे. या प्रकरणाची सुनावणी चार आठवड्यांनंतर होईल.

सोमवारी सेंगर यांची शिक्षा निलंबित करण्याबाबत सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. सरन्यायाधीश सूर्य कांत, न्यायमूर्ती जे.के. माहेश्वरी आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांनी दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकले.

### सेंगरला जन्मठेपेची शिक्षा



**२३ डिसेंबर रोजी दिल्ली उच्च न्यायालयाने या प्रकरणात भाजपचे माजी आमदार कुलदीप सिंह सेंगर यांची शिक्षा निलंबित केली होती. सेंगरला जन्मठेपेची शिक्षा झाली आहे. न्यायालयाने जामीन देताना ही अट ठेवली की कुलदीप सेंगरला पीडितेपासून ५ किमी दूर राहावे लागेल. तीन दिवसांपूर्वी सीबीआयने दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते.**

न्यायालयात सॉलिसिटर जनरल तुषार मेहता म्हणाले, हे एक भयानक प्रकरण आहे. कलम ३७६ आणि पॉक्सो कायद्यांतर्गत आरोप निश्चित करण्यात आले होते. अशा प्रकरणांमध्ये किमान २० वर्षांची कैद होऊ शकते, जी जन्मठेपेपर्यंत वाढवली जाऊ शकते. सध्या न्यायालय उच्च न्यायालयाच्या आदेशाला स्थगिती देण्याच्या बाजूने आहे. सरन्यायाधीशांनी तुषार मेहता यांना विचारले, जर पीडित अल्पवयीन नसेल, तरीही किमान शिक्षा लागू होईल का? यावर मेहता म्हणाले, कायद्यात सुधारणा केल्यानंतर किमान शिक्षा २० वर्षे निश्चित करण्यात आली आहे. इकडे, पीडितेच्या समर्थनार्थ निदर्शने करणाऱ्या महिला काँग्रेस कार्यकर्त्यांची पोलिसांशी झटापट झाली. पोलिसांनी त्यांना जीपमध्ये बसवून नेले. कार्यकर्त्या योगिता भयाना म्हणाल्या- आज आम्हाला न्याय मिळेल आणि सर्वोच्च न्यायालय नक्कीच समजून घेईल की त्या आदेशात किती बालिशपणा होता. तो आदेश मागे घेतला जाईल. (वृत्तसंस्था)

# माओवाद्यांतील संघर्षात दोन ठार

**चतरा, २९ डिसेंबर**

झारखंडमधील चतरा जिल्ह्यात माओवाद्यांच्या फुटीर गटांमध्ये झालेल्या अंतर्गत संघर्षात दोन जणांची गोळ्या घालून हत्या करण्यात आली, तर इतर दोन जण जखमी झाले आहेत, असे पोलिसांनी सोमवारी सांगितले.

कुंडा पोलिस ठाणे हद्दीतील गेंद्रा गावात रविवारी रात्री प्रतिबंधित तृतीय संमेलन प्रस्तुती समितीच्या दोन गटांत हिंसाचार झाला, असे वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने सांगितले.

काही मुद्यांवर मतभेद झाल्यानंतर हा संघर्ष झाला. परस्परांवर केलेल्या गोळीबारात दोन ठार, तर दोन जखमी झाले, असी माहिती चतराचे पोलिस अधीक्षक सुमितकुमार अग्रवाल यांनी दिली. ठार झालेल्या माओवाद्यांत देवेंद्र गंझू आणि चुडामन गंझूचा समावेश आहे. या हिंसाचारात श्याम भोकटा आणि त्याचा मेहुणा ब्रह्मदेव भोकटा जखमी झाले.

एनआयए श्याम भोकटाचा शोध घेत होती. जखमी झालेल्या दोन्ही माओवाद्यांना राजेंद्र इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस येथे दाखल करण्यात आले. त्यांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचे अग्रवाल यांनी सांगितले. या प्रकरणाचा तपास सुरू करण्यात आला आहे. (वृत्तसंस्था)

# हिमांशु भारद्वाज व रामकृष्ण सुंचू यांना न्यायालयीन कोठडी

## रोशन कुळे किडनी विक्री प्रकरण

**चंद्रपूर, २९ डिसेंबर -**

किडनी विक्रीच्या आंतरराष्ट्रीय रॅकेटचा मुख्य आरोपी रामकृष्ण सुंचू उर्फ डॉ. क्रिष्णा तसेच हिमांशु भारद्वाज या दोघांचीही पोलिस कोठडी संपली असून, न्यायालयाने सो वारी त्यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली.

नागभीड तालुक्यातील मिंथुर येथील शेतकरी रोशन शिवदास कुळे यांनी सावकारी कर्जापायी आपली किडनी कंबोडियात विकली होती. हे प्रकरण उघडकीस येताच ब्रह्मपुरी पोलिसांनी कर्जदारांची आर्थिक, मानसिक व शारीरिक पिळवणूक केल्याप्रकरणी ६ अवैध सावकरांविरोधात गुन्हे दाखल करून अटक केली. तपासात किडनी विक्रीचे रॅकेट देशाबाहेरही सक्रिय असल्याचे पुढे आले. या प्रकरणातील मुख्य आरोपी रामकृष्ण सुंचू जो डॉ. क्रिष्णा नावाने पीडितांच्या संपर्कात होता, त्याला सोलापुरातून अटक करण्यात आली. न्यायालयाने त्याला २९ डिसेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली होती. आता त्याची पोलिस कोठडी संपताच न्यायालयाने त्याची रवानगी न्यायालयीन कोठडीत केली आहे. तसेच कंबोडियात किडनी विक्रीसाठी पीडितांना सोबत करणारा आरोपी हिमांशु भारद्वाज यालाही पोलिसांनी चंदीगड येथून अटक केली होती. २९ डिसेंबर रोजी त्यांचीही पोलिस कोठडी संपली असता, त्याला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

## इंडोनेशियात १६ वृद्धांचा होरपळून मृत्यू

**जकार्ता, २९ डिसेंबर**

इंडोनेशियातील उत्तर सुलावासी प्रांतातील मनाडो परिसरात एका वृद्धाश्रमाला रविवारी लागलेल्या आगीत १६ वृद्धांचा मृत्यू झाला. रात्री येथील वृद्ध झोपेत असताना हे अग्नितांडव झाले.

या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या १६ जणांपैकी १५ वृद्ध होरपळून, तर एकाचा गुदमरल्याने मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी सोमवारी दिली. या भीषण आगीतून १५ लोकांना वाचवण्यात आले. त्यांना रुग्णालयात दाखल केले आहे. आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन विभागाचे सहा बंब घटनास्थळी पाठवण्यात आले. दोन तासांच्या परिश्रमानंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश मिळाले. आग विझवण्यासाठी स्थानिकांनी मदत केली, असे अग्निशमन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. प्रारंभिक तपसात, ही आग विजेच्या सदोष फिटिंगमुळे लागल्याचे निष्पन्न झाले. मात्र, खरे कारण तपासानंतरच समोर येईल, असे पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. (वृत्तसंस्था)




बांगलादेशात हिंदूंवर होत असलेल्या अत्याचाराचा जम्मूत निषेध करण्यात आला. जम्मूत आलेल्या बांगलादेशी घुसखोरांना हाकलून लावा, या मागणीसाठी सोमवारी शिवसेना डोग्रा फ्रंटच्या सदस्यांनी आंदोलन केले

# इंडोनेशियात नवीन वर्षाच्या जल्लोषावर बंदी

**जकार्ता, २९ डिसेंबर**

यंदा जगातील सर्वात मोठ्या मुस्लिम लोकसंख्येच्या देश इंडोनेशियात नवीन वर्षाचा उत्सव साजरा केला जाणार नाही. इंडोनेशियाच्या राष्ट्रपती कार्यालयातील एका अधिकाऱ्याने ही माहिती दिली आहे. देशातील अनेक राज्यांनी या वर्षी नवीन वर्षाच्या निमित्ताने फटाके न फोडण्याचा निर्णय घेतला असून आता केंद्र सरकारही या योजनेला पाठिंबा देत आहे.

या निर्णयामागचे कारण सुमात्रा द्वीपावर अलिकडेच आलेल्या भयंकर पुराचे परिणाम हे आहे. पूर आणि भूस्खलनामुळे १,१०० पेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाला असून सुमारे ४,००,००० लोक अजूनही विस्थापित आहेत. या संकटग्रस्त लोकांबरोबर एकजुटी दाखवण्यासाठीच सरकारने नवीन वर्षाच्या साजरीकरणावर बंदी



घालण्याचा, पटाखे न फोडण्याचा निर्णय घेतला आहे. जकार्ता, बालीसह अनेक राज्य सरकारांनी आणि पोलिस दलांनी सुमात्रा येथील पीडितांचा सन्मान राखण्यासाठी आतिशबाजीवर बंदी घालण्याचे आदेश दिले आहेत. इंडोनेशियाचे राष्ट्रपती प्राबोवो सुबिआंतो यांचे कार्यालयाचे प्रवक्ता प्रासेत्यो हादी यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, प्रादेशिक सरकारांनी आतिशबाजीवर बंदी घालणे किंवा लोकांना उत्सवात फटाके न फोडण्याचे आवाहन करणे योग्य आहे. आपल्याला एका देश म्हणून सहानुभूती आणि एकजुटी दाखवणे गरजेचे आहे, कारण काही लोक या आपत्तीमुळे गंभीर स्थितीत आहेत.

इंडोनेशियातील अधिकाऱ्यांनी सांगितले की, सुमात्रा द्वीपातील पुरामुळे प्रभावित भागांत पूल आणि निवासस्थाने तयार केली जात आहेत, ज्यात उत्तरी सुमात्रा, पश्चिम सुमात्रा आणि आचे प्रांतांचा समावेश आहे. सुमात्रा पुन्हा उभा करण्यासाठी किमान ३.११ अब्ज डॉलर्स खर्च येण्याची अपेक्षा आहे. मानव विकास समन्वय मंत्री प्रतिकनो यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, सुमात्रा द्वीपाच्या अनेक भागात आपत्कालीन परिस्थिती लागू करण्यात आली आहे. गृह मंत्री टीटो कार्नावियन यांनी सांगितले की, तीन प्रांतातील २० पेक्षा जास्त गाव पुरात वाहून गेले असून ते बेपत्ता झाले आहेत. (वृत्तसंस्था)

# बीएनपीचे तारिक रहमानचा उमेदवारी अर्ज दाखल

**ढाका, २९ डिसेंबर**

बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टी (बीएनपी)चे कार्यकारी अध्यक्ष तारिक रहमान यांनी आगामी निवडणुकीसाठी सोमवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. डेली स्टारने दिलेल्या वृत्तानुसार, हे अर्ज सेगुनबागिचा येथील ढाका विभागीय आयुक्तांच्या कार्यालयात दाखल करण्यात आले.

बीएनपी अध्यक्षांचे सल्लागार अब्दस सलाम यांनी, बांगलादेश डॉक्टर्स असोसिएशन (डीबी) चे मुख्य सल्लागार प्राध्यापक डॉ. फरहाद हलीम डोनार यांच्यासमवेत, रहमान यांच्या वतीने उमेदवारी अर्ज सादर केला. रहमान १२ फेब्रुवारी रोजी होणारी निवडणूक ढाका-१७ मतदारसंघातून लढवणार आहेत. १३व्या राष्ट्रीय संसदीय निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज सादर करण्याचा सोमवारी शेवटचा दिवस होता.

एका पत्रकार परिषदेत बोलताना सलाम यांनी सर्वांचे आभार मानले आणि सांगितले की, १७ वर्षांच्या वनवासानंतर ढाका शहरातील रहिवाशांनी रहमान यांचे हार्दिक स्वागत केले. (वृत्तसंस्था)

# नवीन वर्ष साजरे करणे इस्लाममध्ये निषिद्ध

### मौलानांचा इशारा

**लखनौ, २९ डिसेंबर**

अखिल भारतीय मुस्लिम जमातचे राष्ट्रीय अध्यक्ष मौलाना मुफ्ती शहाबुद्दीन रजवी बरेलवी यांनी मुस्लिमांना नवीन वर्ष साजरे करू नये, असा सल्ला दिला आहे. त्यांनी म्हटले आहे की हा फालतू खर्च आहे आणि इस्लाममध्ये तो निषिद्ध आहे. हे विधान आता समाज माध्यमांवर व्हायरल होत आहे.

मौलाना बरेलवी म्हणाले की काही लोक नवीन वर्षाच्या उत्सवावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत.

### मौलानांचा तरुणांना सल्ला



मौलाना म्हणाले, उत्सव म्हणजे काय? ३१ डिसेंबरच्या रात्री अश्लीलता, गोंधळ, आवाज, नाच, गाणे आणि उधळपट्टी करणे हे उत्सव साजरा करण्याचे मार्ग आहेत. शरिया कायदा याला परवानगी देत नाही. म्हणून, मी तरुण मुस्लिम मुला-मुलींना अजिबात उत्सव साजरा करू नये, अशी विनंती करतो. जर काही मुले-मुली उत्सव साजरा करत असल्याची बातमी मिळाली तर उलेमा-ए-किराम ते कडकपणे थांबवतील.

इस्लामिक शरीयतच्या प्रकाशात नवीन वर्ष साजरे करणे परवानगी देत नाही हे स्पष्ट करणे महत्त्वाचे आहे. कारण इस्लामिक कॅलेंडरनुसार नवीन वर्ष मोहरम महिन्यापासून सुरू होते, तर हिंदू कॅलेंडरमध्ये चैत्र महिन्यापासून नवीन वर्ष सुरू होते. १ जानेवारी रोजी साजरे होणारे नवीन वर्ष युरोपियन संस्कृतीशी जोडलेले आहे आणि ख्रिश्चन समुदायाद्वारे ते साजरे केले जाते. यापूर्वी, संत कबीर नगरमध्ये झालेल्या धार्मिक परिषदेत बरेलवी म्हणाले होते की इस्लाम त्याच्या तत्त्वांशी पूर्णपणे वचनबद्ध आहे आणि आपल्या समाजातील लोक फक्त एकाच अल्लाहची पूजा करतात. मौलाना शहाबुद्दीन यांनी त्यांच्या उत्तरात इस्लामच्या मूलभूत शिकवणी स्पष्ट केल्या. ते म्हणाले की काही संघटना आणि नेते सूर्यनमस्कार, पृथ्वी, नद्या आणि झाडांची पूजा करण्यावर भर देत आहेत, परंतु इस्लाममध्ये शरियानुसार या गोष्टींची पूजा करणे निषिद्ध आहे. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### कंगनाने पूर्ण केली बारा ज्योतिर्लिंगांची यात्रा




**मुंबई** : अभिनेत्री आणि खासदार कंगना राणावत ही महादेवाची मोठी भक्त आहे. नुकतेच तिने महाराष्ट्रातील भीमाशंकर ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेतले आणि याचसोबत तिचा भारतातील सर्व बारा ज्योतिर्लिंगांचा ऐतिहासिक प्रवास पूर्ण झाला. हा प्रवास दहा वर्षांहून अधिक काळाचा होता. आपल्या पोस्टमध्ये कंगनाने लिहिले की, माझ्यासाठी शेवटचे ज्योतिर्लिंग भीमाशंकर विशेष आहे. कारण हे एकमेव ज्यातिर्लिंग आहे जिथे शिव आणि शक्ती दोघेही एकाच लिंगामध्ये अर्धनारीश्वर रूपात प्रतिष्ठित आहेत. दिवसभरातील बहुतांश वेळ हे प्राचीन लिंग चांदीच्या आवरणाने झाकलेले असते आणि आतल्या लिंगाचे दर्शन फक्त साधारण दहा मिनिटांसाठीच होते. मला त्या वेळेत दर्शन घेण्याचे सौभाग्य लाभले. अलिकडेच कंगनाने वैजनाथ, ओंकारेश्वर आणि घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगांचे सलग दर्शन घेतले.

### नोरा फतेही फुटबॉलपटूच्या प्रेमात?



**मुंबई** : आपल्या नृत्यशैलीने स्वत:ची ओळख निर्माण करणारी अभिनेत्री नोरा फतेही भारतच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध आहे. सध्या ती तिच्या वैयक्तिक जीवनामुळे चर्चेत आहे. ती एका नामांकित फुटबॉलपटूच्या प्रेमात असल्याचे बोलले जात आहे. दुबई आणि मोरोक्कोमध्ये तिला एकाच व्यक्तीसोबत पाहण्यात आल्याने या चर्चेला उधाण आले आहे. मात्र, या फुटबॉलपटूची ओळख समोर आलेली नाही. यापूर्वीही तिचे नाव अनेकांसोबत जोडले गेले. तिने स्वत: कधीही याची पुष्टी केली नाही. आपल्या खाजगी आयुष्याबद्दल ती कायम मौन पाळत कामावर लक्ष केंद्रित करताना दिसते. ती सध्या दाक्षिणात्य सिनेसृष्टीतही कार्यरत असून तिचा कन्नड चित्रपट लवकरच प्रदर्शित होणार आहे.

### अक्षयला नोटीस पाठवणार निर्माते



**मुंबई** : सध्या 'धुरंधर'मुळे अक्षय खन्ना प्रसिद्धीच्या शिखरावर आहे. मुख्य अभिनेता रणवीरसिंहपेक्षाही अक्षयचीच चर्चा जास्त आहे. पण, सध्या अक्षय 'दृश्यम ३'मुळे जास्त चर्चेत आहे. त्याने हा चित्रपट नाकारल्याने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला आहे. त्याचे चाहतेही नाराज आहेत. पण, त्याहीपेक्षा चित्रपटाचे निर्माते जास्त संतापलेले आहेत. चित्रपटाचे निर्माते कुमार मंगत पाठक यांनी म्हटले आहे की, अक्षयचे हे वागणे बेजबाबदारपणाचे आहे. त्याचे वाढीव मानधन देण्यासही आम्ही तयार होतो. तरीही त्याने चित्रपटात विग घालण्याचा हट्ट धरला. यापूर्वीच्या भागात त्याला विग दाखवण्यात आला नव्हता. त्यामुळे आता त्याला विगमध्ये दाखवणे शक्य नव्हते. तेवढ्यासाठी त्याने चित्रपटातून माघार घेणे अयोग्य आहे. करार मोडल्याप्रकरणी आम्ही त्यासाठी त्याला नोटीस पाठवणार आहोत.




**पाकिस्तानने अगदी फाळणीपासूनच भारताला त्रास देण्याचे नाना प्रकारे प्रयत्न केले. दहशतवादी संघटनांना पोसणाऱ्या पाकिस्तानने २०२५ मध्ये भारताविरुद्ध पुन्हा असाच प्रकार केला. २२ एप्रिल रोजी जम्मू-काश्मिरातील अनंतनाग जिल्ह्यातील पहलगाम येथे बैसरण खोऱ्यात चार दहशतवाद्यांनी खुलेआम गोळीबार करत हैदोस घातला. या भ्याड हल्ल्यात हिंदूंचे टार्गेट किलिंग करण्यात आले. नाव आणि धर्म विचारून पर्यटकांना गोळ्या घालण्यात आल्या. यात २५ भारतीयांसह नेपाळचा एक नागरिक असे एकूण २६ जण अमानूषपणे मारले गेले. याचे व्हिडीओ व्हायरल होताच जगाला याची भीषणता लक्षात आली आणि भारतानेही आपल्या स्वाभिमानावरील हल्ल्याची गंभीर दखल घेतली.**



# 'पहलगाम' ते 'ऑपरेशन सिंदूर'

### २४ एप्रिल २०२५
### पंतप्रधान मोदींचा बिहारमधून इशारा



पहलगाम येथील हल्ला हा भारतमातेच्या आत्म्यावर झालेला हल्ला आहे; या हल्ल्याने देश शोकसागरात बुडाला आहे. पण, ज्या हल्लेखोरांनी हा हल्ला केला, त्यांना कल्पनेतही येणार नाही, अशी शिक्षा देणार; आता त्यांची शिल्लक राहिलेली जमीनही मातीत गाडण्याची वेळ आलीय, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

### ७ मे २०२५
### ऑपरेशन सिंदूरचा धडाका



भारताने बुधवारी मध्यरात्री दीड वाजता पाकिस्तान आणि व्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांच्या नऊ ठिकाणांवर हल्ले केले. भारताच्या एअर स्पेसमधूनच हे हल्ले दहशतवाद्यांच्या ठिकाणांवर करण्यात आले. यामध्ये १०० हून अधिक दहशतवाद्यांचा खात्मा झाल्याची माहिती भारताने दिली. विंग कमांडर व्योमिका सिंग, कर्नल सोफिया कुरेशी आणि विदेश मंत्रालयाचे सचिव विक्रम मिसरी यांच्याकडून पत्रकार परिषद घेत माहिती देण्यात आली. भारताने बहावलपूर, मुरीदके, सवाई, गुलपूर, बिलाल, कोटली, बरनाला, सरजाल,महमूना या ठिकाणी हल्ले केले.जैश-ए-मोहम्मद,लष्कर-ए-तोयबा,हिजबुलच्या ठिकाणांवर भारताने हल्ले केले. भारताने या ऑपरेशनला 'ऑपरेशन सिंदूर' हे नाव दिले.

### ९ मे २०२५
### २८ दहशतवाद्यांचा खात्मा


पाकिस्तानचा आंतरराष्ट्रीय सीमा रेषा आणि नियंत्रण रेषेवर ३०० ते ४०० ड्रोनचा वापर करण्यात आला. भारताने यातील काही ड्रोन पाडले. मोठ्या प्रमाणावर हवाई घुसखोरीचा प्रयत्न, एअर डिफेन्स यंत्रणेची माहिती गोळा करणे, गोपनीय माहिती गोळी करणे हा त्यांचा उद्देश होता. भारताने पाकिस्तानच्या चा ठिकाणांवर हल्ला केला. एका ठिकाणचे एडी रडार केंद्र उद्ध्स्त करण्यात आले. पाकिस्तानकडून करण्यात आलेल्या आगळिकीमुळे भारताचे काही जवान हुतात्मा झाले तर काही नागरिकांना जीव गमवावा लागला. भारताने प्रत्युत्तरादाखल केलेल्या हल्ल्यात २८ दहशतवाद्यांचा खात्मा झाला.



### फ्रंटवर आल्या महिला अधिकारी!

पाकिस्तान समर्थित दहशतवादी हल्ल्याला चोख प्रत्युत्तर देणाऱ्या भारताने याच कालावधीत एक नवा इतिहास रचला. पहलगाम हल्ल्यात अनेक महिलांचे सिंदूर नष्ट झाले तेव्हा भारतीय लष्करातील महिलांनी त्याचा बदला घेण्याची जबाबदारी स्वीकारली. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये महिला अधिकाऱ्यांना महत्त्वाची भूमिका देण्यात आली. लष्करी कारवायांव्यतिरिक्त, भारतीय लष्कराच्या कर्नल सोफिया कुरेशी, भारतीय हवाई दलाच्या कमांडर व्योमिकासिंग यांनी ऑपरेशन सिंदूर दरम्यान संयुक्तपणे माध्यमांना संबोधित करत जगासमोर भारताचा कणखरपणा ओजस्वीपणे मांडला. सोफिया कुरेशी या बहुराष्ट्रीय लष्करी सरावात लष्कराचे नेतृत्व करणाऱ्या पहिल्या भारतीय महिला अधिकारी असून त्यांनी संयुक्त राष्ट्रांच्या शांतता मोहिमेतही काम केले आहे. २१,६५० फूट उंच माऊंट मणिरंग जिंकणाऱ्या तिन्ही सैन्य विभागातील महिलांच्या संघात व्योमिकासिंग यांचा समावेश होता.

### १० मे २०२५
### अखेर शस्त्रसंधी



जगभरात नाचक्की झालेल्या पाकिस्तानने गुजरात, जम्मू आणि काश्मीर, राजस्थान आणि पंजाब या चार राज्यांमधील २६ शहरांवर ड्रोन हल्ले केले. श्रीनगर विमानतळावरही हल्ल्याचा प्रयत्न झाला. उत्तरेत जम्मूमधील बारामुल्ला ते पश्चिमेत गुजरातमध्ये भुज दरम्यान पाकिस्तानने २६ शहरांना लक्ष्य केले. भारतीय वायूदलाने केलेल्या प्रतिहल्ल्यात पाकिस्तानमधील मुरीद चकवाल, शोरकोट, रहीम यार खान, चुनियां, नूर खान आणि सुक्कूर हवाई तळांवर हल्ले करून पाक लष्कराच्या महत्त्वाच्या रणनीतिक संसाधनांना धक्का दिला. या संघर्षानंतर भारत आणि पाकिस्तान दोन्ही देशांकडून शस्त्रसंधीवर सहमती दर्शवण्यात आली. पाकिस्तानच्या डीजीएमओ यांनी भारताच्या डीजीएमओ यांना फोन करण्यात आला. यानंतर दोन्ही देशांकडून गोळीबार, जमिनीवरून हल्ले, हवाई आणि सागरी कारवाया थांबवण्यात आल्या.

### 'ऑपरेशन महादेव'चे तांडव



हिंदू देवतांपैकी एक असणारे महादेव सृष्टीमध्ये लयतत्वाचे नायक आहेत. वाईटाचा संहार हा महादेवाचा अंगभूत गुण असल्याने पहलगाम हल्ल्यातील गुन्हेगारांना शासन करण्यासाठी आखण्यात आलेल्या मोहिमेला 'ऑपरेशन महादेव' असे नाव देण्यात आले. २६ पर्यटकांची हत्या करणाऱ्या दहशतवाद्यांवर भारतीय लष्कराने घाव घातला. हल्ल्याचा म्होरक्या हाशिम मूसा याला जवानांनी यमसदनी पाठवले. लिडवास परिसरात लष्कराने ऑपरेशन महादेव राबवले, यात तीन दहशतवादी ठार झाले. विशेष म्हणजे महादेव शिखराला लागू असलेल्या भागातच ही मोहीम राबवण्यात आले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# महायुती फुटली; भाजपाला आव्हान मित्रपक्षाचेच

● सोलापुरात तिरंगी लढत; विद्यमान ४९ नगरसेवक अन् सक्षम इच्छुकांमुळे भाजपा स्वबळावरच; वाद बाजूला ठेवत महाविकास आघाडी एकवटली

● शिंदे सेना-अजित राष्ट्रवादी युती; एमआयएम फुटली अन् वंचित सोबत आल्याने काँग्रेस खुष; दोन सेना, दोन राष्ट्रवादीमुळे मत विभागणी!

**तभा वृत्तसेवा । सोलापूर, दि. २९ डिसेंबर-**

**भाजपाचे विद्यमान ४९ नगरसेवक आणि आ.देवेंद्र कोठेंबरोबर आलेले काही माजी नगरसेवकांसह भाजपाकडून लढविण्यासाठी निष्ठावंत सक्षम इच्छुकांची संख्या मोठी असल्याने भाजपाला मित्रपक्षांना जास्तीच्या जागा देणे शक्यच नसल्याने अपेक्षेप्रमाणे सोलापूर महापालिकेसाठी महायुती होवू शकली नाही. भाजपासोबत एकट्याने लढणे सोपे नसल्याचे ओळखून महायुतीतील मित्रपक्ष शिंदे शिवसेना आणि अजित राष्ट्रवादी यांनी एकत्र येत युतीची घोषणा केली आहे. तर निरंतर सुरु असलेल्या पक्षफुटीसह विविध कारणांनी बॅकफूटवर असलेल्या काँग्रेस-उबाठा-शरद राष्ट्रवादी या महाविकास आघाडीने काळाची गरज ओळखून आघाडीची घोषणा करत उमेदवारी यादी जाहीर करून किमान पक्ष तरी फुटणार नाही याची दक्षता घेतली आहे.**

**भाजपाला मात्र मित्रपक्षांसह पक्षातील नाराज नेते, निष्ठावंतांसह विरोधी महाविकास आघाडीशी देखील या निवडणुकीत दोन हात करावे लागणार आहेत. गत महापालिकेत ९ नगरसेवक असलेल्या एमआयएम पक्षात मोठी फूट पडल्याने यावेळी मतविभागणीला आळा बसण्याच्या आशेने काँग्रेस खुष असणार असून दुधात साखर म्हणजे ज्यांच्यामुळे लोकसभा, विधानसभेत काँग्रेसला मतविभागणीचा मोठा फटका बसला होता; तो वंचित पक्षदेखील काँग्रेससोबत असणार आहे. शेवटच्या टप्प्यातील वेगवान घडामोडींमुळे यंदा महापालिकेची निवडणूक रंगतदार होण्याची दाट शक्यता आहे.**

गतवेळी महापालिकेत एकहाती सत्तेत असलेल्या भाजपाला सोलापुरात महायुती करण्यात अडचणी येणार असल्याने यंदा महायुती होण्यामध्ये संदिग्धतता अशा बातम्या दैनिक सोलापूर तरुण भारतने प्रसिध्द केल्या होत्या. नेमके तेच घडले असून जागा वाटप बोलणीच्या अखेरच्या टप्प्यात महायुती तुटली असून भाजपा-शिंदे सेनेतील बोलणी फिसकटल्याने अजित राष्ट्रवादी आणि शिंदे सेना यांनी युतीची घोषणा करत भाजपाला टक्कर देण्याचा पवित्रा घेतला आहे. शिंदे सेनेकडून मागितलेल्या जागा देणे भाजपाला शक्य नव्हते. तर इकडे जागा वाटपात आपली डाळ शिजणार नाही, हे लक्षात घेवून अजित राष्ट्रवादीने सुरुवातीपासूनच सोलापुरात एकला चलो रे चा नारा दिला होता. आता महापालिकेची मुख्य लढत ही केंद्र आणि राज्याच्या सत्तेत एकत्र असलेल्या महायुतीच्या मित्रपक्षांमध्येच होण्याची शक्यता अधिक आहे. कारण महाविकास आघाडीमधील काँग्रेस-उबाठा-शरद राष्ट्रवादी या तीनही पक्षातील नेते पक्षफुटीमुळे पुरते हैराण आहेत.


भाजपा विरुध्द शिंदे सेना-अजित राष्ट्रवादी असे लढत असले तरी शिवसेना दोन आणि राष्ट्रवादीदेखील दोन पक्ष असल्याने महापालिका निवडणुकीत यांच्यामध्ये होणाऱ्या मतविभागणीचा लाभ कुठेतरी दुसऱ्याच पक्षाला होणार, हे देखील दुर्लक्षून चालणार नाही. महायुतीत सोबत न घेतल्यामुळे नाराज मित्रपक्षांकडून आता भाजपाला अडचणीत आणण्यासाठी आघाडीतील काही उमेदवारांसोबत छुपा अजेंडाही राबविला जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे. कारण लोकसभा आणि विधानसभेला आम्ही भाजपाचे काम केले. पण स्थानिकच्या म्हणजेच कार्यकर्त्यांच्या निवडणुकीत मात्र भाजपाने आम्हाला सोबत घेतले नसल्याची सल भाजपाचे मित्रपक्ष बोलून दाखवत असल्याने राजकारण रंगणार आहे.



प्रशांत माने
मो.९८८११९१४४३

एकूण १०२ नगरसेवकांपैकी मित्रपक्ष शिंदे सेना ५१ आणि अजित राष्ट्रवादी ५१ जागा लढविण्यावर युती झाली आहे. तर भाजपाकडे विद्यमान माजी नगरसेवकांची साठची संख्या सोडल्यास उर्वरित चाळीस जागांवर त्यांना सक्षम म्हणजेच विजयाचा निकष पूर्ण करणारे उमेदवार शोधावे लागणार आहेत. आपले कार्यकर्ते उमेदवारांना तिकिट मिळण्यासाठी दोन्ही आमदार देशमुखांनी थेट पक्ष आणि पालकमंत्र्यांच्या विरोधातच बंडाचा पवित्रा घेतला होता. त्यांच्या सर्वच कायकर्त्यांना उमेदवारी न मिळाल्यास पक्षांतर्गत नाराजीचे पडसाददेखील निकालावर होणार आहेत. भाजपाचे दोन आमदार देशमुख आणि भाजपाचेच आमदार देवेंद्र कोठे यांच्यात देखील सख्य दिसत नाही. आ.विजयकुमार देशमुख आणि शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांच्यातील मतभेद तर निवडणुकीपूर्वीच चव्हाट्यावर आलेले होते. एकूणच, काय तर शिस्तीच्या भाजपालाच बेशिस्तीचे ग्रहण लागल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. महापालिकेत सत्ता असताना आणि मंत्री असतानाही ज्या पध्दतीने पक्षश्रेष्ठींचे आदेश डावलून पक्षांतर्गत वादाचे राजकारण सोलापूरकरांनी पाहिले, त्यामुळेच पक्षाने देखील यंदा भाजपाच्या यंग ब्रिगेडच्या हातात निवडणुकीची सूत्रे दिल्याचे जाणवते. पालकमंत्री जयकुमार गोरे, अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी, शहर मध्यचे आमदार देवेंद्र कोठे या युवक नेत्यांच्या हातात भाजपाने सूत्रे दिली आहेत. पक्षाच्या श्रेष्ठनेतृत्वाने युवाशक्तीला सूत्रे देवून त्यांना राजकीय ताकद दिली. यावरुन नाराज होवून पक्षाविरोधात बंडाचा पवित्रा घेणाऱ्यांकडे पक्ष निवडणुकानंतर व्यवस्थित लक्ष दिले जाईल, असे पक्षातूनच चर्चिले जात आहे. पक्षांतर्गत नाराजीमुळे यंदा पाडापाडीची राजकारण रंगू शकते.





महाविकास आघाडीत मात्र काळाची गरज ओळखून पावले टाकली जात आहेत. काँग्रेस-उबाठा-शरद राष्ट्रवादी यांनी आघाडीची घोषणा तातडीने केली व यादीही जाहीर केली आहे. काँग्रेसला यंदा वंचितची साथ आहे तर एमआयएममधील फाटाफूट हे काँग्रेसच्या पथ्थ्यावर पडणार आहे. कारण वंचितचे ॲड.प्रकाश आंबेडकरांमुळे समाज एकवटेल तर मुस्लिम मतांची साथ काँग्रेसला मिळण्याची शक्यता आहे. उबाठा आणि शरद. राष्ट्रवादीकडेही मुस्लिम मतांचा ओढा असणार आहे. यावेळी महायुतीतील मित्रपक्ष स्वतंत्र लढूनही त्यांना ठराविक व्होट बँकेचा लाभ होणार नाही. कारण भाजपाला ही मते पडत नाहीत तर एकनाथ शिंदे सेनेलाही जात नाहीत. अजित राष्ट्रवादीकडे ओढा असला तरी शिवसेनेची युती झाल्यामुळे इथेही अडचण आहे. महायुतीतील फूट, भाजपातील नाराजीचा परिणाम नेमका काय होणार आणि वंचित आणि मुस्लिम मतांचा लाभ महाविकास आघाडीला होणार का हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

आपल्या पक्षात उमेदवारी न मिळालेले नाराज ऐनवेळी ज्या पक्षात संधी मिळेल तिकडे प्रवेश करीत असल्याने ३१ डिसेंबरलाच कोण कोणत्या पक्षाकडून लढणार हे चित्र स्पष्ट होणार आहे.

एकूणच, काय तर यंदाची महापालिका निवडणुक रंगतदार तर होणारच पण सर्वच राजकीय पक्षांसह नेत्यांचीही प्रतिष्ठा पणाला लावणारी आहे. अनेकांची भवितव्य या निकालावर असणार हे मात्र नक्की.

### राजकीय पक्षांसह अनेक नेत्यांची प्रतिष्ठा पणाला

केंद्र व राज्यात महायुतीत असलेले राजकीय पक्ष महापालिका निवडणुकीत विरोधात लढत आहेत. तर महाविकास आघाडीसमोर राजकीय अस्तित्व टिकविण्याचे आवाहन आहे. नगरपालिका निवडणुक निकालानंतर अपेक्षित यश मिळाले नाही. पण भाजपाचा परफॉर्मन्स चांगला असल्याचे सांगत पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी स्वतःच स्वतःची पाठ थोपटून घेतली. तर निवडणुकीपूर्वीच पालकमंत्री म्हणजे पक्षाविरोधातच बंडाचा पवित्रा घेवून अडचणीत आलेले दोन्ही आमदार देशमुख आणि आपल्यासोबत भाजपात आलेल्या शिवसेनेच्या नगरसेवकांना निवडून आणण्यासह मतदारसंघात जास्तीचे नगरसेवक निवडून आणण्यासाठी आ.देवेंद्र कोठे, एकूणच पुन्हा सत्तेसाठी शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. निकालावरच यांचे पक्षातील राजकीय स्थान निश्चित होणार आहे. भाजपाचे मित्रपक्ष आणि महाविकास आघाडी यांची तर सत्वपरीक्षाच म्हणावी लागणार आहे.

### अजित पवार राष्ट्रवादीची जातीच्या मतांची गणिते...

विधानसभेचे उपाध्यक्ष आण्णा बनसोडे आणि जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्यावर या निवडणुकीची जबाबदारी देवून अजित राष्ट्रवादीने धनगर आणि दलित मतांची गोळाबेरीज केलीय. तर शहराध्यक्ष संतोष पवार मराठा आणि कार्याध्यक्ष जुबेर बागवात यांच्या माध्यमातून मुस्लिम मतांवर डोळा ठेवत जातीची गणित जुळवली आहेत. शिंदे सेनेची मदार मंत्री भरत गोगावले, मंत्री प्रताप सरनाईक, माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे, प्रदेश प्रवक्त्या प्रा.डॉ.ज्योती वाघमारे, जिल्हाप्रमुख अमोलबापू शिंदे, मनिष काळजे, महेश साठे यांच्यावर आहे. निकालानंतर सत्तेसाठी कोण, कोणासोबतही युती-आघाडी केल्यास आश्चर्य नको.

## महत्त्वाचे

### चीनने तैवानला वेढले, सैन्य सराव सुरू

**तैपेई :** चीनने तैवानला पाचही बाजूंनी वेढून मोठ्या प्रमाणावर लष्करी सराव सुरू केला आहे. चिनी सैन्याने तैवानच्या उत्तर, ईशान्य, पश्चिम, दक्षिण आणि पूर्वेकडील किनारपट्टीजवळ वेगवेगळे झोन तयार करून थेट गोळीबाराचा सराव सुरू केला आहे. चीनच्या कारवाईला प्रत्युत्तर म्हणून तैवाननेही प्रति-लढाऊ सराव सुरू केला आहे. तैवानच्या संरक्षण मंत्रालयाने सांगितले आहे की, त्यांचे भूदल, नौदल आणि वायुदल सतर्कतेवर ठेवण्यात आले आहेत. चिनी हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. तैवानने आपल्या सैन्याला तैनात करून लढाऊ-सज्जता सराव सुरू केला आहे. तैवानने चीनवर प्रादेशिक शांतता आणि स्थिरता कमकुवत केल्याचा आरोप केला आहे. तैवान कोस्ट गार्डनुसार, चीनच्या लष्करी सरावामुळे जहाजांची वाहतूक आणि मच्छिमारांच्या सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे.

### बहिणीसोबत मिळून पतीने केली पत्नीची हत्या

**पालघर :** पालघरमध्ये पोलिसांनी एका महिलेच्या हत्येप्रकरणी तिच्या पतीला आणि नणंदेला अटक केली आहे. पोलिसांनी सांगितले की, हुंड्यात मिळालेले सामान आणि भेटवस्तू परत मागितल्यामुळे कल्पना सोनी (३५) हिची हत्या करण्यात आली होती. पोलिसांनुसार, २०१५ मध्ये कल्पनाचे लग्न महेश सोनी (३८) सोबत झाले होते. २७ डिसेंबर रोजी तिचा पती आणि सासरच्या मंडळींशी वाद झाला होता. याच दरम्यान पती महेश आणि नणंद दीपाली सोनी यांनी कल्पनाच्या डोक्यावर शस्त्राने हल्ला केला. कल्पना गंभीर जखमी झाली. शेजाऱ्यांनी तिला रुग्णालयात नेले. जिथे डॉक्टरांनी कल्पनाला मृत घोषित केले. कल्पना आणि महेशला सात वर्षांची मुलगी देखील आहे.

### दगड गिळल्याने चिमुकल्याचा मृत्यू

**मलप्पुरम् :** केरळमधील मलप्पुरम् येथील चांगलमकुलम येथे एक वर्षीय चिमुकल्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. अंगणात खेळत असताना त्याने एक दगड गिळला, जो त्याच्या घशात अडकला आणि त्याला श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. मुलाला ताबडतोब खाजगी रुग्णालयात नेण्यात आले, परंतु डॉक्टरांना त्याचा जीव वाचवता आला नाही. मुलाचे नाव असलम नोआ असून तो महरूफ आणि रूमाना या दाम्पत्याचा मुलगा होता.

# अंदाजपत्रक व कार्यादेश यांच्यात मोठी तफावत

## २०२३-२४ मधील नावीन्यपूर्ण योजनेतील गैरव्यवहार




जिल्हा क्रीडा संकुल, सह्याद्री अकादमीचे कार्यालय

**◆ गोंदिया, २९ डिसेंबर**

जिल्हा क्रीडा कार्यालयांतर्गत २०२३-२४ वर्षासाठी राबविण्यात आलेल्या नावीन्यपूर्ण योजनेतील अनेक गैरप्रकार माहिती अधिकारांतर्गत प्राप्त माहितीवरून चव्हाट्यावर येत असून, अधिक अभ्यास केला असता अनेक तथ्य उजागर होत आहेत. योजनेच्या अंदाजपत्रक व वर्क ऑर्डरमध्ये तफावत असल्याचे समोर आले आहे. जिल्हा क्रीडा कार्यालयाने सह्याद्री अकादमीला जारी केलेल्या कार्यारंभ आदेशात अंदाजपत्रकातील नमूद प्रशिक्षण बाबींना बगल देत वर्क ऑर्डरमध्ये संगनमत करून सह्याद्री अकॅडमीला आर्थिक लाभ कसा होईल, याचाच विचार केल्याचे दिसून येते.

जिल्हा नियोजन समितीला सादर केलेल्या प्रस्तावात तत्कालीन जिल्हा क्रीडा अधिकारी नंदा खुरपुडे यांनी युपीएससी, एमपीएससीचे प्रशिक्षण ५०१ विद्यार्थ्यांना प्रति लाभार्थी खर्च ४,९९९ रुपये व जीएसटीसह एकूण अंदाजित खर्च २५ लक्ष असा सादर केला. तर वर्क ऑर्डरमध्ये विद्यार्थी संख्या ५१ नमूद केली. यासाठी खर्च फक्त १० हजार रुपये म्हणजेच प्रति लाभार्थी जवळपास १९६ रुपये दर्शविला. नियमानुसार अंदाजपत्रकातील विद्यार्थी संख्या वर्क ऑर्डरमध्ये कमी करता येत नाही. फक्त प्रशिक्षण शुल्क निविदा प्रक्रियेत भाग घेतलेल्या संस्थांनी टाकलेल्या दरानुसार सर्वात कमी दर अंतिम करता येतो.

मूळ अंदाजपत्रकात सरळसेवा भरतीसाठी प्रति संच ५ हजार रुपयांप्रमाणे ४ हजार अभ्यास साहित्य संच विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे होते. यासाठी अंदाजित खर्च २ कोटी होता, प्रत्यक्षात दोन्ही उपक्रमांना निधी एक कोटी देण्यात आला. अंदाजपत्रकात प्रशिक्षणाचे २५ लाख वजा करता ७५ लक्ष निधी १५०० संचांसाठी उपलब्ध करून देण्यात आला. तर वर्क ऑर्डरमध्ये संचाची संख्या ५०० ने वाढवून ती २००० करण्यात आली. ही संख्या तत्कालीन जिल्हा क्रीडा अधिकारी नंदा खुरपूडे यांनी कशी काय वाढविली, हा चौकशीचा विषय आहे. तसेच २००० संचासाठी मूळ १५०० संचाच्या तरतुदीला बगल देत नंदा खुरपुडे यांनी ७५ लाखांऐवजी २००० संचासाठी ९९.९० लाख रुपये सह्याद्रीला उपलब्ध करून दिल्याचे प्राप्त माहितीवरून दिसून येते. *(तभा वृत्तसेवा)*

### गोंदियात लाखो पुस्तके विकणे अशक्य

जितक्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण तितक्याच व त्याच विद्यार्थ्यांना मोफत संच वाटप, अशी उपक्रमाची रुपरेषा असणे आवश्यक होते. एकंदरीत एमपीएससी, युपीएससी ऑनलाईन मोफत प्रशिक्षणाच्या नावाखाली खुल्या बाजारात गोंदिया जिल्ह्यात लाखोंची पुस्तके विकणे शक्य नाही, त्यामुळे ही पुस्तके बाजारभावाच्या तिप्पट दरात शासकीय निधीतून खपविणे हा प्रमुख उद्देश असल्याचे निदर्शनास येते.



उत्तर भारतात कडाक्याची थंडी आणि धुक्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. धुक्यामुळे अनेक रेल्वेगाड्यांचे वेळापत्रक कोलमडले आहे. रेल्वेगाड्या विलंबाने धावत असल्याने पाटणा रेल्वेस्थानकावर झालेली प्रवाशांची गर्दी

# दीनदयालमधील स्वयंसिद्धांना कांचन गडकरी ऐकतात तेव्हा...



कांचन गडकरींसमवेत शेतकरी महिला

**विवेक कवठेकर**

**◆ यवतमाळ, २९ डिसेंबर**

ताई, आमचे 'हे' सोडून गेले तेव्हा मला काहीच समजत नव्हतं. घरी लहान लहान लेकरं. त्यांचं शिक्षण, घर सांभाळणं, शेतीचं काय करावं ? साऱ्या समस्याच समस्या होत्या. पण या संस्थेतले हे लोक भाऊ म्हणून आले. त्यांनी धीर दिला. 'तुला जे जमेल ते कर, आम्ही आहोत मदतीला' म्हणून आधार दिला. त्यातून थोडं बळ आलं. दर भाऊबीजेला साडी-चोळी करणारे, मुलांच्या शिक्षणाची सोय करून देणारे आणि मला शेळ्या, आटाचक्कीच्या रूपाने स्वयंरोजगार उभा करून देणाऱ्या या संस्थेमुळे आज मी ताठ मानेने जगू शकते. एका पोरीला शिकवून एलएलएम केलं. दुसरी मुलगी पदवीधर होऊन आपल्या सासरी सुखात आहे. मुख्य म्हणजे, माझ्याकडे पाहण्याची समाजाची दृष्टीसुद्धा बदलली आहे.

हे आत्मविश्वासपूर्ण, तितकेच हृदय मनोगत होते नेर तालुक्यातील शिरसगावच्या जयश्री सावंकार या स्वयंसिद्धेचे.

यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्याग्रस्त परिवारातील महिला आता अबला राहिल्या नाहीत. आपलं दुःख कुरवाळत बसत नाहीत. प्राप्त परिस्थितीत स्वाभिमानाने जगायला त्या शिकल्या. प्रत्येकीची एकेक यशोगाथा आहे. अशा ५०० महिलांना दत्तक घेऊन, त्यांच्यात जगण्याचं बळ देणाऱ्या दीनदयाल सेवा प्रतिष्ठानच्या निळोणा स्थित दीनदयाल प्रबोधिनीत संस्थेच्या उपाध्यक्ष ज्योती चव्हाण, सचिव विजय कद्रे, संचालक नीलिमा मंत्री यांच्या उपस्थितीत कांचन गडकरींसोबत हा संवाद सुरू होता.

संस्कार भारतीच्या विदर्भ प्रांताध्यक्ष कांचन गडकरी या खास शेतकरी महिलांच्या कर्तृत्वगाथा ऐकायला वेळ काढून आल्या. त्यांनी संस्थेत येतानाच, या शेतकरी महिलांशी बोलायची इच्छा व्यक्त केली आणि सुरू झाला कर्तृत्ववतींशी भावगर्भ संवाद !

यवतमाळ जिल्ह्यातील ३५ स्वयंसिद्धा भगिनी त्यासाठी आल्या होत्या. त्यांच्याबरोबरच आपल्या घराशेजारी परसबाग फुलवून त्याद्वारे आपल्या कुटुंबाचे आरोग्य राखण्यासोबतच उरलेली भाजी विकून चरितार्थ चालवणाऱ्या किचन गार्डन प्रकल्पातील २० महिलाही आल्या होत्या. सोबतच पारधी बेड्यांवर स्वास्थ्यविषयक कार्य करीत आलेल्या आरोग्यरक्षक महिला देखील या संवादप्रसंगी उपस्थित होत्या.

अशा रणरागिणींचे वंशज असणाऱ्या तुम्ही सर्वांनीही परिस्थितीवर खंबीरपणे मात केली. आपल्यासारखे दुःख भोगणाऱ्या इतर महिलांनाही आधार द्यायला शिका. त्यांच्याही पंखात तुमच्या प्रेरणेचे बळ येऊ द्या. दीनदयाल सेवा प्रतिष्ठान आणि या विचाराची सर्व मंडळी नक्कीच पाठीशी राहतील, आधार देतील असा विश्वासही त्यांनी बोलून दाखवला.

### महिला अबला नाहीत तर सबला आहेत

कांचन गडकरींनी त्यांच्यापैकी प्रत्येकीला त्या कुठल्या भागातून आल्या? त्यांची कौटुंबिक, सामाजिक परिस्थिती कशी होती? आजची स्थिती कशी आहे, इत्यादी विषयात चर्चा केली. एकेकीचे मनोगत ऐकताना त्या कधी गंभीर झाल्या, कधी डोळे पाण्याने डबडबले तर कधी चेहऱ्यावर प्रसन्न हास्य उमटले. सरतेशेवटी या सर्व महिलांना मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या की, आपला देश कर्तृत्वशालिनींचा आहे. शिवरायांना घडवणाऱ्या जिजाऊ, राज्यकारभार सांभाळणाऱ्या अहिल्यादेवी आणि इंग्रजांशी लढताना तटावरून घोडा फेकणाऱ्या झाशीच्या राणीचा हा देश आहे. त्यांनी आपल्या आयुष्यातील दुःख पचवून रडायला नव्हे तर लढायला शिकवले. त्यांच्यामुळेच महिला अबला नाहीत, सबला आहेत हे आपल्याला कळले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# परिवर्तनाचे पर्व!

काही गोष्टी योगायोगासारख्या असतात. वरवर पाहता त्यांचा एकमेकांशी संबंध दिसत नाही. पण त्यामागे लपलेले काही अदृश्य बिंदू जोडले की त्यातून तयार होणारे चित्र त्याचा अर्थ स्पष्ट करतात. राजकारणात तर अलिकडच्या काळात अशा विचित्र योगायोगांना बहरच आला आहे. जेमतेम पंधरावीस दिवसांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या एका वक्तव्याचे दुवे राजकारणाशी अशाच काहीशा अनपेक्षित प्रकारे जोडले जातील या योगायोगाची तेव्हा कोणी कल्पनाही केली नसेल. रशियाचे अध्यक्ष ब्लादिमिर पुतिन यांच्या स्वागत समारंभाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या मेजवानीस काँग्रेसचे नेते व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी किंवा काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांच्याऐवजी त्या पक्षाचे ज्येष्ठ खासदार शशी थरूर यांना विशेष अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आल्याने काँग्रेस व केंद्र सरकारमधील वाद गाजत असतानाच पंतप्रधानांनी त्याच दरम्यान केलेले एक वक्तव्य अशाच एका योगायोगाचे मूळ ठरू पाहात असल्याचे ध्यानी येऊ लागले आहे. येत्या दहा वर्षांत गुलामगिरीची मानसिकता संपुष्टात आणू असा निर्धार त्यांनी व्यक्त केला, त्याच दरम्यान, काँग्रेसमध्ये सुरू झालेल्या वादावर स्वत: थरूर यांनीच निर्भीडपणे उत्तर दिले. या मेजवानीचे निमंत्रण आपल्याला मिळाले आहे आणि मी त्यास उपस्थित राहणार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले, तेव्हा काँग्रेसच्या तंबूतील अनेकांच्या भुवया आश्चर्याने उंचावल्या होत्या. निमंत्रणाच्या मुद्यावरून एका बाजूला पक्ष केंद्र सरकारला धारेवर धरण्याची तयारी करत असताना त्याच पक्षाचा एक खासदार निर्भयपणे पक्षाच्या भूमिकेहून थेट वेगळी भूमिका घेतो हे स्पष्ट झाले, तेव्हा काही मोजक्यांच्या मनात तरी, मोदी यांच्या त्या वक्तव्यातून अप्रत्यक्षपणे उमटणाऱ्या वेगळ्या अर्थाचा उलगडा नक्कीच झाला असेल आणि मोदी यांनी ज्या गुलामगिरीचा उल्लेख केला तो संकेत काँग्रेसच्या दिशेने तर नसेल अशी शंकाही काहींच्या मनात नक्कीच आली असेल. काँग्रेसमध्ये गांधी घराण्याशी निष्ठा म्हणजेच पक्षनिष्ठा असे मानण्याची परंपरा पूर्वीपासूनच चालत आली आहे. 'इंदिरा इज इंडिया' हे स्तुतिस्तोत्र जेव्हा पहिल्यांदा गायिले गेले, तेव्हापासून हीच परंपरा जोपासली जात आहे. त्यामुळे आपल्या अशा देशभक्तीचे प्रदर्शन घडविण्याची संधी अनेक जण सातत्याने शोधत असताना, थरूर यांच्यासारख्या नेता मात्र त्याहून वेगळी भूमिका घेतो आणि परंपरेला छेद देतो, तेव्हा गुलामगिरीच्या मानसिकतेतून मुक्ततेच्या मोदी यांच्या संकल्पाचा पहिला संकेत थेट काँग्रेसी मानसिकतेकडेच असावा याविषयी खात्रीदेखील पटू लागते. काँग्रेसमध्ये गेल्या सुमारे दहा-अकरा वर्षांत, विशेषतः राहुल गांधी हेच पक्षाचे सर्वेसर्वा नेते आहेत आणि त्यांच्या नेतृत्वास कोणत्याही प्रकारे आव्हान दिले जाणार नाही यासाठी पक्षांतर्गत पातळीवर काही निष्ठावंतांकडून जोरदार मोर्चेबांधणी सुरू असल्याने अनेक जण मूकपणे याकडे पाहात असले, तरी त्यांच्या मनातील अस्वस्थता मात्र लपून राहिलेली नाही. पहलगामवरील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताची भूमिका जगासमोर स्पष्ट करण्यासाठी विदेशात पाठविलेल्या शिष्टमंडळांपैकी एका शिष्टमंडळात शशी थरूर यांचा समावेश होता आणि या शिष्टमंडळाने अमेरिका, पनामा, ग्वायना, ब्राझील, कोलंबिया आदी देशांना भेट देऊन भारताची दहशतवादाविरोधातील भूमिका स्पष्ट केली होती. मात्र, याचे पडसाद काँग्रेसमध्ये उमटले आणि त्यातून पक्षांतर्गत मतभेदही उघड झाले. थरूर यांनी पक्षाची परवानगी न घेता शिष्टमंडळात सहभागी होण्यास संमती दिल्याचा आक्षेप घेत काँग्रेसच्या काही श्रेष्ठींनी नाराजीचा सूर लावला असला, तरी पक्षातीलच काहींनी मात्र त्यांच्या सहभागाचे राष्ट्रहिताची बाब म्हणत धीटपणाने समर्थनही केले होते. बहुधा, पक्षांतर्गत गांधीनिष्ठेच्या मानसिकतेतून बाहेर पडण्याच्या नव्या प्रक्रियेस येथे नवा प्रारंभ झाला असे म्हणता येईल.

आता त्या कुजबुजत्या सुरांना कंठ फुटू लागला आहे. असंख्य निवडणुकांत केवळ पराभवच पाहावा लागलेल्या राहुल गांधी यांच्या नेतृत्वाऐवजी प्रियांका गांधी यांना काँग्रेसच्या पंतप्रधानपदाचा चेहरा म्हणून पुढे आणण्याच्या मागणीचा कुजबुजता सूरदेखील आता उमटू लागला आहे, हा देखील कदाचित गुलामगिरीच्या मानसिकतेतून बाहेर पडण्याच्या प्रक्रियेचाच एक भाग असावा. काँग्रेसच्या १४० व्या स्थापना दिन सोहळ्याच्या काही तास अगोदर पक्षाचे सर्वांत निष्ठावंत मानले जाणारे नेते दिग्विजय सिंह यांनी पक्षाच्या नेतृत्वास झोंबणारी काही मते व्यक्त केली. दिग्विजय सिंह यांनी समाज माध्यमावरील एका टिप्पणीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संस्काराची आणि पंतप्रधान मोदी यांच्या संघनिष्ठेची भरभरून प्रशंसा केली आणि थरूर यांच्यामुळे उद्‌भवलेल्या वादळापाठोपाठ नवे वादळ पक्षात घोंघावू लागले. दिग्विजय सिंह यांचे हे मत काँग्रेसच्या विचारसरणीविरोधात असल्याची टीका पक्षाचे अन्य अनेक नेते आता करत असले, तरी शशी थरूर यांच्यासारख्या नेत्याने मात्र त्यांच्या मताशी सहमतीदेखील दर्शविली आहे. दिग्विजय सिंह यांनी व्यक्त केलेले हे मत राहुल गांधी यांच्या भूमिकेशी संपूर्ण असहमती दर्शविणारे आहेच, पण राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसची संघटनात्मक वाताहत होत असल्याची भावनाही व्यक्त करणारे आहे. त्यामुळे आता काँग्रेसमध्ये गुलामगिरीच्या परंपरेचे पाईक समजणारे घराणेशाहीचे निष्ठावंत आणि गलामगिरीची मानसिकता झुगारून थेट व्यक्त होण्याचे धाडस दाखविणारे पक्षाचे निष्ठावंत अशी दुफळी दिसू लागली आहे. कदाचित, दिग्विजय सिंह यांचे पक्षातील स्थान संथपणे संपुष्टात येण्याची प्रक्रिया येथून सुरू होईल आणि पक्ष पुन्हा आपल्या निष्ठेच्या परंपरागत वाटेवरून चालू लागेल, पण मानसिकतेत होणाऱ्या बदलाचे नवे रूप धारण केल्याचे चित्र मात्र आता लपविता येणार नाही. भाजपासारख्या पक्षातील एक सामान्य कार्यकर्ता पंतप्रधानपदापर्यंत पोहोचतो, ही संघाच्या शिस्तीची शक्ती आहे, असे मत दिग्विजय सिंह यांनी त्यांच्या समाज माध्यमावरील टिप्पणीतून व्यक्त केल्यानंतरही राहुल गांधी आणि दिग्विजय सिंह यांच्या योगायोगाने समोरासमोर झालेल्या भेटीतील राहुल गांधी यांच्या वक्तव्यातून दिग्विजय सिंह यांच्याविषयीच्या नाराजीचा कडवट सूर उमटला. तुम्ही बदमाशी करत आहात, या शब्दांत राहुल गांधी यांनी त्यांना सुनावले. त्या वेळीच वातावरण काहीसे हलकेफुलके दिसत असले तरी त्यातून निष्ठावंतांना योग्य तो संदेश मिळाला आहे. गुलामी मानसिकतेतून बाहेर पडण्याचा प्रयत्न सुमारे सहा वर्षांपूर्वी काही बंडखोरांनी केला होता. मात्र, त्या वेळी या बंडाचा बंदोबस्त करण्यात गांधीनिष्ठांना यश आले होते. मात्र, त्यानंतरही काँग्रेसमधील नाराजी खदखदत राहिली आहे, हे आता नव्याने स्पष्ट झाले आहे. भाजपामध्ये भाकरी फिरविण्याची पद्धत आहे, हे दिग्विजय सिंह यांचे मत थेट राहुल गांधी यांच्या नेतृत्वास आव्हान देणारे असल्याचे मानले जात आहे आणि त्यामुळेच आता दुफळीचे नवे परिणाम काँग्रेसमध्ये पाहावयास मिळणार आहेत. राहुल गांधींच्या राजकारणाचा देशातील जनतेवर कोणताही प्रभाव पडत नसल्याचे तर केव्हाच स्पष्ट झाले आहे. सातत्याने अदानी-अंबानी यांच्याविरोधात मोदी सरकारवर टीका करण्याच्या त्यांच्या भूमिकेतील हवा तर आता संथपणे काढली जात आहे. काँग्रेस आघाडीसोबत असल्याचे सांगणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटाचे नेते शरद पवार यांनी बारामतीमधील एका प्रकल्पाच्या उद्‌घाटनास उद्योगपती गौतम अदानी यांना सन्मानपूर्वक निमंत्रित केले आणि संपूर्ण पवार परिवाराने अदानी यांच्यावर स्तुतिसुमनांचा वर्षाव केला. उभ्या देशाने हे दृश्य अनुभवल्याने, अदानी-अंबानीविरोधाच्या निमित्ताने राहुल गांधी यांनी मोदी सरकारच्या विरोधात सुरू केलेल्या प्रतिमाहनन मोहिमेची हवा काढून घेतली गेली आहे. भाजपाविरोधी आघाडीला काँग्रेसखेरीज पर्याय नाही असा गुलामी मानसिकतेचा समज पुसला जात असल्यानेच हे लक्षण आहे. गुलामगिरीची मानसिकता नष्ट करण्याच्या मोदी यांच्या संकल्पाची सुरुवात राजकारणापासून झाली आहे, असे स्पष्ट संकेत आता मिळू लागले आहेत. एका परीने हे राजकारणातीलही परिवर्तनाचे पर्व ठरेल. ▮


## आंतरराष्ट्रीय

# बांगलादेशातील हिंसेमुळे भारत चिंतेत

**प्रा. जयसिंग यादव**

बांगलादेशचे संस्थापक शेख मुजीबुर रहमान हे पाकिस्तानबाबत खूप कठोर होते. त्यांनी बांगलादेशला मान्यता न दिल्याबद्दल पाकिस्तानचे अध्यक्ष झुल्फिकार अली भुट्टो (नंतरचे पंतप्रधान) यांच्याशी बोलण्यासही नकार दिला. सुरुवातीला पाकिस्तानने बांगलादेशचे स्वातंत्र्य नाकारले; परंतु पाकिस्तानची भूमिका अचानक बदलली. फेब्रुवारी १९७४ मध्ये लाहोरमध्ये 'ऑर्गनायझेशन ऑफ इस्लामिक कॉन्फरन्स' शिखर परिषद झाली. त्या वेळी भुट्टो पंतप्रधान होते आणि त्यांनी मुजीबुर रहमान यांना औपचारिक निमंत्रण दिले. मुजीबुर रहमान यांनी सुरुवातीला उपस्थित राहण्यास नकार दिला; परंतु नंतर ते स्वीकारले. २२ फेब्रुवारी १९७४ रोजी पाकिस्तानने बांगलादेशला मान्यता दिली. भुट्टो यांनी 'ओआयसी' शिखर परिषदेतच ही मान्यता जाहीर केली होती. भुट्टो यांनी मान्यता जाहीर करताना म्हटले, की अल्लाहच्या फायद्यासाठी आणि या देशातील नागरिकांच्या वतीने आम्ही बांगलादेशला मान्यता जाहीर करतो. उद्या एक शिष्टमंडळ येईल आणि आम्ही ७० दशलक्ष मुस्लिमांच्या वतीने त्यांना आलिंगन देऊ. असे असूनही, दोन्ही देशांमधील संबंधांवरचा बर्फ पूर्णपणे वितळला नव्हता. आता ५२ वर्षांनंतर दोन्ही देशांमधील परिस्थिती बदलत असल्याचे दिसून येते. शेख हसीना यांना सत्तेवरून काढून टाकल्यानंतर बांगलादेश आणि पाकिस्तानमधील ऐतिहासिक अंतर कमी होत आहे. या देशातील 'इन्किलाब मंच' या लोकप्रिय व्यासपीठाचे युवा नेते उस्मान हादी यांचा १८ डिसेंबर रोजी खून झाला. १२ डिसेंबर रोजी ढाका येथे अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. त्यानंतर येथील एका हिंदू कामगाराची जमावाने निर्घृण हत्या केली. यामुळे भारत आणि बांगलादेशमधील तणाव इतका वाढला आहे, की दोन्ही देशांनी तात्पुरत्या व्हिसा सेवा निलंबित केल्या आहेत.

२० डिसेंबर रोजी 'पाकिस्तान जमात-ए-इस्लामी'चे अमीर सिराज-उल-हक यांनी इन्स्टाग्रामवर बांगलादेशच्या तरुणांचे कौतुक करणारी एक पोस्ट लिहिली. या पोस्टमध्ये त्यांनी लिहिले की बांगलादेशच्या सुशिक्षित आणि धाडसी तरुण पिढीने अखंड भारताची कल्पना नष्ट केली आहे. भारत या प्रदेशात अस्थिरता निर्माण करत आहे. उस्मान हादीच्या हत्येनंतर, बांगलादेशमध्ये 'सोशल मीडिया'वर अफवा पसरल्या, की त्याचे मारेकरी सीमा ओलांडून भारतात आले आहेत. तथापि, बांगलादेश पोलिसांनी किंवा अंतरिम सरकारने अशा आरोपांना अधिकृत दुजोरा दिला नाही. तथापि, या अफवांचा दोन्ही देशांमधील राजनैतिक संबंधांवरही परिणाम झाला. बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांच्या सरकारने



भारतीय दूतावासाला लक्ष्य केल्यामुळे भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने १७ डिसेंबर रोजी म्हटले आहे की, बांगलादेशमधील अलिकडील काही घटनांबद्दल कट्टरपंथी घटकांचे खोटे दावे आम्ही पूर्णपणे नाकारतो. हे दुर्दैवी आहे की अंतरिम सरकारने या घटनांची सखोल चौकशी केलेली नाही किंवा त्यांच्याशी कोणताही संबंध स्थापित केलेला नाही. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये शेख हसीना यांना सत्ता सोडण्यास भाग पाडल्यापासून पाकिस्तान आणि बांगलादेशमधील संबंध सुधारत आहेत. पाकिस्तान आणि बांगलादेशमधील दरी हळूहळू कमी होत असल्याचे दर्शवणाऱ्या अनेक घडामोडी घडल्या आहेत.

गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये, १९७१ च्या बांगलादेश मुक्ती युद्धानंतर दोन्ही देशांमधील पहिला सागरी संपर्क स्थापित झाला. यापूर्वी दोन्ही देशांमधील सागरी व्यापार सिंगापूर किंवा कोलंबोमार्गे केला जात होता. बांगलादेशमधील पाकिस्तान उच्चायुक्त सय्यद अहमद मारूफ यांनी एका निवेदनात म्हटले, पाकिस्तानातील कराचीहून थेट बांगलादेशमधील चितगाव बंदरात मालवाहू जहाज पोहोचण्याची ही पहिलीच वेळ आहे. ती द्विपक्षीय संबंधांमध्ये एक महत्त्वाचे पाऊल आहे. यापुढे पाकिस्तानमधील बांगलादेशी नागरिकांना मोफत व्हिसा जारी केला जाईल आणि ४८ तासांच्या आत निर्णय घेतला जाईल. हसीना यांना सत्तेवरून काढून टाकल्यानंतर 'बांगलादेश जमात-ए-इस्लामी' एक महत्त्वाची राजकीय शक्ती म्हणून उदयास येत असल्याचे दिसून येते. 'पाकिस्तान जमात-ए-इस्लामी' आणि 'बांगलादेश जमात-ए-इस्लामी' वैचारिकदृष्ट्या समान आहेत. दोघेही बांगलादेशच्या मुक्ती-युद्धावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत. 'बांगलादेश जमात-ए-इस्लामी' मुक्ती-युद्धातील भारताच्या भूमिकेपुढे प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहे. हसीना यांच्या जाण्यानंतर, बांगलादेशमधील मुक्ती-युद्धाच्या ऐतिहासिक वारशावरही हल्ले सुरू झाले. बांगलादेशचे संस्थापक शेख मुजीबुर रहमान यांच्या घरावर हल्ला करण्यात आला. 'बांगलादेश जमात-ए-इस्लामी' युनूस यांच्या अंतरिम सरकारला पाठिंबा देत आहे.

फेब्रुवारीमध्ये दिलेल्या मुलाखतीमध्ये 'बांगलादेश जमात-ए-इस्लामी'चे प्रमुख शफीकूर रहमान म्हणाले होते की, १९७१ मध्ये आमची भूमिका तत्त्वावर आधारित होती. आम्हाला भारताच्या फायद्यासाठी स्वतंत्र देश नको होता. आम्हाला मतदानाचा अधिकार देण्यास पाकिस्तानला भाग पाडले जावे, अशी आमची इच्छा होती. आपण एखाद्याच्या माध्यमातून किंवा कोणाच्या वतीने स्वातंत्र्य मिळवले असते, तर ते एका ओझ्यापासून दुसऱ्या ओझ्यापर्यंत पोहोचण्यासारखे झाले असते. बांगलादेशच्या अंतरिम सरकारशी पाकिस्तानची वाढती जवळीक ही भारतासाठी गंभीर चिंतेची बाब असली पाहिजे. त्यापूर्वी भारतात घुसखोरी वाढवण्यासाठी बांगलादेशचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात होता. आता ती परिस्थिती परत निर्माण होऊ शकते. युनूस सरकारने 'जमात-ए-इस्लामी' आणि इतर इस्लामी पक्षांना देशात मोकळीक दिली आहे. बांगलादेशमध्ये इस्लामवादी पक्षांना कधीही पाच टक्क्यांपेक्षा जास्त मते मिळालेली नाहीत. सर्व पुरोगामी आणि उदारमतवादी पक्षांवर बंदी घालून आणि निवडणुका ताब्यात घेऊन, युनूस इस्लामी कट्टरपंथीयांना सत्तेत बसवण्याचा प्रयत्न करत आहेत. भारत आणि बांगलादेशमधील तणावाचा फायदा पाकिस्तान आणि चीन घेत आहेत. बांगलादेशमध्ये पाकिस्तानचा सहभाग वाढतो आहे. या वर्षी जूनमध्ये चीनमधील कुनमिंग येथे चीनचे उपपरराष्ट्रमंत्री सन वेइडोंग आणि बांगलादेश आणि पाकिस्तानच्या परराष्ट्र सचिवांमधील त्रिपक्षीय बैठकीने भारतासाठी चिंता निर्माण केली. त्यानंतर २०२४ च्या अखेरीस पाकिस्तानी नौदलाच्या जहाजाने बांगलादेशच्या बंदराला अभूतपूर्व भेट दिली. चीन युनूस सरकारसोबत आपले संबंध सतत मजबूत करत आहे. कोणत्याही दृष्टिकोनातून पाहिले तरी द्विपक्षीय संबंधांची सध्याची स्थिती भारतासाठी अत्यंत प्रतिकूल आहे. हा तणाव बांगलादेश आणि त्याच्या लोकांच्या हितांना धोका निर्माण करतो. यामुळे बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे आणखी नुकसान होते. हा तणाव देशांतर्गत अपयश आणि अक्षमता लपवण्यास मदत करतो. म्हणूनच भारतासोबत बिघडणाऱ्या संबंधांमुळे बांगलादेशचेच जास्त नुकसान होईल, असे गृहीत धरणे ही एक गंभीर चूक ठरू शकते. ▮

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**नितीन शिरसाट**

# बालमृत्यूचे वाढते प्रमाण चिंताजनक

बालमृत्यू रोखण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या अनेक योजना राबविल्या जात असतानाही मृत्युदरात अपेक्षित घट होत नसल्याचे वास्तव समोर आले आहे. माता-बाल आरोग्य योजना, पोषण अभियान आणि प्राथमिक आरोग्यसेवा असूनही अंमलबजावणीत असलेल्या त्रुटी, मनुष्यबळाची कमतरता आणि जनजागृतीअभावी बालमृत्यूंचे प्रमाण कायम असल्याचे दिसून येत आहे. राज्यातील बालमृत्यूचे प्रमाण चिंताजनक असून हजार जन्मामागे १४० बालमृत्यू होत असल्याची माहिती समोर आली आहे. आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार हे प्रमाण राष्ट्रीय सरासरीपेक्षा अधिक असल्याचे सांगितले जात आहे. राज्यातील नवजात बालकांच्या मृत्युदराच्या तुलनेत जिल्ह्यातील प्रमाण कमी झाले आहे. बालकांच्या मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करण्यात येत आहेत. बालमृत्यूची आकडेवारी अंतर्मुख करणारी आहे. नवजात व पाच वर्षांखालील बालकांचा मृत्यू हा केवळ आरोग्य व्यवस्थेचे अपयश नाही तर सामाजिक, आर्थिक आणि प्रशासकीय दुर्लक्षाचे भयावह वास्तव दर्शवते. कुपोषण, अपुरी आरोग्यसेवा, अशुद्ध पाणी, माता आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष आणि गरिबी ही बालमृत्यूची मुख्य कारणे आजही कायम आहेत. शासकीय पातळीवर अनेक योजना अस्तित्वात असल्या तरी त्यांची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे चित्र आहे. ग्रामीण व आदिवासी भागांमध्ये आरोग्य सुविधा पोहोचण्यात अजूनही मोठी दरी आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रांतील डॉक्टरांची कमतरता, औषधांचा तुटवडा आणि वेळेवर उपचार न मिळणे यामुळे अनेक निष्पाप जीव दगावतात. बालमृत्यू रोखण्यासाठी केवळ आकडेवारीवर चर्चा न करता ठोस कृतीची गरज आहे.



बुलढाणा जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेसमोर गंभीर चित्र उभे राहिले असून गेल्या एक वर्षात एकूण १७७ नवजात बालकांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. जिल्हा शल्य चिकित्सकांच्या अखत्यारीतील रुग्णालयांमध्ये २८, तर जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांच्या अधीनस्थ रुग्णालयांमध्ये १४९ नवजात बालकांच्या मृत्यूची नोंद आहे. जिल्ह्यातील बालमृत्यूच्या आकडेवारीत १ ते पाच वर्षे वयोगटातील मृत्यूचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे चित्र समोर आले आहे. ही बाब चिंताजनक असून, बालकांच्या आरोग्य सुरक्षेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबविण्याची गरज व्यक्त केली जात आहे. माता व बाल आरोग्यसेवा मजबूत करणे, पोषण आहार योजनांची काटेकोर अंमलबजावणी, स्वच्छ पाणी व लसीकरणावर भर देणे अत्यावश्यक आहे. समाज, प्रशासन आणि आरोग्य यंत्रणा यांनी एकत्रित जबाबदारी स्वीकारल्याशिवाय बालमृत्यू थांबणार नाही. राज्यातील सात जिल्ह्यांमध्ये गेल्या तीन वर्षांत तब्बल १४,५२६ बालमृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत लेखी उत्तरात दिली. भाजपा आमदार स्नेहा दुबे यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ही आकडेवारी त्यांनी सादर केली. २०२२ ते २०२५ या कालावधीत पुणे, मुंबई, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, अमरावती, अकोला व यवतमाळ जिल्ह्यांमध्ये एकूण १४ हजार ५२६ मुलांचा मृत्यू झाला. यामध्ये नवजात शिशूपासून ते पाच वर्षांखालील मुलांचा समावेश असून सर्वच मुलांना सरकारी आरोग्य केंद्रांत उपचारासाठी दाखल केले होते. कुपोषणामुळे झालेल्या मृत्यूंचाही यात समावेश आहे. याशिवाय आदिवासीबहुल पालघर जिल्ह्यात १३८ नवजातांचा मृत्यू झाला. नियमित आरोग्य तपासणी, गर्भवतींसाठी अमृत आहार योजना, पोषण अभियान, मातृ वंदना योजना तसेच सुपोषित महाराष्ट्र उपक्रम या योजनांद्वारे कुपोषण कमी करण्याचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. विधान परिषदेत आ. उमा खापरे यांनी बालमृत्यूचा मुद्दा मांडला. उत्तर देताना महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी एकाही बालकाचा कुपोषणामुळे मृत्यू होऊ नये यासाठी शासन प्रयत्नशील आहे. त्यासाठी विशेष कृती पथक तयार करण्यात येईल, असे सांगितले. परंतु आरोग्य यंत्रणा सक्षम करण्याची गरज निर्माण झाली आहे. माता-बाल आरोग्य सेवांवर लक्ष देण्याची गरज आहे. ▮

९८८१७१७८२८

## इतस्ततः

# व्यवसायातील महत्त्वपूर्ण मानवीय पैलू

**दत्तात्रेय आंबुलकर**

सद्य:स्थितीत व्यावसायिक क्षेत्रात सर्वसाधारणपणे भर दिला जातो, तो तंत्रज्ञान विकास, नवीन कार्यपद्धतींसाठी आधुनिक तंत्राचा वापर करून स्पर्धेत केवळ टिकूनच न राहता, स्पर्धेवर मात करून अधिकाधिक व्यवसाय-विस्तार व वाढता फायदा मिळविण्यावर. या प्रयत्नांतून आपल्या उद्योग व उद्योजकांनी रोबोटपासून युनिकॉर्नपर्यंतची विविध उद्दिष्टे तर साध्य केली. मात्र, या यशाचा टप्पा गाठताना आपण या प्रयत्नांशी निगडित व महत्त्वाच्या अशा मानवीय पैलूंचा कसा आणि कितपत विचार केला, हा प्रश्न अनेक ठिकाणी उपस्थित झाला आहे.

वाढत्या व्यावसायिक स्पर्धेच्या पृष्ठभूमीवर एक प्रभावी उपाय म्हणून अद्ययावत तंत्रज्ञान व विकसित संगणकीय कार्यपद्धती यावर आधारित उद्योग-व्यवसाय प्रक्रियेवर भर देतानाच, अनेक ठिकाणी कंपनी आणि कामकाजावर भर देताना, कर्मचारी या तेवढ्याच महत्त्वाच्या बिंदूवर प्रसंगी दुर्लक्ष होते का? हा महत्त्वपूर्ण प्रश्न यानिमित्ताने उद्योग-व्यवसाय क्षेत्रात निर्माण होतो. त्यातही व्यावसायिकांसंदर्भात मानवीय मुद्दा म्हणून कर्मचाऱ्यांना हाताळताना अथवा त्यांच्याशी संबंधित छोट्या-मोठ्या मुद्यांचा विचार करून निर्णय घेताना भावनात्मक पैलू बाजूला सारला जाण्याची उदाहरणे बहुसंख्य ठिकाणी घडत असतात. परिणामी, उद्योग-व्यवसाय व त्यातील प्रगतीसाठी कर्मचाऱ्यांशी भावनिक पद्धतीने व परिस्थितीनुरूप वागण्याची पद्धत व्यवस्थापन आणि व्यवस्थापक या उभयतांकडून दुर्लक्षिली जात आहे.

कॉर्पोरेट क्षेत्रात व व्यवस्थापन कार्यपद्धतीच्या संदर्भात व्यवस्थापकीय संकल्पनेला अधिक प्रभावी व उपयुक्त सिद्ध करण्यासाठी व्यवस्थापकीय शिस्तीला कर्मचाऱ्यांचे सामंजस्य व उभयतांमध्ये समान भावना असणे, प्रत्येक उद्योग-व्यवसायाच्या यशस्वी होण्यासाठी अत्यावश्यक असते. उद्योग-व्यवसाय चक्रातील तंत्रज्ञान, व्यवसाय प्रक्रिया, संबंधित कार्यपद्धती, आर्थिक पाठबळ, व्यावसायिक वाढ, उत्पादन व सेवा यांचा दर्जा व व्यवसायाची गुणवत्ता या सर्व व प्रमुख कार्य-टप्प्यांमध्ये कर्मचारी हा एक समान मुद्दा असतोच असतो.

कंपनीच्या दृष्टीने कर्मचाऱ्यांच्या संदर्भातील व व्यावहारिकच नव्हे, प्रत्यक्षात विविध बाबी स्वाभाविकपणे अनुभवायला येतात. यामध्ये प्रामुख्याने कंपनीमध्ये कर्मचाऱ्यांची निवड, कामावर रुजू होणे, प्रत्यक्ष कामकाज, कामाचे वार्षिक नियोजन व अवलोकन, संबंधित कर्मचाऱ्याच्या कामाचा दर्जा व त्याचे होणारे व्यावहारिक-व्यावसायिक परिणाम, कर्मचाऱ्याच्या व्यक्तिगत क्षमतेचे कार्यक्षमतेत होणारे रूपांतर, व्यक्तीच्या कामाच्या परिणामांनुरूप त्यांची होणारी पदोन्नती व पगारवाढ, कंपनीतर्फे दिले जाणारे शिक्षण-प्रशिक्षण व कर्मचाऱ्यांच्या विकासात्मक स्वरूपात केले जाणारे प्रयत्न इ. चा समावेश असतो. ही प्रक्रिया कर्मचारी संबंधित आस्थापनेत कामावर असताना व त्यांच्या सेवाकाळात निरंतर चालू असते. म्हणूनच, विशेषत: एचआर-व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून याला 'कर्मचाऱ्याचे सेवाचक्र' - 'एम्प्लॉयी लाईफ सायकल' असे म्हटले जाते. यातील विविध टप्प्यांवर कंपनी आणि कर्मचाऱ्यांनी काय प्रयत्न केले व त्यांचा काय परिणाम झाला, याचा वेळोवेळी व नियोजनबद्ध पद्धतीने विचार करणे, परस्पर फायदेशीर ठरू शकते. याचाच एक भाग म्हणून कर्मचाऱ्यांच्या आशा-आकांक्षा, त्यांचे नियोजन व व्यवस्थापन हे मुद्देसुद्धा महत्त्वाचे ठरतात. मुळातच कर्मचारी व त्यांच्याशी संबंधित विविध मुद्दे हे जिव्हाळ्याचे व प्रसंगी ज्वलंत ठरू शकतात. या बाबीचा उद्योग क्षेत्रात बरेचदा अनुभव येतो. यातूनच कंपनी-कर्मचाऱ्यांचे परस्पर दुराग्रह, शिस्तपालन, अपेक्षांची पूर्तता, नाराजी वा असंतोष व काहीवेळा कर्मचारी संघटनांची सक्रियता दिसून येते. या आणि अशाप्रकारच्या स्थिती-परिस्थितीचा अंदाज, मागोवा घेणे, त्यावर संवाद साधून उपाययोजना करणे, मुख्य व जिव्हाळ्याच्या मुद्यांचे निराकरण करणे, परस्पर संबंधांना सकारात्मकतेची जोड देणे इ. प्रकारची उपाययोजना कर्मचाऱ्यांसाठी उपयुक्त व कंपनीसाठी फायदेशीर ठरते. कंपनी-व्यवस्थापनात शिस्तपालन हा मुद्दा सर्वच स्तरांवर व विविध प्रकारे महत्त्वाचा ठरतो. या प्रयत्नांचा आधार केवळ अधिकार-भय वा पदभार न राखता, संवादावर आधारित शिस्त ठेवणे व्यवस्थापन कार्यपद्धतीत महत्त्वाचे ठरते. भीतिपोटी आलेली वा असणारी शिस्त व्यक्तीच्या भीतीप्रमाणेच अल्पकालीन ठरते. त्याचे प्रसंगी विपरीत परिणाम होतात. वरिष्ठ-कनिष्ठांमधील दैनंदिन कामाशी निगडित व आवश्यक असणारे संबंध बिघडू शकतात. याचा उलट परिणाम व्यक्ती व संस्था या उभयतांवर होत जातो. त्यावर कंपनी-कर्मचारी उभयतांनी परस्पर जबाबदारी ओळखून ती निरंतर पार पाडणे, यांसारख्या मुद्यावर व्यावहारिक उपचार करणे आवश्यक असते.

यादरम्यान, कंपनी-कर्मचारी व व्यवस्थापन-व्यवस्थापक यांच्यातील नेतृत्वगुणांचा बरेचदा कस लागतो. विशेषतः ज्या उद्योग-आस्थापनांमध्ये कामगार संघटना सक्रियपणे कार्यरत असते, त्याठिकाणी याचा प्रत्यय अधिक प्रकर्षाने येतो. या नेतृत्वाला प्रसंगानुरूप जबाबदारीची साथ देणे व उभयपक्षी आपापली जबाबदारी परस्परपूरक व उद्योगाच्या व्यापक हितासाठी विचारपूर्वक वापरणे महत्त्वाचे ठरते. यासाठी प्रामुख्याने प्रयत्नपूर्वक, प्रामाणिकपणे व दीर्घकालीन प्रयत्न मात्र आवश्यक आहेत.

कामाच्या ठिकाणी व्यक्तिगत स्तरावर कंपनी-कर्मचारी या उद्योग-व्यवसायातील महत्त्वपूर्ण व व्यक्तिगत व्यवहारांवर आधारित स्वरूपाचे काम करताना परस्पर भावनांची दखल घेत, विविध मुद्यांवर परस्पर जाणिवांसह काम करणे, सर्व संबंधितांसाठी महत्त्वाचे ठरते. व्यावसायिक संदर्भात परस्पर व्यवहारांच्या भावनात्मक साथीची नितांत व वाढती गरज व्यवस्थापन क्षेत्रात नव्यानेच अधोरेखित करण्यात आली असून, त्या दृष्टीने पुढील मुद्दे महत्त्वाचे व कंपनी-कर्मचारी या उभयतांसाठी उपयुक्त असल्याने नमूद केले आहेत.

**परस्पर भावनांची जाणीव** : व्यावसायिक व व्यवस्थापनपर संदर्भात होणारे विचार-व्यवहारांमधील मानवीय भावनांचा पडताळा घेणे.

**व्यक्तिगत भावनांची दखल** : परस्पर संपर्क, संवाद, निर्णय व त्यामागील संबंधित घटकांच्या-व्यक्तींच्या भावना व त्यांची पृष्ठभूमी जाणून घेणे.

**अडचणी समजून घेणे** : कंपनी, कंपनीचे कामकाजच नव्हे, तर त्या संदर्भातील परस्पर अडचणी समजून घेऊन त्यावर यथावत तोडगा काढणे.

**कंपनीची काळजी घेण्यासाठी कार्यक्षम कर्मचाऱ्यांना राखून ठेवणे** : कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर कंपनी-व्यवस्थापनाची कार्यक्षमता अवलंबून असते. त्यामुळे कंपनीसंदर्भात सुरुवातीलाच नमूद केल्याप्रमाणे कंपनीमध्ये कर्मचारी तर महत्त्वाचे असतातच. मात्र, कार्यक्षम कर्मचारी अधिक महत्त्वाचे असतात, हे तत्त्व व्यवस्थापन व व्यवस्थापकांनी कायमस्वरूपी लक्षात ठेवावे.

**नेतृत्व आणि प्रभावी निर्णय क्षमता** : व्यवस्थापनाचे प्रतिनिधी म्हणून व्यवस्थापकांनी कर्मचाऱ्यांचे वरिष्ठ म्हणून आपली नेतृत्व-निर्णयाची भूमिका पार पाडताना सातत्याने भावनाधीन होऊन निर्णय न घेता, भावनाशील बनून निर्णय घ्यावे. असे निर्णय प्रभावी ठरतात. यासंदर्भात थोडक्यात व महत्त्वाचे म्हणजे, व्यवस्थापन प्रक्रियेत व्यवस्थापक व कर्मचाऱ्यांनी परस्परांना गरजेनुरूप आवश्यक असणारा 'पासवर्ड' समजण्याची मानसिकता कायमची 'डिलीट' करणेच उभयतांसाठी आवश्यक आहे. ▮

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)
९८२२८४७८८६

## 'प्रवाशांच्या सेवेसाठी' ब्रीदवाक्य एमएसआरटीसीने पुसले काय?

'प्रवाशांच्या सेवेसाठी' हे ब्रीदवाक्य घेऊन एस. टी. महामंडळ महाराष्ट्रभर आणि बाहेरच्या राज्यातून फिरते आहे. त्याची आता कीव करावीशी वाटू लागली आहे. रात्री जेव्हा प्रवासी किंवा वृद्ध मंडळी प्रवास करताना इच्छितस्थळी उतरण्याची विनंती वाहकांना करतात तेव्हा जवळजवळ ७० टक्के वाहक फेटाळून लावतात. बसचा नियोजित थांबा तिथे नसेलही पण त्या व्यतिरिक्त माणुसकी हे नाते सर्वस्वी तुटलेले दिसते. अनेक वेळा या प्रवाशांकडे अवजड सामानही असते. रात्री रिक्षा वगैरे वाहने मिळत नाहीत याचाही ही मंडळी विचार करीत नाहीत. परंतु याच मंडळातील वाहक-चालकांकरिता गाडी कुठेही थांबविण्याला मात्र विसरत नाहीत याची खंत वाटते. अनेक चालक त्यांच्याच केबिनमध्ये तंबाखू खाऊन थुंकताना आढळतात. हे किळसवाणे प्रकारही महामंडळ काही नियम करून थांबवू शकत नाही का? यासाठीच प्रवाशांच्या सेवेसाठी एस. टी. आता राहिली नसून केवळ मनमानी कारभारासाठी ठरत आहे याची अधिकारी, मंत्री, खासदार, आमदार दखल घेणार का? यात जे उत्तम वाहक-चालक आहेत त्यांची नावे सहजपणे खराब होतात याचेही दुःख वाटते.

**अमोल करकरे**/ ९९६७९२७६१७

## वाचक पत्रे

### ३१ डिसेंबर आणि एकादशी

या वर्षी ३१ डिसेंबरला एकादशी आहे. एकादशी हा हिंदू धर्मातील आत्मसंयम, शुद्ध आहार-विहार आणि आध्यात्मिक साधनेसाठी पवित्र दिवस मानला जातो. अशा दिवशी मांसाहार, मद्यपान किंवा उथळ जल्लोष करणे हे आपल्या परंपरेशी सुसंगत नाही. इंग्रजी वर्ष बदलते ते फक्त कॅलेंडरवर; निसर्गात या काळात काहीही मूलभूत बदल होत नाहीत. त्यामुळे इंग्रजी वर्षाच्या स्वागतासाठी एका रात्रीचा दिखाऊ आनंद टाळल्याने आयुष्य थांबणार नाही किंवा कुठलेही नुकसान होणार नाही; उलट आत्मसंयमाने साजरा केलेला दिवस मनाला स्थैर्य आणि सकारात्मक ऊर्जा देतो. आपल्या संस्कृतीत एकादशीसारखे पवित्र दिवस हे भोगासाठी नसून साधनेसाठी असतात. म्हणूनच, ३१ डिसेंबरला मद्य व मांसाहारापासून दूर राहून आपल्या संस्कृतीशी नाते दृढ करूया. या दिवशी साधेपणाने व्रतोपवास किंवा सात्त्विक आहार करून, जप-नामस्मरण करत श्रीहरीची भक्ती करूया.

**अनिकेत शेटे**/ पुणे

### संगीत देव बाभळी आणि ज्येष्ठांची धडपड

या नाटकाबद्दल खूप ऐकले होते. वाचलेही होते. २७ तारखेला योग आला. थंडीत रात्रीचा प्रयोग आणि तोही हाऊसफुल बघून निर्माता प्रसाद कांबळी यांनी नागपूरकरांचे आभार मानले. आवलीच्या पायाला बाभळीचा काटा रुतल्यामुळे झालेली जखम लवकर भरून निघावी म्हणून पांडुरंगाने रुक्मिणीला तिच्या मदतीला पाठविले. त्या काळात आवली आणि रुक्मिणी यांच्यातील संवाद, पांडुरंगाप्रति भक्ती आदी प्रसंग नाट्यरूपात मांडण्यात दिग्दर्शक-लेखक प्राजक्त देशमुख यांनी कमाल केली आहे. सुमधुर नाट्यपदांमुळे नाटक बघताना मराठी संगीत नाटकांचे दिवस आठवले. जोशी, सदावर्ते या दोघींनी केलेला अभिनय अप्रतिम आहे. तशी पावती प्रेक्षकात उपस्थित असलेले केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिली आहे. परंतु ऑनलाईन बुकिंग करूनही ३० नोव्हेंबर, २७ डिसेंबर या दोन्ही दिवशी प्रयोगाचे ऐनवेळी बार कोड स्कॅन करून प्रवेश करताना नाट्यरसिकांना त्यातल्यात्यात वृद्धांना जी धडपड करावी लागली तशी वेळ यापुढे येऊ नये असे आयोजकांना सांगणे आहे. ▮

**प्रीती प्रकाश देशपांडे**/ ९०७५३१२७५२

## आजचे संघगीत-८८

मंगळवार, ३० डिसेंबर २०२५

### अभिमानाने भारावुनि मन बाल युवक उठले

अभिमानाने भारावुनि मन, बाल युवक उठले
तयांनी क्रांति गीत गाइले ॥धृ॥

मृत आशांचे स्थंडिल विझले असे भासले परी धुमसले
रुद्राची वाजता पाउले या धरतीच्या कणाकणातुन
मृत्युंजय उठले ॥१॥

ज्वलंत अंतःकरणामधुनी समरदुंदुभी उठले गर्जुनी
रौद्र भयानक निनाद परिसुनि गर्वगीत मदमत्त शत्रुचे
ओठातच विरले ॥२॥

संघटनेच्या मंत्रामधल्या ऋचा धीर गंभीर गाइल्या
दिक्कालाला भेदुनि गेल्या दाहि दिशांतुन शत वदनांनी
प्रतिध्वनी उठले ॥३॥

या देशाचे वारस उठतिल स्वामित्वास्तव पुन्हा झुंजतिल
हसत हसत बलिदानहि करतिल सत्य कालचे स्वप्न आजचे
सत्य पुन्हा ठरले ॥४ ॥

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# एखादी गोष्ट का आणि कशी घडते? यावर विचार केल्यास मिळते 'नवी दृष्टी'

## डॉ.जोगेंद्रसिंह बिसेन यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ डिसेंबर-**

केवळ पुस्तकी ज्ञानापेक्षा अनुभवातून शिकणे महत्वाचे असते. एखादी गोष्ट 'का' आणि 'कशी' घडते? यावर विचार केल्यास 'नवी दृष्टी' मिळते, असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ.जोगेंद्रसिंह बिसेन यांनी केले.

विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला आणि संशोधनाला व्यासपीठ मिळवून देण्याच्या उद्देशाने आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय 'अविष्कार' महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.प्रकाश महानवर हे अध्यक्षस्थानी होते. यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ.लक्ष्मीकांत दामा, संचालक डॉ.व्ही.बी. पाटील, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य देवानंद चिलवंत यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.प्रकाश महानवर म्हणाले की, विद्यार्थ्यांनी संशोधन करताना त्याचा समाजाला काय उपयोग होईल, याचा प्रामुख्याने विचार केला पाहिजे. कोणत्याही शाखेच्या विद्यार्थ्याने कोणत्याही विषयावर संशोधन करावे, ही काळाची गरज आहे. व्ही.जी. शिवदारे कॉलेज ऑफ आर्टस् अ‍ॅन्ड कॉमर्सचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे, भीमाशंकर शेटे, नरेंद्र गंभीरे यांनी अतिथींचा सत्कार केले. प्राचार्य दत्तात्रय सुत्रावे यांनी प्रास्ताविक केले. डॉ.अशोक शिंदे यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला.

डॉ.विनायक धुळप यांनी महोत्सव भरविण्यामागचा उद्देश विशद केले. डॉ.शुभदा उपासे व प्रियांक धुत्तरगी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ.ए.बी. वळसंगे यांनी आभार मानले.युनिक स्कूलच्या बँड पथकाने पाहुण्यांचे स्वागत केले. किरण जोजारे व सहकाऱ्यांनी सुगम संगीताचा बहारदार कार्यक्रम सादर केला. बिराजदार यांनी गायलेल्या वंदे मातरम्‌ने महोत्सवाची सांगता करण्यात आली.



### ३९१ पैकी २४६ विद्यार्थिनींचा सहभाग

या स्पर्धेत सहा विभागांतून शहर व जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतील एकूण ३९१ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला आहे. यात २४६ विद्यार्थिनींचा समावेश आहे. दरम्यान, या महोत्सवात पदवी, पदव्युत्तर व संशोधक विद्यार्थ्यांनी २७३ पोस्टर्स आणि ३६ मॉडेल्स सादर केली आहेत.

### राज्यस्तरीय स्पर्धा ४८ विद्यार्थ्यांची निवड

यातून ४८ विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात येणार आहे. डॉ.सागर कोंडेकर, डॉ.प्रमोद पाटील, डॉ.निलेश तरवळ, डॉ.ज्ञानेश्वर देशमुख, डॉ. कृष्णा अळसुनकर, डॉ.विकास सरनाईक, डॉ.अभिनंदन पाटील, डॉ.गोपाळ पांचाळ, डॉ.प्रसाद कुलकर्णी, डॉ. विक्रम खिलारे, डॉ.प्रशांत अग्निहोत्री, डॉ.संदीप पाटील हे परीक्षक म्हणून काम पाहत आहेत.

## महत्वाचे...

### खून केल्याप्रकरणीच्या आरोपींची न्यायालयीन कोठडीत रवानगी

**सोलापूर, दि.२९ डिसेंबर-**

दारुसाठी पैसे दिले नाहीत म्हणून खून केल्याप्रकरणीच्या गुन्ह्यात आरोपींची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. येथील रहिवासी अमृता संदीप शिंदे (वय-३५, रा. गरिबी हटाव झोपडपट्टी, सोलापूर), लक्ष्मी आकाश बलरामवाले (वय २२, रा.झोपडपट्टी नं.१ विजापूर नाका) यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली. यात थोडक्यात हकीकत की, दि.१७/१०/२०२५ रोजी रात्री ११.०० वाजणेच्या सुमारास फिर्यादी प्रतिमा शंके या घरा समोर रस्त्यावर उभ्या असताना मोठमोठ्याने भांडण्याचा आवाज येत असल्याने फिर्यादी प्रतिमा शंके या गरिबी हटाव झोपडपट्टी नं. १ संघर्ष तरुण मंडळाच्या पुढे आरोपी आकाश तुळजाराम बलरामवाले नवल करे हे फिर्यादीचे पती यतिराज शंके यास 'दारु पिण्यास पैसे का देत नाही तुला बघुन घेतो' असे म्हणून हाताने वं लाथाबुक्क्याने मारहाण करत होते. त्यावेळी आकाश बलरामवाले हा पळून जावून त्याच्या घरातील कुऱ्हाड घेवून आला व यतिराज शंके याचे डोक्यात पाठीमागून कुऱ्हाडीने वार केला, त्यामुळे त्याचा मृत्यू झाला अशा आशयाची फिर्याद मयत यतिराज शंके यांच्या पत्नीने विजापूर नाका पोलीस स्टेशन येथे दाखल केली होती. सदर गुन्ह्यात यापूर्वी पोलीसांनी आकाश बलरामवाले व नवल करे या आरोपींना अटक केलेली आहे. दि.२८/१२/२०२५ रोजी सदर गुन्ह्यात अमृता संदीप शिंदे व लक्ष्मी आकाश बलरामवाले या नवीन आरोपींना अटक करुन दि.२९/१२/२०२५ रोजी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी व्ही. एम. रेडकर यांचे समोर हजर केले असता न्यायालयाने आरोपींची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली. या प्रकरणात आरोपीतर्फे अ‍ॅड. गुरुदत्त बोरगांवकर, अ‍ॅड. विश्वास शिंदे अ‍ॅड. रेवण पाटील यांनी काम पाहिले.

### २ लाख रुपयांचे दागिने असलेली बॅग लंपास

**सोलापूर, दि.२९ डिसेंबर-**

२ लाख ६४ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने असलेले एका प्रवाशाचे ट्रॉली बॅग एसटी बसमधून लंपास केल्याची घटना दि.२४ डिसेंबर रोजी सोलापूर एसटी बसस्थानक येथे घडली. सिध्दाराम नागप्पा बिराजदार (रा.भीम नगर, रबाडा, नवी मुंबई) हे इरकल येथून मुंबईकडे एसटी बसने प्रवास करत होते. रात्री ९.३० ते ९.४५ वाजण्याच्या सुमारास बस सोलापूर एसटी स्टॅन्डवर थांबली होती. यावेळी ते पाणी घेण्यासाठी म्हणून खाली उतरले असता त्यांची लाईट ब्ल्यू रंगाची ट्रॉली बॅग चोरट्यानी लंपास केली. या बॅगेत सुमारे २ लाख ६४ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने होते. यामध्ये २० ग्रॅमचे सोन्याचे मणिमंगळसूत्र, १० ग्रॅमची सोन्याची चेन, १० ग्रॅमचे सोन्याचे नेकलेस, २ ग्रॅमची सोन्याची अंगठी, २ ग्रॅमचे सोन्याचे झुबे यांचा समावेश आहे. या घटनेची तक्रार दि. २७ डिसेंबर रोजी रात्री ८.४२ वाजता फौजदार चावडी पोलिस ठाण्यात नोंदवण्यात आली. पुढील तपास पोलिस हेड कॉन्स्टेबल चुंगे हे करीत आहेत.

# मुंबई, मराठी माणसासाठी युती धर्म पाळा : राज ठाकरे

**तभा वृत्तसेवा। विशेष प्रतिनिधि**
**मुंबई, दि.२९ डिसेंबर**

मुंबई आणि मराठी माणसाला वाचवण्याची जबाबदारी आपल्या सर्वांवर आहे. त्यामुळे आपण पहिल्यांदाच निवडणुकीला युतीने सामोरे जात असून युतीचा धर्म आपल्याला पाळावा लागेल. कोणीही नाराज होऊ नये, असे आवाहन मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी सोमवारी केले.

शिवसेनेबरोबर युती जाहीर केल्यानंतर राज ठाकरे यांनी प्रथमच मनसेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांचा रंगशारदा सभागृहात मेळावा घेतला.त्यावेळी ते बोलत होते. तिकीट न मिळाल्याने नाराज होऊ नये, भविष्यात आणखी संधी दिल्या जातील, अशा शब्दात नाराज कार्यकर्त्यांची समजूत काढली. प्रसारमाध्यमाना उपस्थित राहण्यास मज्जाव होता. मेळावा झाल्यानंतर मनसे नेते बाळा नांदगावकर यांनी माहिती दिली. युतीत काही सीट येतात काही सोडाव्या लागतात. काहींना वाईट वाटण स्वाभाविक आहे. पण त्यामुळे कुणीही निराश होऊ नका, रागावू नका. पक्षाच्या २० वर्षांच्या इतिहासात आपण पहिल्यांदाच युतीमध्ये लढतोय. त्यामुळं युतीचा धर्म पाळावाच लागेल. प्रत्येक जागा ही मुंबईसह महाराष्ट्रासाठी आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे मराठी माणसासाठी महत्वाची आहे. तसेच रात्र वैऱ्याची असल्यानं सर्वांनी सावध राहा, मुंबई वाचवायची आहे, असा संदेश त्यांनी दिला.आपापसातील भांडणापेक्षा आणि निवडणूक महत्त्वाची आहे. मुंबई कोणत्याही परिस्थितीत आपल्या हातून जाता कामा नये. शरद पवारांची राष्ट्रवादीही आपल्या सोबत आहे. आपण निस्वार्थपणे पाठिंबा काही पक्षांना दिलेला आहे. प्रत्येक जागा ही मराठी माणसासाठी महत्वाची असल्याचे त्यांनी सांगितले.

# भाजपाकडून मराठी अभिनेत्री महापालिकेच्या रिंगणात!

### ६६ जणांची पहिली यादी जाहीर

**तभा वृत्तसेवा। विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.२९ डिसेंबर**

मुंबई महापालिकेवर कमळ फुलविण्यासाठी सर्वस्वपणाला लावून मैदानात उतरलेल्या भाजपाने ६६ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. त्यामध्ये अनुभवी नगरसेवकाबरोबरच उमेदवारांच्या ताफ्यात मराठी मनोरंजन विश्वातील अभिनेत्री निशा परुळेकर यांचा तसेच ठाकरे गटातून प्रवेश केलेल्या तेजस्वी घोसाळकर, माध्यम विभागाचे प्रमुख नवनाथ बन यांचाही समावेश आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी मंगळवारपर्यत मुदत असल्याने सर्वच राजकीय पक्षाची उमेदवार निश्चित करून त्यांना एबी फॉर्म देण्यासाठी धांदल उडाली आहे. बंडखोरी टाळण्यासाठी त्याला विलंब लावण्यात आला असलारी त्याचे आज रात्री उशिरापर्यत सर्वांना ते दिले जाणार आहेत.

भाजपा व शिवसेना एकनाथ शिंदे गट एकत्र लढत आहे तर महायुती सरकारमधील तिसरा घटक पक्ष असलेल्या अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस स्वबळावर लढत असून त्यांनी ६० उमेदवारांची यादी दोन टप्यात जाहीर केले आहे. तर भाजपाने आज सकाळी ६६ जणांना एबी फॉर्म दिले आहेत. त्यामध्ये माजी खा. किरीट सोमय्या यांचे पुत्र नील सोमय्या, नवनाथ बन, तेजस्विनी घोसाळकर,अभिनेत्री निशा परुळेकर आदींचा समावेश आहे. परुळेकर यांना प्रभाग क्रमांक २५ मधून उमेदवारी मिळाली असून त्या भाजप



सांस्कृतिक प्रकाशच्या सहसंयोजक म्हणून त्या काम करत आहेत. त्यांनी भरत जाधव यांच्यासोबत ' सही रे सही' यासारख्या तुफान नाटकात त्यांनी काम केलं आहे. तसेच महानायक व शिमणा या दोन चित्रपटांमध्येही त्यांनी भूमिका साकारली होती. शिवाय महेश कोठारे व्हिजन निर्मित दख्खनचा राजा जोतिबा या मालिकेत त्यांनी महालक्ष्मी अंबाबाईचे पात्र साकारले होते. युतीत शिवसेना शिंदे गटाला आतापर्यंत ७९ जागा निश्चित करण्यात आल्या आहेत. मात्र सोमवारी सायंकाळपर्यंत यादी जाहीर केलेली नव्हती. नाराजाकडून होणारी बंडखोरी टाळण्यासाठी त्यांनी सावध पवित्रा घेतल्याचे सांगितले जात.

### काँग्रेसकडून ७० जणांना उमेदवारी

काँग्रेस, वंचित व रासपा एकत्र निवडणूक लढवित असून काँग्रेसने ७० उमेदवाराची पहिली यादी जाहीर केली आहे. वचित ६८ जागा जाहीर केल्या आहेत. तर रासपा १०-१२ जागा लढविणार आहे.

### ठाकरे गटाकडून ६० जणांना एबी फॉर्म वाटप

शिवसेना, मनसे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट एकत्र निवडणूक लढावित असून पवारासाठी१२-१४ जागा सोडण्यात आल्या आहेत. ठाकरे यांनी रविवारी मध्यरात्री ६० जणांना एबी फॉर्म दिले. उमेदवारीवरून आ. वरुण सरदेसाई व आ. अनिल परब यांच्यात तीव्र वाद झाला. त्यामुळे परब हे मध्यरात्री तीनच्या सुमारास' मातोश्री'तून नाराज होऊन बाहेर पडले होते, असे सांगण्यात आले. तर राज ठाकरे यांनी मनसेच्या पदाधिकाऱ्यांचा आज मेळावा घेतला. त्यानंतर ५० जणांना फार्म दिले आहेत.

### पवाराच्या जिल्हाध्यक्षाच्या हाती 'कमळ'

निवडणुकीतील इच्छुकांची वाढती संख्यामुळे सर्वच पक्षात आयाराम, गयाराम सुरु असून सोमवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला मोठा धक्का दिला. या पक्षाच्या जिल्हाध्यक्षा राखी जाधव यांनी 'कमळ' हाती धरले. ठाकरे बंधूकडून पक्षाला अत्यल्प जागावर बोळवण करण्यात आली. त्यामुळे आपण भाजपात प्रवेश केला असल्याचे त्यांनी सांगितले. राखी जाधव यांना घाटकोपर येथून भाजपाकडून तिकीट दिले जाईल, असे सांगण्यात आले.


## नावात बदल

माझे लग्नापुर्वीचे नाव - **नाजनीन बानो इक्बाल अहमद खान** असे होते. लग्नानंतरचे नाव **नाजनीन सलीम शेख** असे आहे. सदर दोन्ही नावाची एकच व्यक्ती आहे. यापुढे नविन नावाने ओळखण्यात यावे.

**ऑफि. ६२९४९**
**दिनांक : २९/१२/२०२५**



## बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra

प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5

आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in

**नियम - ८ (१)**
**ताबा सूचना**

जेथे, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अ‍ॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियम, 2002 च्या नियम 3 सह वाचलेल्या कलम 13 च्या उपकलम (12) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, बँक ऑफ महाराष्ट्रचे अधिकृत अधिकारी म्हणून खाली स्वाक्षरी केलेले व्यक्ती यांनी 28/07/2025 रोजी डिमांड नोटीस जारी केली ज्यामध्ये खालील कर्जदारांना आणि जामीनदारांना सूचना मिळाल्याच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत संपूर्ण थकबाकी परत करण्याचे आवाहन केले आहे.

कर्जदाराने रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी ठरल्याने, कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, 24/12/2025 रोजी सुरक्षा हित अंमलबजावणी नियम, 2002 च्या नियम 8 सह वाचलेल्या कायद्याच्या कलम 13 च्या उपकलम (4) अंतर्गत त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा सांकेतिक ताबा अधोरेखित व्यक्तीने घेतला आहे.

कर्जदाराला विशेषतः आणि सर्वसामान्य जनतेला येथे इशारा देण्यात येत आहे की त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी कोणताही व्यवहार केल्यास वर नमूद केलेल्या रकमेसाठी बँक ऑफ महाराष्ट्रकडून शुल्क आकारले जाईल.

कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे आकर्षित केले जाते, उपलब्ध वेळेच्या संदर्भात, सुरक्षित मालमत्ता परत करण्यासाठी.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा- कसबे तडवळे**<br>**कर्जदार -**<br>1. **श्री. बाळासाहेब सुधाकरराव शिंदे.** मु.पोस्ट - शिरूर अनंतपाळ, कळमगाव ता. लातूर, जि. लातूर.<br>2. **सौ. सुषमा बाळासाहेब शिंदे** मु. पोस्ट - शिरूर अनंतपाळ, कळमगाव. ता. लातूर, जि. लातूर | श्री. बाळासाहेब सुधाकरराव शिंदे यांच्या नावे मालमत्ता गहाण.<br>त्या सर्व जमिनीचे तुकडे कळमगाव घर क्रमांक 211/1, कळमगाव, ता. शिरूर अनंतपाळ आणि जिल्हा लातूर<br>**सीमा खालीलप्रमाणे आहेत :** पूर्व :- शासकीय रस्ता, पश्चिम :- सुधाकर विठ्ठलराव शिंदे यांचा भूखंड, दक्षिण :- शासकीय रस्ता, उत्तर :- भाऊसाहेब शिंदे यांचा भूखंड. | **मागणी सूचना :** दि. २८/०७/२०२५.<br>एकूण शिल्लक : रु. 13,30,639 /- + लागू न केलेले व्याज : रु. 66,382.00 /- +<br>एकूणः रु. 13,97,021.00 /- (तेरा लाख सत्याण्णव हजार एकवीस रुपये फक्त)<br>**सांकेतिक ताबा तारीख:** २४/१२/२०२५ |

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - २४/१२/२०२५**

**सही/-**
**मुख्य व्यवस्थापक आणि प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.**



## अुत्तम सेवा — मंगळवार दि. ३० डिसेंबर २०२५ — नोकरीच्या शोधात

**उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| **१)** | **सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालय, सोलापूर** | | | |
| १ | सफाईगार/उदकी (०३ पदे) | किमान सातवी उत्तीर्ण स्त्री/पुरुष | ३८ पर्यंत | ०७/०१/२६ |
| **२)** | **महाराष्ट्र लोकसेवा आयोग, MPSC** | | | |
| १ | महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित गट 'अ' व 'ब' संयुक्त पूर्व परिक्षा (८७ पदे) | कोणत्याही शाखेतील पदवीधारक असणारे स्त्री/पुरुष उमेदवार असावे. | ३८ पर्यंत | २०/०१/२६ |
| **३)** | **बँक ऑफ इंडिया, BOI (अ‍ॅप्रेंटिस करण्याकरिता)** | | | |
| १ | अ‍ॅप्रेंटिस (४०० पदे) | पदवीधारक स्त्री/पुरुष उमेदवार असावे. | २८ पर्यंत | १०/०१/२६ |
| **४)** | **नवी मुंबई महानगरपालिका, NMMC** | | | |
| १ | कनिष्ठ अभियंता (१२ पदे) | अभियांत्रिकी पदवी (विद्युत/यांत्रिकी) उत्तीर्ण असणारे स्त्री/पुरुष उमेदवार | ३८ पर्यंत | ०४/०२/२६ |
| २ | सहा. आयुक्त (०५ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३८ पर्यंत | |
| **५)** | **स्टाफ सिलेक्शन कमिशन, SSC** | | | |
| १ | कॉन्स्टेबल GD (२५४८७ पदे) | दहावी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | २३ पर्यंत | ३१/१२/२५ |
| **६)** | **दिल्ली अधीनस्थ सेवा निवड मंडळ, DSSSB** | | | |
| १ | बहुउद्देशीय कर्मचारी (७१४ पदे) | दहावी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | २७ पर्यंत | १५/०१/२६ |

**※ मोफत सरकारी अपडेट ※**
**सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्‌ॲपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला ''जॉईन'' असा मेसेज व्हॉटस्‌ॲप करावा.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| **७)** | **लातूर जिल्हा मध्यवर्ती बँक लि. लातूर, LDCCBL** | | | |
| १ | लिपीक (२५० पदे) | पदवी (६०%) व MS-CIT कोर्स उत्तीर्ण | ३० पर्यंत | २१/०१/२६ |
| २ | शिपाई (११५ पदे) | बारावी (६०%) गुणांसह उत्तीर्ण असावे | २८ पर्यंत | |
| ३ | वाहन चालक (१० पदे) | पदवी (६०%) व LMV परवाना | २८ पर्यंत | |
| **८)** | **मुंबई उच्च न्यायालय, BHC** | | | |
| १ | शिपाई (८८७ पदे) | सातवी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | ३८ पर्यंत | ०५/०१/२६ |
| २ | लिपीक (१३३२ पदे) | पदवी व इंग्रजी ४० टायपिंग उत्तीर्ण व MS-CIT कोर्स उत्तीर्ण | ३८ पर्यंत | |
| ३ | वाहनचालक (३७ पदे) | दहावी व हलके वाहन परवाना तसेच ३ वर्षे अनुभव आवश्यक | ३८ पर्यंत | |
| ४ | लघुलेखक (७५ पदे) | पदवी व टायपिंग - स्टेनो उत्तीर्ण | ३८ पर्यंत | |
| **९)** | **राष्ट्रीय संरक्षण व नौदल अकॅडमी, NDA & NA** | | | |
| १ | NDA & NA (३९४ पदे) | बारावी उत्तीर्ण किंवा ॲपिअर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | १९ पर्यंत | ३०/१२/२५ |
| **१०)** | **केंद्रीय लोकसेवा आयोग, UPSC** | | | |
| १ | संयुक्त संरक्षण सेवा परिक्षा CDS 2026 (४५१ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार किंवा पदवी ॲपिअर असावे. | २३ पर्यंत | ३०/१२/२५ |

सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.
२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)
३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

अुत्तम सेवा
१) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर. वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१.
www.uttamseva.org



## जिल्हा परिषद, सोलापूर

**ग्रामिण पाणी पुरवठा विभाग (यांत्रिकी उपविभाग)**

**ई - निवीदा क्र.यांउवि - ०३/२०२५-२०२६**

मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सोलापूर यांचेकडून विंधन सोलापूर जिल्हातील **हातपंप संच आणि हातपंप देखभाल व दुरुस्ती करीता आवश्यक हातपंपाचे सुट्टे साहित्य हत्यारे, औजारे इत्यादी खरेदी करीता एक वर्षा करीता दरकरार** करण्यासाठी **हातपंप संच उत्पादक** यांचेकडून www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दोन लिफाफा पध्दतीने ऑनलाईन निवीदा मागविण्यात येत आहेत.

निविदेच्या अटी व शर्ती, निविदा फॉर्म व इतर आवश्यक माहिती www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**ई-निविदा सादर करण्याचा कालावधी :-** दिनांक :- ३०/१२/२०२५ रोजी सायं. ०६.०० वाजलेपासून
दिनांक :- १६/०१/२०२६ रोजी सायं. ०६.०० वाजेपर्यंत

**ई-निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ :-** १९/०१/२०२६ सकाळी ११.३० वाजता

| तपशील | निविदा धारकाचा वर्ग | अंदाजित निविदा मुल्य रक्कम रु. लक्ष | बयाणा/ इसारा रक्कम रु. | सुरक्षा अनामत रक्कम रु. | ऑनलाईन निविदा फॉर्मची किंमत |
|---|---|---|---|---|---|
| A)India Mark II hand pump set and all its spare parts confirming to IS no. 15500 (part 1 to 8)/2004] complete with accessories along with 12 No. of 32mm dia nominal bore as per IS 1239 part 2nd 1992, hot dip galvanized screwed & socketed fitted with socket made of seamless or machined from solid bar. (Socket fitted at one end & thread protector at the other end), 12 No. of connecting rod 12mm dia X 3 mtr long made of bright bar electro galvanized fitted with hexagonal Socket, chain, handle head, water tank, and third plate with coupler, cylinder assembly & telescopic stand. Hand pump Spare Parts & Hand Pump Set | मुळ उत्पादक | रु. १५० लक्ष | २५0000/- रु. | पुरवठा रक्कमेच्या ३% | रु. २५,000/- |

**स्वाक्षरीत/-**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### भारतीय महिलांचे निर्विवाद वर्चस्व गाजविण्याचे लक्ष्य

**तिरुवनंतपुरम्** : भारतीय महिला संघ मंगळवारी येथे होणाऱ्या पाचव्या व अंतिम महिला टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात पराभूत श्रीलंकेविरुद्ध आपला आक्रमक खेळ कायम ठेवत ५-० ने मालिका विजय मिळवण्याचा प्रयत्न करेल. ही पाच सामन्यांची मालिका पुढील वर्षी जून-जुलैमध्ये इंग्लंडमध्ये होणाऱ्या टी-२० विश्वचषकासाठी भारताच्या तयारीचा एक महत्त्वाचा भाग आहे. मंगळवारच्या सामन्यानंतर, या महत्त्वाच्या स्पर्धेपूर्वी भारत ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडमध्ये प्रत्येकी तीन टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळणार आहे. २०२४ च्या टी-२० विश्वचषकात गट-टप्प्यातून बाहेर पडल्यानंतर, भारताने आपल्या दृष्टिकोनात बदल केला आणि अधिक आक्रमक खेळपद्धतीचा अवलंब केला, ज्यामुळे यावर्षी दोन मालिका विजय मिळवले आहेत. ही आमच्या सर्वांसाठी एक उत्तम मालिका होती. विश्वचषकानंतर आम्ही याच गोष्टीवर चर्चा केली होती की, आम्हाला आमचा दर्जा वाढवावा लागेल आणि टी-२० मध्ये अधिक आक्रमक व्हावे लागेल, असे कर्णधार हरमनप्रीत कौरने श्रीलंकेविरुद्ध मालिका जिंकल्यानंतर म्हटले होते. भारताच्या गोलंदाजांनीच या वर्चस्वपूर्ण कामगिरीत महत्त्वाची भूमिका बजावली आहे, पहिल्या तीन सामन्यांमध्ये फलंदाजांना फारसे काही करण्याची गरज पडली नाही. पण धडाकेबाज फलंदाज शेफाली वर्माने सर्वांना प्रभावित केले आहे. श्रीलंकेची कर्णधार चामरी अथापथ्थूने अनेकदा संघाचे नेतृत्व आघाडीवरून केले आहे.अथापथ्थूला इतर फलंदाजांकडून अधिक पाठिंबा मिळाल्यास, श्रीलंका संघाला मालिकेच्या अंतिम सामन्यात अधिक चांगल्या कामगिरीची आशा असेल.

### इंडिया ओपन बॅडमिंटन स्पर्धेचे स्थळ बदलले

**नवी दिल्ली** : बीडब्ल्यूएफ इंडिया ओपन सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धा १३ ते १८ जानेवारी दरम्यान केडी जाधव इनडोअर हॉलऐवजी इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियममध्ये आयोजित केली जाईल. स्पर्धेचे स्थळ बदलल्यामुळे स्पर्धेच्या व्याप्तीमध्ये आणि प्रेक्षकांच्या अनुभवात लक्षणीय वाढ होणार आहे. पुढील वर्षी ऑगस्टमध्ये भारत प्रतिष्ठित जागतिक अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करणार असल्यामुळे ही स्पर्धा जागतिक स्पर्धेसाठी एक चाचणी स्थळ म्हणून काम करेल. नवीन स्टेडियमची आसनक्षमता ८,००० पेक्षा जास्त आहे, जी मागील ठिकाणच्या क्षमतेच्या दुप्पट आहे, आणि इंडिया ओपनची तिकिटे स्पर्धेचे तिकीट भागीदार टिकमिंटद्वारे केवळ ऑनलाइन उपलब्ध असतील.

### शान मसूदचे वेगवान प्रथम-श्रेणी द्विशतक

**कराची** : कसोटी कर्णधार शान मसूदने प्रथम-श्रेणी क्रिकेटमध्ये १७७ चेंडूंमध्ये सर्वात वेगवान द्विशतक झळकावून, महान फलंदाज इंझमाम-उल-हकचा तीन दशके जुना विक्रम मोडला आहे. प्रेसिडेंट्स कप विभागीय स्पर्धेच्या पहिल्या दिवशी सुई नॉर्दर्न गॅस संघाकडून खेळताना मसूदने सहार असोसिएट्सविरुद्ध हा विक्रम केला. यापूर्वी हा विक्रम माजी कर्णधार इंझमामच्या नावावर होता, ज्याने १९९२ मध्ये इंग्लंडमधील एका सराव सामन्यात १८८ चेंडूंमध्ये द्विशतक झळकावले होते. रविवारी सामन्याच्या पहिल्या दिवसाच्या अखेरीस मसूद १८५ चेंडूंमध्ये २१२ धावांवर नाबाद होता. परदेशी फलंदाजाकडून सर्वात वेगवान द्विशतकाचा विक्रम अजूनही भारताच्या वीरेंद्र सेहवागच्या नावावर आहे.

### पायाच्या दुखापतीमुळे ॲटकिन्सन अंतिम ॲशेस कसोटीतून बाहेर

**सिडनी, २९ डिसेंबर-**

इंग्लंडचा वेगवान गोलंदाज गस ॲटकिन्सन पायाच्या दुखापतीमुळे सिडनी येथे होणाऱ्या पाचव्या व अंतिम ॲशेस क्रिकेट कसोटी सामन्यातून बाहेर झाला आहे. त्यामुळे पाहुण्या संघाच्या जखमी खेळाडूंच्या यादीत आणखी एकाची भर पडली आहे. बॉक्सिंग-डे कसोटीच्या दुसऱ्या दिवशी सकाळी ॲटकिन्सनला दुखापत झाली होती व सोवारी स्कॅननंतर त्याच्या डाव्या पायाला दुखापत झाल्याचे निश्चित झाल्यावर त्याला अधिकृतपणे संघाबाहेर करण्यात आले. या मालिकेत इंग्लंडने आधीच स्टार वेगवान गोलंदाज मार्क वुड (गुडघा) आणि जोफ्रा आर्चर (साइड स्ट्रेन) यांना गमावले आहे. ४ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या पाचव्या कसोटीसाठी २७ वर्षीय मॅथ्यू पॉट्स संघात येण्याची शक्यता आहे आणि तो ब्रायडन कार्स व जोश टंग यांच्यासोबत गोलंदाजीची धुरा सांभाळेल. पर्थध्ये मैदानात उतरलेल्या मूळ चार वेगवान गोलंदाजांपैकी आता कार्स हा एकमेव गोलंदाज शिल्लक आहे. त्यांना विश्वास होता की ते आपल्या वेगवान गोलंदाजीने ऑस्ट्रेलियाच्या

# विदर्भाचा जम्मू-काश्मीरवर ५ गड्यांनी विजय

## विजय हजारे चषक क्रिकेट ● अमन मोखाडे, रविकुमार समर्थची शतके


शतकवीर रविकुमार समर्थ


सामनावीर अमन मोखाडे

♦ **राजकोट, २९ डिसेंबर**

विजय हजारे चषक क्रिकेट स्पर्धेत सोमवारी येथे खेळल्या गेलेल्या एलिट ब गटातील साखळी सामन्यात अमन मोखाडे व रविकुमार समर्थच्या दमदार शतकांच्या बळावर विदर्भाने जम्मू-काश्मीरवर ५ गड्यांनी विजय नोंदविला. विदर्भाचा हा या स्पर्धेतील दुसरा विजय ठरला. ब गटात उत्तर प्रदेश १२ गुणांसह पहिल्या स्थानावर आहे. जम्मू-काश्मीर, विदर्भ, बडोदा व बंगालचे प्रत्येकी ८ गुण असून ते अनुक्रमे दुसऱ्या, तिसऱ्या, पाचव्या व सहाव्या स्थानावर आहेत.

विदर्भ संघाचा कर्णधार हर्ष दुबेने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. जम्मू-काश्मीरने ५० षटकांत ९ बाद ३११ धावा उभारल्या आणि विदर्भासमोर विजयासाठी ३१२ धावंचे लक्ष्य ठेवले. विदर्भाने ४३.३ षटकांत ५ गडी गमावित ३१५ धावा काढून आपला विजय साकार केला.

जम्मू-काश्मीरच्या पहिल्या फळीतील व तळाच्या फळीतील फलंदाजांनी जबरदस्त फलंदाजी करत धावसंख्येला आकार दिला. कामरान इक्बालने शुभम खजुरिया (१७) व यावीर हसनच्या साथीने संघाला शंभर धावांचा टप्पा गाठून दिला. कामरानने ६८ चेंडूंत ७ चौकारांसह ५४ धावांची, तर यावीर हसनने ९४ चेंडूंत ८ चौकारासह ७९ धावांची खेळी केली. अब्दुल सामदने ३२ धावांची, अकिब नबीने ४० धावांची, तर युधवीर सिंगने नाबाद ४२ धावांची भर घातली.

सलामीवीर अमन मोखाडे व रविकुमार समर्थने शतके झळकावून विदर्भाच्या विजयाचा पाया मजबूत केले. अमनने १२५ चेंडूंत १६ चौकार व ३ षट्कारांसह १३९ धावांची खेळी केली, तर रविकुमारने १०८ चेंडूंत १२ चौकारांसह ११४ धावांची खेळी केली. अमन मोखाडे सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला. (वृत्तसंस्था)

### मुंबईचा छत्तीसगडवर विजय

**मुलानीचे ५, शार्दुल ठाकूरचे ४ बळी**

♦ **जयपूर, २९ डिसेंबर**

विजय हजारे चषक क्रिकेट स्पर्धेत येथे खेळल्या गेलेल्या एलिट क गटातील साखळी सामन्यात मुंबईने छत्तीसगडवर ९ गड्यांनी एकतर्फी विजय नोंदविला.

शम्स मुलानी व शार्दुल ठाकूरने प्रभावी गोलंदाजी करत छत्तीसगडला ३८.१ षटकांत सर्वबाद १४२ धावांत गुंडाळले. त्यानंतर अंगकृश रघुवंशी व सिद्धार्थ लाडने दमदार फलंदाजी करत मुंबईला विजय मिळवून दिला. मुंबईने २४ षटकांतच १ बाद १४४ धावा केल्या.

छत्तीसगडकडून अमनदीप खरे (६३) व अजय मंडलने (४६) मुंबईच्या गोलंदाजांचा धैर्याने सामना केला. त्यांनी १०५ धावांची पाचव्या गड्यासाठी भागीदारी करत जोरदार प्रतिकार केला, मात्र इतर फलंदाज मुलानी व ठाकूरच्या गोलंदाजीसमोर खेळपट्टीवर फार वेळ टिकाव धरू शकले नाहीत. शम्स मुलाने ३१ धावांत ५ बळी, तर शार्दुल ठाकूर ३१ धावांत ४ बळी टिपले. डावखुरा फिरकी गोलंदाज अष्टपैलू खेळाडू शम्स मुलानीने लिस्ट ए क्रिकेटमध्ये पहिल्यांदाच पाच बळी घेण्याचा पराक्रम केला. मात्र शार्दुल ठाकूर सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

माफक लक्ष्याचा पाठलाग करताना, मुंबईने हे काम सहजपणे पूर्ण केले. अंगक्रिश रघुवंशीने ६६ चेंडूत सहा चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने नाबाद ६८ धावांची खेळी केली. अनुभवी फलंदाज सिद्धेश लाडने ४२ चेंडूत नाबाद ४८ धावा करून त्याला चांगली साथ दिली. (वृत्तसंस्था)

# बार्शीने राष्ट्रीय खेळाडू घडविले : विजय राऊत

**निमंत्रित व्हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन**

**कर्मवीर व्हॉलीबॉल चषक २०२५-२६**



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२९ डिसेंबर**

श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या विविध शाखांनी राष्ट्रीय ख्यातीचे खेळाडू घडविले असून, जो खेळाडू गुरुचा आदर राखतो तो खेळाडू नेहमी आघाडीवर राहतो, असे प्रतिपादन येथील प्रसिद्ध उद्योजक विजयनाना राऊत यांनी केले.

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त श्री शिवाजी महाविद्यालय, महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशन, व्हॉलीबॉल असोसिएशन सोलापूर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या पीएम-उषा योजनेअंतर्गत आयोजित राज्यस्तरीय नियंत्रित व्हॉलीबॉल स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव होते. यावेळी सचिव प्रकाश पाटील, खजिनदार जयकुमार शितोळे, संचालक विष्णू पाटील, डॉ. दिलीप मोहिते, प्राचार्य डॉ. चंद्रकांत मोरे, माजी उपनगराध्यक्ष रमेश पाटील, नूतन नगरसेवक भारत पवार, संदेश काकडे तसेच डॉ. रामचंद्र जगताप, प्राचार्य डॉ. अब्दुल शेख, आंतरराष्ट्रीय पातळीवरील पंच अनिल गिराम, डॉ. रमेश आजरी, चंदू पवार, प्रताप पाटील, किरण पाटील, जयकुमार बारंगुळे, प्रकाश मनगिरे, किरण देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. अब्दुल शेख यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. आसावरी फडतारे आणि प्रा. विजया जगताप यांनी केले तर आभार डॉ. सोमनाथ यादव यांनी मानले.

पहिला सामना- खामगाव अ विरुद्ध मुंबई ब यांच्यात झालेल्या सामना खामगाव अ या संघाने पहिला सेट २५ -१९, दुसरा सेट २५-१७ या फरकाने जिंकला.

# सूर्या कॉर्पोरेट ट्रॉफी क्रिकेट; एमएससीबी संघास विजेतेपद



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ डिसेंबर-**

एमएससीबी संघाने सन्मित्र डेव्हलपर्सच्या सूर्या कॉर्पोरेट ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.

अंतिम सामन्यात त्यांनी क्सिस बँकेचा पराभव केला. पारितोषिके पोलीस अधीक्षक प्रीतम यावळकर यांच्या हस्ते देण्यात आली. यावेळी सोलापूर ग्रामीणचे उपविभागीय पोलीस अधीक्षक संकेत देवळेकर, सन्मित्र डेव्हलपर्सचे अनिकेत कलशेट्टी, पत्रकार प्रशांत जोशी, आकाशवाणीचे निवेदक पद्माकर कुलकर्णी, म. स. पा. जुळे सोलापुरचे मारुती कटकधोंड, क्रीडा संघटक रविंद्र नाशिककर, फिजिओथेरपिस्ट डॉ. देशपांडे आदी उपस्थित होते. उपस्थितांचे स्वागत सूर्या ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार सुरवसे व अध्यक्ष संजय सुरवसे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनीष काळे यांनी केले. स्पर्धा यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी अप्पा रामदासी, मनीष काळे, दत्ता शिंदे, ज्ञानेश्वर लिंबोळे व काशिनाथ औरसंग यांनी सहकार्य केले.

स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू : सामनावीर पुरस्कार - किशोर गोटीवाले (एमएससीबी), गोलंदाज- हणमंत सारुक (एमएससीबी), फलंदाज व मालिकावीर- इम्रान मुल्ला (ऍक्सिस बँक).

# युनियन उर्दू प्राथमिक शाळेत क्रीडा सप्ताह उत्साहात सुरु



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २९ डिसेंबर -**

युनियन ऊर्दू प्राथमिक शाळेत क्रीडा सप्ताहास उत्साहात सुरुवात झाली.

नजीर मुन्शी, अय्यूब अहमद नल्लामंदू , नजीर अजीज शेख , महिबूब तांबोळी यांच्या हस्ते हवेत फुगे सोडून या सप्ताहाचे उदघाटन करण्यात आले. यावेळी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबदल कै. बाबुराव डिसले जीवन गैरव पुरस्कार जाहिर झाल्याने नजीर अजीज शेख यांच्या पुणेरी पगडी व शाल घालून विशेष सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक अल्ताफ जकलेर पाहुण्याचे स्वागत नजीर शेख यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन जावेद काजी यांनी केले. आभार

जावेद गढवाल यांनी केले. यावेळी फरहान नल्लामंदू , आएशा शेख, इंडीकर, अयाज चौकी उपस्थित होते.

### आशिया चषक माझ्या हस्तेच स्वीकारावा लागेल

**कराची, २९ डिसेंबर**

जर भारताला टी-२० आशिया चषक २०२५ची ट्रॉफी हवी असेल, तर त्यांना ती दुबईध्ये माझ्याकडूनच स्वीकारावी लागेल, असा पाकिस्तान क्रिकेट मंडळाचे (पीसीबी) अध्यक्ष मोहसिन नक्वी यांनी पुरुच्चार केला. बीसीसीआयने आपल्या कर्णधाराला दुबईला पाठवून ती माझ्याकडून घ्यावी लागेल, असे नक्वी यांनी म्हटले आहे. आशिया चषकाच्या अंतिम सामन्यात पाकिस्तानवर विजय मिळवल्यानंतर, बक्षीस वितरण समारंभादरम्यान भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादवने नक्वी यांच्याकडून चषक स्वीकारण्यास नकार दिल्यापासून ती ट्रॉफी अजूनही दुबईतील एशियन क्रिकेट कौन्सिलच्या (एसीसी) कार्यालयात पडून आहे.एशियन क्रिकेट कौन्सिलचे (एसीसी) अध्यक्ष म्हणून ट्रॉफी सुपूर्द करण्याचा त्यांना अधिकार होता, असा दावा नक्वी यांनी दावा केला.

# सांगोला महाविद्यालयाच्या प्रज्ञा पवारची विद्यापीठ संघात निवड



**सांगोला, दि.२९ डिसेंबर -**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आयोजित आंतर महाविद्यालयीन बॅडमिंटन स्पर्धा शिवशक्ती इनडोअर स्टेडियम, बार्शी येथे पार पडलेल्या. या स्पर्धेत सांगोला महाविद्यालयातील प्रज्ञा प्रभाकर पवार हिची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे होणाऱ्या क्रीडा महोत्सव स्पर्धे साठी तसेच सिम्बॉयसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी, पुणे येथे होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, उपाध्यक्ष तात्यासाहेब केदार व प्रा.पी.सी.झपके, खजिनदार नागेश गुळमिरे, सचिव ऍड.उदयबापू घोंगडे, सहसचिव साहेबराव ढेकळे, संघास मार्गदर्शन करणारे प्र.प्राचार्य डॉ.सुरेश भोसले व क्रीडा शिक्षक प्रा.जगदीश चेडे यांनी प्रज्ञा पवारचे अभिनंदन केले.

# धाराशिवचे किशोरी गटात पाचवे सुवर्णशिखर





### ३९ वी किशोर-किशोरी राज्य अजिंक्यपद खो खो स्पर्धा : साताऱ्याचे पहिलेच किशोर अजिंक्यपद

**अष्टपैलू खेळाडूचा राणा प्रताप पुरस्कार साताऱ्याच्या आयुष यादवला तर हिरकणी पुरस्कार धाराशिवच्या राही पाटीलला**

**तभा वृत्तसेवा**
**मुंबई, दि. २९ डिसेंबर :**

शेवटच्या श्वासापर्यंत रंगलेल्या अंतिम सामन्यांतून किशोर गटात साताऱ्याने इतिहास घडवत पहिलेच अजिंक्यपद पटकावले. किशोरी गटात धाराशिवने आपले वर्चस्व कायम राखत पाचवे अजिंक्यपद आपल्या नावे केले. जल्लोष, थरार, कौशल्य आणि जिद्दीचा संगम अनुभवत वडाळ्याचे मैदान अक्षरशः खो-खोमय झाले. वडाळ्याच्या मैदानावर सुवर्णक्षणांची बरसात झाली.

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने तसेच मुंबई खो-खो संघटनेच्या विद्यमाने श्री समर्थ व्यायाम मंदिर, दादर आयोजित ३९ वी किशोर व किशोरी राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ, सहकारनगर, वडाळा, मुंबई येथे संपन्न झाली. या स्पर्धेने महाराष्ट्राच्या मातीतील खो-खो खेळाची खरी ताकद पुन्हा एकदा सिद्ध केली.

**किशोर गट : साताऱ्याचा पुण्यावर थरारक विजय**

अपेक्षेप्रमाणे किशोर गटाचा अंतिम सामना प्रचंड चुरशीचा ठरला. साताऱ्याने पुण्यावर २५-२३ (मध्यंतर १२-१२) असा अवघ्या दोन गुणांनी विजय मिळवत पहिलेच राज्य अजिंक्यपद जिंकले. मध्यंतराला दोन्ही संघांनी १०-१० गुणांसह २-२ ड्रीम गुण मिळवत सामना रंगतदार केला होता. दुसऱ्या डावात साताऱ्याने संयमी व आक्रमक खेळ करत विजयाची कोंडी फोडली. साताऱ्याकडून आयुष यादव (१.५० मि. संरक्षण व ८ गुण), आयुष पांगारे (१.३०, १.३० मि. संरक्षण व २ गुण), वरद पोळ (१.३० मि. संरक्षण व ४ गुण), स्वराज गाढवे (१.२० मि. संरक्षण व २ गुण), स्वराज उत्तेकर (१.३० मि. संरक्षण) यांनी अजिंक्यपदावर शिक्कामोर्तब केले. पुण्याकडून कर्तव्य गंदेकर (२ व २.२० मि. संरक्षण व ४ गुण), सोहम देशमुख (१.४५ मि. संरक्षण व ६ गुण), वेदांत गायकवाड (१.३० मि. संरक्षण व २ गुण), सत्यम सकट (६ गुण) यांनी दिलेली झुंज अखेर अपुरी ठरली.

**किशोरी गट : धाराशिवचे सोलापूरवर वर्चस्व**

किशोरी गटाच्या अंतिम सामन्यात धाराशिवने सोलापूरवर पूर्ण वर्चस्व गाजवत २४-१८ (मध्यंतर १९-६) असा ५ मिनिटे राखून ६ गुणांनी विजय मिळवला आणि पाचवे अजिंक्यपद पटकावले. पहिल्या डावातच धाराशिवने आक्रमण-संरक्षणाचा अप्रतिम समतोल साधत सामन्याची दिशा ठरवली होती. धाराशिवकडून राही पाटील (३.२० मि. संरक्षण व ६ गुण), स्वरांजली थोरात (२.०५ मि. संरक्षण व ४ गुण), मुग्धा सातपुते (नाबाद २.२० मि. संरक्षण), समीक्षा भोसले (१.५५ मि. संरक्षण व २ गुण) यांनी संघाला सुवर्णमुकुट मिळवून दिला. सोलापूरकडून ऋतुजा सुरवसे (१.५० मि. संरक्षण व ४ गुण), कार्तिकी यलमार (१.५० मि. संरक्षण व २ गुण), आसावरी जाधव (४ गुण) यांनी प्रयत्न केले; मात्र गतवर्षीचे विजेतेपद यंदा टिकवता आले नाही.

### सोलापूरची सर्वोत्कृष्ट संरक्षक कार्तिकी यलमार

#### सोलापूरची कार्तिकी यलमार सर्वोत्कृष्ट संरक्षक

स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीसाठी किशोर गटात राणा प्रताप पुरस्कार (अष्टपैलू खेळाडू) आयुष यादव (सातारा), उत्कृष्ट संरक्षक सोहम देशमुख (पुणे), उत्कृष्ट आक्रमक वरद पोळ (सातारा) यांना प्रदान करण्यात आला. किशोरी गटात हिरकणी पुरस्कार (अष्टपैलू खेळाडू) राही पाटील (धाराशिव), उत्कृष्ट संरक्षक कार्तिकी यलमार (कल्याणराव काळे स्पोर्ट्स क्लब वाडीकुरोली, ता. पंढरपूर, जि. सोलापूर), उत्कृष्ट आक्रमक मुग्धा सातपुते (धाराशिव) यांनी पटकावला.



#### मान्यवरांच्या उपस्थितीत बक्षीस वितरण

या स्पर्धेचे बक्षीस वितरण महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे सरचिटणीस संजय शेट्ये, मुंबई खो-खो संघटनेचे व श्री समर्थ व्यायाम मंदिर, दादरचे अध्यक्ष ॲड. अरुण देशमुख, प्रमुख कार्यवाह सुरेंद्र विश्वकर्मा, महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस व महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे सहयोगी उपाध्यक्ष डॉ. चंद्रजित जाधव, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, उपाध्यक्षा अश्विनी पाटील, संयुक्त चिटणीस जयांशु पोळ, बाळासाहेब तोरसकर, कार्यालयीन सचिव प्रशांत ईनामदर, पवन अगरवाल (फर्स्ट व्हिडीजि लायन्स क्लब), पीआयओ रवींद्र कडेल (लायन्स क्लब) यांच्या हस्ते पार पडले. यावेळी खो-खोचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### तलाठी कोतवाल संघटनांकडून तहसीलदार बुटे यांचा सत्कार

**दक्षिण सोलापूर, दि. २९ डिसेंबर...**

मंद्रूपचे नूतन तहसीलदार विष्णु बुटे यांचा दक्षिण सोलापूर तलाठी व कोतवाल संघटनेकडून सत्कार करण्यात आला. यावेळी तलाठी रावसाहेब कोकरे, शेखर शेड्याळ, निंगू कोळी, गणेश भुजबळ, बसवंत सुतार, मल्लिनाथ बाळगी, मल्लिकार्जुन भुरळे,अप्पू कोळी, बलभीम लोणारी, अमोल मगर, विश्वनाथ पवार, रमेश बबलादी, अमोल कांबळे,सीमा चवरे, किरण कोठूळे, शीतल वानोळे यांच्यासह तलाठी व कोतवाल संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

### पिलीव परिसरातील अनेक शेतकरी अनुदानापासुन अद्यापही वंचितच?

**पिलीव,दि.२९ डिसेंबर-**

यंदाच्या जोरदार पावसाने पिकांचे प्रचंड नुकसान झाले .शासनाने यासाठी शेतकऱ्यांना मदत केली. ग्राम महसुल अधिकारी स्तरावर याच्या याद्या तयार करुन त्या तहसील कार्यालयात जमा करण्यात आल्या. यानंतर काही शेतकऱ्यांना ई-केवायसी करण्यास सांगण्यात



आले. त्या शेतकऱ्यांनी महा ईसेवा केंद्रात जाऊन ई-केवायसी केली. सर्व प्रक्रिया करुनही अनेक शेतकऱ्यांना अजुनही मदतनिधी मिळालाच नाही. पिलीवसह, सुळेवाडी, झिंजेवस्ती, कुसमोड, बचेरी, शिंगोर्णी या गावातील अनेक शेतकरी अद्यापही मदतनिधीपासुन वंचितच आहेत. ते याबाबत तहसील कार्यालयात तसेच ग्राम महसुल अधिकारी यांच्याकडे हेलपाटे मारीत आहेत पण प्रशासन मात्र हात झटकून रिकामे होत आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये सध्या मोठा संभ्रम आहे. मदतनिधी मिळणार की नाही याविषयी शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. हा प्रश्न प्रशासनाने ताबडतोब मार्गी लावावा अशी मागणी अनुदानापासुन वंचित शेतकऱ्यांमधुन होत आहे. याबाबत ग्राम महसुल अधिकारी तसेच माळशिरस तहसील कार्यालयातील संबधीत अधिकारी खैरे यांना विचारले असता आमच्याकडून कुठलीही प्रक्रिया पेंडींग नसल्याचे सांगितले.

## चंद्रभागेतील सेबर तंत्रज्ञानाच्या मशिन्सबद्दल साशंकता

## गणेश अंकुशराव यांनी प्रकल्पाबाबत केले गंभीर आरोप

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२९ डिसेंबर -**

संतांनी ज्या चंद्रभागेचा उल्लेख माझी बहीण चंद्रभागा म्हणून केला ती चंद्रभागा नदी प्रचंड अशा प्रदुषणाच्या विळख्यात आहे. नमामि चंद्रभागा योजनेअंतर्गत या नदीचे पाणी स्वच्छ करण्यासाठी सेबर तंत्रज्ञानाचा वापर करीत ज्या मशिन्स इस्कॉन घाटाच्या बाजुने बसवल्यात त्या बंद अवस्थेत असुन शासनाची कोट्यावधींची लूट केली जात आहे. या मशिन्सचा खरा आका कोण? याचं उत्पन्न नेमकं कुणाच्या घशात जातंय असे एक ना अनेक सवाल सर्व सामान्य पंढरपूरकर नागरिकांकडून सध्या उपस्थित केले जात आहेत. या संपुर्ण प्रकल्पा संदर्भात येथील महर्षि वाल्मीकी संघाचे अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी देखील गंभीर आरोप करीत प्रशासनाकडून या संपुर्ण प्रकल्पाचीच चौकशी करावी अशी मागणी केली आहे.

चंद्रभागा नदीच्या पात्रातील पाण्याच्या शुध्दीकरणासाठी सेबर आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञानाचा वापर करुन दररोज १५ एमएलडी पाणी शुद्धीकरण करुन चंद्रभागेत पुन्हा सोडले जाणार असा गाजावाजा करीत चंद्रभागेच्या पात्रात इस्काँन घाटाच्या आसपास काही ठिकाणी मशिन्स लावण्यात आलेल्या आहेत. मात्र त्या मशिन्स सध्या चालू आहेत की बंद हाच मुळ सवाल आहे. या मशिन्सव्दारे आत्तापर्यंत चंद्रभागेतील किती एमएलडी पाणी शुध्दीकरण करुन पुन्हा ते नदीपात्रात सोडले आहे. या संदर्भातील नोंदी कुणाकडे आहेत. यासाठी आत्तापर्यंत किती खर्च झाला या बाबतच्या माहिती बद्दल पंढरपूरकरांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे. कारण एकीकडे मशिन बसविण्यापूर्वीची चंद्रभागा नदीची स्थिती आणि मशिन्स बसविल्या नंतरची नदी चंद्रभागेच्या पात्राची स्थिती या मध्ये काहीही फरक दिसत नसल्याचे त्या ठिकाणच्या एकंदर परिस्थिती वरुन निदर्शास येते आहे. त्यामुळेच या प्रकल्पाबाबत पंढरपूरकरांकडून एक ना अनेक सवाल उपस्थित केले जात आहे. कारण सद्यस्थितीत या मशिन्स उभ्या केलेल्या चंद्रभागेच्या पात्रातील परिसरातच घाणीचं प्रचंड साम्राज्य पसरलंय, मशिन्सच्या आजुबाजूला आळ्या, कीडे दिसत आहेत. मग या मशिन्सचा उपयोग काय ! कुणाचं घर भरण्यासाठी हा सगळा अट्टाहास सुरू आहे असा सवाल उपस्थित करत गणेश अंकुशराव यांनी देखील संबंधित प्रोजेक्टचीच मुळापासून चौकशी करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे आता देवाच्या नावाने कुणाचं उखळ कोण पांढरं करून घेतंय? असा प्रश्न मात्र उपस्थित झाला आहे.



### स्थानिक कामगारांचे पगार देखील नाहीत

संबंधित मशिन्स बसवलेल्या ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष पाहणी केल्याचा दावा अकुंशराव यांनी केलेला आहे. या मशिन बंद अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे.या मशिन्ससाठी इथल्या स्थानिक कामगारांचे अनेक महिन्यांपासून पगार सुध्दा केलेले नाहीत असा आरोपही अंकुशराव यांनी केलाय.

### मंत्री आल्यावरच मशिन्स सुरु असतात

दरम्यान या मशिन्ससाठी आजपर्यंत सहा ते सात कोटी रूपये या मशिनच्या ठेकेदाराने शासनाकडून उकळले असुन अठ्ठावीस ते तीस कोटी रूपये एवढे या मशीनचे वार्षिक बजेट आहे. कुणी मंत्री, नेता वगैरे आले तरंच या मशिन्स सुरु असतात, अन्य काळात नुसता दिखावा केला जातो मग नेमके हे सर्व पैसे कुणाच्या घशात जातात? असा खडा सवाल देखील यावेळी महर्षि वाल्मिकी संघाचे अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी उपस्थित केला आहे.

### मशिन्सची स्थिती महापूराच्या वेळी होती पाहण्यासारखी

यावर्षी मे महिन्याच्या मध्यापासूनच पावसाळ्यास सुरुवात झालेली होती. त्यामुळे उजनी धरणातून अगदी आषाढी यात्रेच्या अगोदर आणि यात्रे नंतर देखील भीमा नदीत मोठ्या प्रमाणावर पाणी सोडले गेले. अगदी उजनी धरण एक,दोन वेळा निश्चितच भरले जाईल ऐवढा पाण्याचा विसर्ग यावर्षी भीमा नदीपात्रात केला गेला. मात्र ज्या ज्या वेळी उजनी धरणातून भीमा नदी मध्ये पाणी सोडल्या नंतर येथील चंद्रभागेचे विशाल पात्र भयावह दिसत होते. कारण प्रत्येकवेळी चंद्रभागा दुथडी भरून वाहत होती. त्यावेळी या पात्रात पाणी शुध्दीकरणासाठी बसविलेल्या मशिन्सची अवस्था खरोखरच पाहण्यासारखी झालेली असत. त्यामुळे या पाणी शुध्दीकरण मशिन्सचे भवितव्य काय असा सवाल देखील चंद्रभागेचा महापूर पाहणाऱ्या पंढरपूरकर नागरिकांतून त्यावेळी आपसुकच उपस्थित केला जात असत. कारण या मशिन्सची ऐवढी भयावह स्थिती पाण्याच्या प्रवाहामुळे झालेली दृष्टीस पडत असे.



### सांगोला नगरपरिषदतर्फे नगराध्यक्ष व सदस्यांचा स्वागत समारंभ उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२९ डिसेंबर -**

सांगोला नगरपरिषदेच्या वतीने पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर सभागृह येथे नवनिर्वाचित लोकनियुक्त नगराध्यक्ष आनंदा माने व नवनिर्वाचित सदस्य यांचा स्वागत समारंभ मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांच्या हस्ते उत्साहात पार पडला. यावेळी सर्व सदस्यांचा शाल व रोपटे देऊन स्वागत करण्यात आले. याप्रसंगी सर्व विभागप्रमुख यांनी आपल्या विभागाची माहिती दिली. सांगोला शहराला विकासाची नवी उंची गाठण्यासाठी प्रशासन व सदस्यांनी एकत्र काम करावे तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी नागरिकांची कामे जलद गतीने निकाली काढावीत अशा सूचना नगराध्यक्ष आनंदा माने यांनी याप्रसंगी केल्या. यावेळी नगरसेविका राणी माने, नगरसेवक रमेश जाधव व ज्ञानेश्वर तेली यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी नगरपरिषदेचे सर्व अधिकारी, कर्मचारी, शहरातील नागरिक उपस्थित होते.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कासारवाडी येथे बाल आनंद बाजार

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २९ डिसेंबर -**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कासारवाडी येथे दि. २७ डिसेंबर रोजी बाल आनंद बाजार आयोजित करण्यात आला होता.

प्रथम सरपंच अश्विनी मंडलिक, उपसरपंच सुधीर गायकवाड, शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा प्रीती कांबळे, उपाध्यक्षा अंबिका खाडे यांच्या हस्ते बाल आनंद बाजारचे उद्घाटन करण्यात आले. आनंद बाजारात मेथी, पालक, कांद्याची पात, करडी, चुका, हरभऱ्याची भाजी, कोथिंबीर या पालेभाज्या, वांगी, भोपळा, बटाटे, गाजर, मिरची, काकडी, कोबी, फ्लॉवर, मटार, बोर, पेरु तसेच सर्व प्रकारचे शालेय साहित्य, खाऊ गल्लीमध्ये वडापाव, पॅटीस, भजे, पाणी पुरी, भेळ इत्यादी साहित्य विद्यार्थ्यांनी विक्रीस आणले होते.

आनंद बाजारात बार्शी मार्केट समितीचे नूतन संचालक प्रवीण गायकवाड, सौ. लीना गायकवाड, माजी सरपंच राकेश मंडलिक, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष शरद गुंड, नितीन मंडलिक, सर्व पालक, ग्रामस्थ सर्वांनी खरेदीचा आनंद घेतला. आनंद बाजारात एकूण १३५२० रुपयांची उलाढाल झाली. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी विक्रीसाठी सहभाग घेतला. आनंद बाजार यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक सुधाकर बडे, वीणा कदम, अभयकुमार कसबे, श्रीमती बिनादेवी दरेकर, बाळासाहेब मुंढे, मनीषा भोसले, श्रीमती रेणुका मुंढे, द्वारका पिंपळे यांनी परिश्रम घेतले. ग्रामस्थांचा मोठा प्रतिसाद लाभला.



## निधन वृत्त...

### सुभद्रा चिट्टे



**सोलापूर, दि.२९ डिसेंबर**

मुळचे कणबस (ता. दक्षिण सोलापूर) येथील रहिवाशी व सध्या होटगी रोडवरील काडादी नगरात राहत असलेल्या सुभद्रा प्रबण्णा चिट्टे (वय-८२) यांचे दि.२९ डिसेंबर रोजी राहत्या घरी वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी दि.३० डिसेंबरला दुपारी तीन वाजता कणबस येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, सुना, दोन मुली, जावई, नातू असा परिवार आहे. चिंचोळी एमआयडीसीतील प्रभू रॉकशेप कंपनीचे मालक सिध्दाराम चिट्टे यांच्या त्या मातु:श्री होत.

## वाचनानेच सामाजिक परिवर्तन : आ. मोहिते-पाटील

### जिल्हा ग्रंथालय संघाचे वार्षिक अधिवेशन अरण येथे उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२९ डिसेंबर -**

वाचनालये वाचनाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन घडविण्याचे महत्त्वाचे काम करतात. वाचनाचे प्रभावी माध्यम म्हणून शासनमान्य वाचनालये काम करीत आहेत असे प्रतिपादन आ.रणजीतसिंह मोहिते पाटील यांनी केले. ते सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघाच्या ४६ व्या वार्षिक अधिवेशनात अरण (ता.माढा) येथे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष गजानन कोटेवार होते. यावेळी आ.अभिजीत पाटील म्हणाले, शासनमान्य सार्वजनिक वाचनालयांच्या समस्या सोडविण्यासाठी सभागृहात प्रश्न उपस्थित करून सोडवून घेण्याचा प्रयत्न करेन. यावेळी प्रेरणादायी वक्ते सुभाष रणदिवे यांनी आपल्या व्याख्यानाने मंत्रमुग्ध केले. याप्रसंगी जिल्हा ग्रंथालय व सांगोला तालुका ग्रंथालय संघाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. उपस्थित प्रतिनिधींच्या शंकेचे निरसन जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनील हुसे यांनी केले.

या अधिवेशनास डा.पी.बी.रोंगे, बाळासो पाटील, भारतआबा शिंदे, जिल्हा ग्रंथालय कार्यालयाचे प्रमोद पाटील, संजय ढेरे, राज्य ग्रंथालय संघाचे सोपानराव पवार, राम मेकले, भीमराव पाटील, गुलाबराव पाटील, दशरथ क्षीरसागर, तुळजापूरचे मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे, पांडुरंग सुरवसे, ज्योतीराम गायकवाड, कुंडलिक मोरे, विजयकुमार पवार, साहेबराव शिंदे, प्रमोद बेरे, प्रशांत लोंढे, प्रकाश शिंदे, ॲड.अनिल पाटील, शैलशिल्पा जाधव, शैलजा पवार, सारिका माडीकर, सारिका मोरे, वृषाली हजारे, छाया मोरे, रंजना सरगर, सुनीता रणदिवे, नंदा कुरले, रमा ईपलपल्ली, विलास कदम, शिवाजी नागणे, नामदेव कुचेकर, बाळासाहेब शिंदे, सुभाष सुडके, अमर कुलकर्णी, संजय सरगर, अशोक व्हटे, दत्ता पाटील, हरिदास घोडके, बिरु काळे, रणजित भगत, प्रथमेश बनसोडे, सोमनाथ लोंढे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.हरिदास रणदिवे, सूत्रसंचालन सुप्रिया किरनाळे यांनी केले. आभार विनोद गायकवाड यांनी मानले.




## एसटी बसची स्कूलबसला जोरदार धडक; तीन विद्यार्थ्यांसह चालक जखमी

### सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभूर्णी, दि.२९ डिसेंबर-**

सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील टेंभुर्णी पासून ८ किलोमीटर अंतरावर उजनी पाटीच्या कट पॉईंटजवळ पांडूरंग हॉटेलसमोर आज सकाळी एसटी बस व स्कूलबस यांच्यात भीषण अपघात झाला. या अपघातात शाळा बसमधील तीन विद्यार्थ्यांसह बसचालक जखमी झाले. या घटनेप्रकरणी टेंभूर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेची माहिती मिळताच टेंभूर्णी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नारायण पवार, भाजपचे माढा तालुकाध्यक्ष योगेश बोबडे व सरपंच सुरजा बोबडे यांनी रुग्णालयात भेट देऊन जखमी विद्यार्थ्यांची व चालकाची विचारपूस केली. टेंभूर्णी पोलीस ठाण्याच्या माहितीनुसार, फिर्यादी बनकर विमल काळे (वय ४५, व्यवसाय - चालक, रा. शेवरे, ता. माढा) हे आज सकाळी सुमारे ७.३५ वाजता आयशर कंपनीची स्कूलबस (एमएच४८के०८६२) घेऊन आलेगाव येथून रांझणी व भिमानगर परिसरातील विद्यार्थ्यांना शाळेत घेऊन जात होते. उजनी गावातील विद्यार्थ्यांना घेण्यासाठी रस्ता ओलांडत असताना सोलापूरकडून भरधाव वेगात येणाऱ्या एसटी बसने (एमएच१४-बीटी-४५७४) स्कूलबसच्या उजव्या बाजूस जोराची धडक दिली. एसटी बस चालक संगमेश्वर बालाजीराव भवाळ (रा. सावरगाव थोट, ता. अहमदपूर, जि. लातूर) यांनी रस्त्याची परिस्थिती न पाहता निष्काळजीपणे व वेगात वाहन चालवल्यामुळे हा अपघात झाल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या अपघातात शाळा बसमधील समर्थ नवनाथ कवडे, रूद्र किसन माने व श्रेया अमर खडके (सर्व रा. रांझणी, ता. माढा) या विद्यार्थ्यांना किरकोळ दुखापत झाली. तसेच स्कूलबस चालक विमल काळे हेही जखमी झाले. अपघातात शाळा बसचे अंदाजे ६५ हजार रुपये तर एसटी बसचे सुमारे २५ हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. पुढील तपास पोलीस निरीक्षक नारायण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल गणेश जगताप करीत आहेत.




## ज्योतिबा मंदिराचा सभामंडप श्रध्दा-सुविधेचा संगम ठरेल : आ. अभिजीत पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २९ डिसेंबर -**

चव्हाणवाडी (टे) येथील नांगरे वस्तीतील प्रसिद्ध ज्योतिबा मंदिराच्या नवीन सभामंडपाच्या उभारणीस आज अधिकृत सुरुवात झाली. आमदार निधीतून मंजूर झालेल्या १० लाख रुपयांच्या कामाचे विधिवत भूमिपूजन माढा तालुक्याचे आमदार अभिजीत पाटील यांच्या हस्ते उत्साहात पार पडले.

या प्रसंगी देवस्थानच्या वतीने आमदार अभिजीत पाटील यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. त्यांच्यासमवेत उपस्थित राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुरज देशमुख, माजी सरपंच प्रमोद कुटे तसेच डी.व्ही.पी. बँकेचे चेअरमन औदुंबर देशमुख यांचाही देवस्थानच्या वतीने सत्कार करण्यात आला. भूमिपूजनप्रसंगी बोलताना आमदार अभिजीत पाटील यांनी भावनिक शब्दांत सांगितले की, ज्योतिबा मंदिर परिसरात उभारला जाणारा हा सभामंडप केवळ बांधकाम नसून श्रद्धा, सुविधा आणि सामाजिक एकोपा यांचे प्रतीक ठरेल. या सभामंडपामुळे महिला व ज्येष्ठ नागरिकांना देवदर्शनासाठी बसण्याची उत्तम व सुरक्षित सोय उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी चव्हाणवाडी गावातील स्मशानभूमीचा प्रश्न गांभीर्याने घेत असल्याचे स्पष्ट करत, हा प्रश्न येत्या दोन-तीन महिन्यांत निश्चितपणे मार्गी लावला जाईल, असे ठाम आश्वासन ग्रामस्थांना दिले. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि प्रत्येक नागरिकाच्या अडचणी सोडवण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचेही त्यांनी ठासून सांगितले. या कार्यक्रमादरम्यान नवनाथ शिंदे यांनी नव्याने खरेदी केलेल्या जेसीबी मशीनची पूजा आमदार अभिजीत पाटील यांच्या हस्ते करण्यात आली. *या कार्यक्रमास राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुरज देशमुख, डी.व्ही.पी. बँकेचे चेअरमन औदुंबर देशमुख, माजी सरपंच प्रमोद कुटे, अरुण चव्हाण, माजी सरपंच नवनाथ शिंदे, सुभाष इंदलकर, माजी सरपंच भागवत खडके, नागेश माळी, अनिल नांगरे, विजय कदम, जमाल काझी, सुधीर पाटील, नितीन चव्हाण (वायरमन), सुधीर नांगरे, मंगेश इंदलकर, शशिकांत नांगरे, युवराज मिस्किन, श्याम नांगरे, ज्योतीराम शिंदे, सचिन शिंदे, सागर चव्हाण, विष्णू महालिंगडे, सोमनाथ गायकवाड (वरवडे), संदीप कुटे, दत्तात्रय गायकवाड, निलेश पवार, गणेश नांगरे, नितीन नांगरे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मनोज नांगरे यांनी केले, तर आभारप्रदर्शन सुधीर नांगरे यांनी मानले.



### ऊस उत्पादकांना दिलासा

गावातील ऊस उत्पादक शेतकरी व सभासदांना उद्देशून बोलताना आमदार पाटील म्हणाले की, साखर कारखाने सुरू होऊन ५० ते ५५ दिवस झाले असून पुढील किमान तीन महिने गाळप हंगाम सुरू राहणार आहे. त्यामुळे कोणत्याही शेतकऱ्याने घाबरून जाऊ नये. 'या गावातील शेतकऱ्यांचा एक टिपर ऊसही शिल्लक राहणार नाही' असे ठाम आश्वासन त्यांनी दिले.

# प्रा.अजय दासरी यांच्या विरोधात शिवसैनिकांचे बंड

## शहर उत्तर, शहर मध्यमधील पदाधिकाऱ्यांनी सोपविले राजीनामे



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ डिसेंबर-**

शिवसेना 'उबाठा'चे पदाधिकारी, शिवसैनिक यांना डावलून अन्य पक्षातून आलेल्या लोकांना उमेदवारी विकली, असा आरोप करत जिल्हाप्रमुख प्रा.अजय दासरी यांच्या विरोधात शहर प्रमुख महेश धाराशिवकर यांच्या नेतृत्वाखाली शिवसैनिकांनी बंड पुकारले आहे. दरम्यान, शहर उत्तर व शहर मध्य विधानसभा मतदार संघातील पदाधिकाऱ्यांनी संपर्कप्रमुख अनिल कोकीळ यांच्याकडे राजीनामे सोपविले आहेत.

उमेदवारी देतो असे म्हणत जिल्हाप्रमुख प्रा.अजय दासरी यांनी अनेकांना झुलवत ठेवले. काही महिला शिवसैनिकांना डोळ्यात पाणी आणायले लावले. 'महाविकास आघाडी'त शिवसेना 'उबाठा'ला अवघ्या ३० जागा देण्यात आले आहेत. त्यातील ५ जागा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला देण्याचे ठरले. याबाबत शिवसैनिकांमध्ये प्रचंड नाराजी असल्याचे सांगण्यात आले. या आंदोलनात उपजिल्हा प्रमुख प्रताप चव्हाण, बाळासाहेब जगताप, योगेश सलगर, नागराज कंदुकूर, अनुप रायकर, बंटी बेळमकर, मीनाक्षी गवळी, रुपनर, अमित भोसले आदींचा समावेश होता.

### प्रा.अजय दासरी यांचा मनमानी कारभार

शिवसेना ठाकरे गटाचे सोलापूर जिल्हाप्रमुख संतोष पाटील यांनी जिल्हाप्रमुख प्रा.अजय दासरी यांच्यावर आरोप करताना म्हणाले, प्रा.दासरी हे मनमानी कारभार करीत आहेत. त्यामुळे पक्षात अंतर्गत वाद, संघटनात्मक गोंधळ निर्माण होत आहे. या सर्व प्रकारामुळे आपण राजीनामा दिला आहे.

# राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटात दिवसभर झाली खलबते



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ डिसेंबर-**

राज्याचे कृषिमंत्री तथा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सोलापूरचे संपर्क मंत्री दत्तात्रय भरणे सोलापूर दौऱ्यावर आले होते. महापालिका निवडणुकीच्या पुढील रणनीती ठरवण्यासाठी बालाजी सरोवर येथे दिवसभर खलबते झाली. शिवसेना व राष्ट्रवादी युती अंतर्गत राष्ट्रवादीच्या वाट्याला ५१ जागांवर कोणता उमेदवार निश्चित करायचा? यावर शिक्काम ोर्तब करण्यात आला. दरम्यान, आजरोजी दुपारी सर्व्हेक्षण अहवाल आल्यानंतर संबंधित उमेदवारांना एबी फॉर्म दिला जाईल, असे ना.दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.

किसन जाधव व नागेश गायकवाड यांच्या 'घरवापसी'संदर्भात विचारले असता ना.भरणे हे हात झटकत याबाबत मला काहीच कल्पना नाही. आमची भेट झाली. परंतु यासंदर्भात आमचे बोलणे झाले नाही. प्रत्येक व्यक्तीला आपला स्वतःचा अधिकार आहे. जो तो आपला निर्णय घेतील. ते जर राष्ट्रवादी पुन्हा येणार असतील तर त्यांचे आनंदाने स्वागतच आहे, असे सांगितले. भाजप आमचा मोठा भाऊ आहे. त्यामुळे प्रचारात युतीचा धर्म पाळू, वैयक्तिक टीकाटिप्पणी केली जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.




## राजकीय यात्रा











# किसन जाधव, नागेश गायकवाड यांना 'राष्ट्रवादी'त 'नो एंट्री'

### संतोष पवार, जुबेर बागवान यांचा विरोध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२९ डिसेंबर**

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी अजित पवार गटात मोठी उलथापालथ झाल्याचे पहावयास मिळत आहे. माजी गटनेता किसन जाधव, माजी नगरसेवक नागेश गायकवाड यांनी 'राष्ट्रवादी'ला रामराम करत 'भाजपा'त डेरेदाखल झाले. ते दोघे घरवापसी करण्याच्या मनस्थितीत आहेत. परंतु 'राष्ट्रवादी'त त्यांना 'नो एंट्री' आहे. शहर-जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांचा कडाडून विरोध होत असल्याचे सांगण्यात येते. दरम्यान, आम्ही 'भाजपा'मध्येच; आमचा निर्णय पक्ष घेईल, असे जाधव व गायकवाड यांनी सांगितले. किसन जाधव व नागेश गायकवाड यांना भारतीय जनता पार्टीत घेवून आपली उम



ेदवारी कट करण्यात येणार असल्याचा सुगावा लागल्याने 'भाजपा'चे शितल गायकवाड यांनी आत्मदहनाचा इशारा दिला होता. यावरुन भाजपा आणि राष्ट्रवादी या दोन्ही पक्षांमध्ये राजकीय हालचालींना उधाण आले. दरम्यान, 'भाजपा'कडून उमेदवारी निश्चित होणार नसल्याचे लक्षात येताच जाधव व गायकवाड हे घरवापसी करणार होते. मात्र, संतोष पवार व जुबेर बागवान यांनी नकार दिला. जुबेर बागवान यांनी तर काळा नेहरू शर्ट परिधान करत निषेध व्यक्त केल्याचे दिसून आले.

**आमचा निर्णय पक्ष घेईल :** राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या प्रवेशाच्या आरोळ्या उठल्यानंतर संध्याकाळी किसन जाधव आणि नागेश गायकवाड हे बालाजी सरोवर येथून बाहेर पडताना दिसून आले. मी अजून भाजपमध्ये आहे. आमचा निर्णय भाजप पक्ष आणि आमचे नेते घेतील, असे म्हणून ते निघून गेले.

**शेवटी घेतला काढता पाय :** बालाजी सरोवर येथे किसन जाधव आणि नागेश गायकवाड यांनी सकाळपासून संध्याकाळपर्यंत मुक्काम केला. भरणेमामा व्हाया राष्ट्रवादीत प्रवेशाची रणनीती ठरवली. परंतु ती प्रत्यक्षात आली नाही. शेवटी किसन भाऊंसह नागेशअण्णांनी काढता पाय घेतला.

**आज अंतिम निर्णय :** जाधव व गायकवाड यांच्या 'घरवापसी'च्या मुद्यावरुन शहराध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांनी राजीनामा देणार असल्याचा इशारा ना.दत्तात्रय भरणे यांच्याशी बोलताना दिला. त्यामुळे कोणताही निर्णय घेतला गेला नाही. जाधव व गायकवाड यांच्या 'घरवापसी'वर आज अंतिम निर्णय होणार असल्याचे सांगण्यात येते.

# उमेदवारी नाकारल्याने भाजपाचे करली शिंदेसेनेत

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२९ डिसेंबर-**

महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्यासाठी शेवटचे दिवस उरल्याने अनेक राजकीय घडामोडी घडत असून भारतीय जनता पार्टीकडून चार टर्म असलेले नगरसेवक श्रीनिवास करली यांना उमेदवारी नाकारल्याने त्यांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करून धनुष्यबाण हाती घेतले. तर दुसरीकडे मंगळवारी उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असल्याने सोमवारी दोन्ही शिवसेनेच्या वतीने अर्ज भरण्यासाठी ची गर्दी झाल्याचे दिसून आले. यामध्ये माजी नगरसेवक व इच्छुक उमेदवार पाहायला मिळाले.

आजपर्यंत पक्षासाठी प्रामाणिक काम केले. सुभाष देशमुख यांना आपल्या प्रभागातून १४ हजाराचे मताधिक्य दिले, त्यातच उमेदवारीबाबत कोणताही शब्द किंवा हालचाल दिसत नसल्याने हे पाऊल उचलावे लागल्याचे माजी नगरसेवक श्रीनिवास करली यांनी सांगितले. शिवसेनेत प्रवेश केला आहे. उमेदवारी बाबत अजून निश्चित नाही सोलापुरातील कोअर कमिटीचे प्रमुख उमेदवारी बाबत निर्णय घेतील असेही ते म्हणाले. यावेळी माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, जिल्हाप्रमुख अमर पाटील, शहर प्रमुख सचिन चव्हाण आदी उपस्थित होते.

# जागावाटप झाले, पण राजकीय धुकं कायम!

### 'महाविकास आघाडी'चे जागांचं ठरलं

### 'महायुती'तील धनुष्यबाण, घड्याळ सोबत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर । किरण बनसोडे**

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने सध्या शहराचे राजकारण अत्यंत गतिमान, तणावपूर्ण आणि निर्णायक वळणावर आले आहे. महाविकास आघाडी व महायुती या दोन्ही आघाड्यांतील हालचाली पाहता आगामी निवडणूक केवळ महापालिकेची नसून पक्षांतर्गत शक्तिपरीक्षा ठरण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत. महाविकास आघाडी जागांचं ठरलं आहे. महायुतीतील धनुष्यबाण - घड्याळ सोबत तर भाजपा एकला चलो रे असे चित्र आहे. भाजपमधील इच्छुकांची मोठी संख्या डोकेदुखी आणि आव्हान ठरणार आहे.

सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी कडाक्याच्या थंडीत आता राजकीय वातावरण तापू लागले आहे.महाविकास आघाडीने अखेर जागावाटप जाहीर करून निवडणूक मोडमध्ये प्रवेश केला आहे. कॉंग्रेस ४५, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष ३०, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष - २० आणि माकपा ७ जागा असे गणित ठरले आहे. दीर्घ चर्चेनंतर जागावाटप जाहीर झाल्याने कार्यकर्त्यांमध्ये काहीसा उत्साह निर्माण झाला असला, तरी नाराजी पूर्णपणे संपली आहे असे म्हणता येणार नाही. तरीही ''एकत्र लढण्याचा'' संदेश देत महाविकास आघाडीने आपली संघटनात्मक ताकद दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. जागा वाटपाच्या निर्णयात महाविकास आघाडीने बाजी मारली.

दुसरीकडे महायुतीतील परिस्थिती अधिक गुंतागुंतीची आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाने ''एकला चलो रे''ची भूमिका घेत '' आपकी बार ७५ पार'' असा नारा दिला होता. तर शिवसेना एकनाथ शिंदे गटाने भाजपकडे युतीचा प्रस्ताव दिल्याने चर्चा सुरू असली, तरी अंतिम निर्णय अद्याप अस्पष्ट होता. महायुतीतील समन्वयावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यातच अचानक महायुतीतील घटक पक्षांनी नवी राजकीय समीकरण जुळवून आणली. नाट्यमय राजकीय घडामोडीनंतर राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गट आणि शिवसेना शिंदे गटाची युती फायनल झाली. दोघांनीही ५० - ५० टक्के जागा वाटपाचा निर्णय आज एकत्रितरित्या जाहीर केला. यामुळे महायुतीत एक नवे समीकरण उदयास आले. सोलापूर महापालिकेतील १०२ पैकी हे दोन्ही पक्ष ५१ - ५१ जागा लढणार आहेत. यामुळे आता महायुतीतील भाजप हा एकला चलो रे च राहणार आहे. यामुळे यांच्यात आता मैत्रीपूर्ण लढत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

या सगळ्यात भाजपसमोरील सर्वात मोठे आव्हान म्हणजे इच्छुकांची प्रचंड संख्या. तब्बल १२०० इच्छुकांनी अर्ज दाखल केल्याने तिकीट वाटप हे मोठे राजकीय कसब ठरणार आहे. निष्ठावंत कार्यकर्त्यांना डावलल्यास बंडखोरी किंवा पक्षांतर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याच पार्श्वभूमीवर आमदार विजयकुमार देशमुख यांनी नाराज कार्यकर्त्यांच्या पाठीशी उभे राहण्याची भूमिका घेतल्याने भाजपमधील अंतर्गत समीकरणे अधिक ठळक झाली आहेत. पालकमंत्री जयकुमार गोरे व विजयकुमार देशमुख यांच्यात झालेली चर्चा ही नाराजी कमी करण्याचा प्रयत्न मानली जात आहे. पालकमंत्री गोरे यांनी तिकीट वाटपाचा अंतिम अधिकार स्थानिक आमदार व शहराध्यक्षांकडेच असल्याचे स्पष्ट करून हस्तक्षेप न करण्याची भूमिका घेतली आहे. मात्र, प्रत्यक्षात हे निर्णय कितपत सर्वसमावेशक ठरतात, यावरच भाजपचे यश किंवा अपयश अवलंबून असेल. नुकतीच पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आ. विजयकुमार देशमुख यांची नाराजी करण्यात यश मिळवले असल्याचे पाहायला मिळाले. भाजपा अंतर्गत पेटलेली राजकीय आग विझवण्याचा प्रयत्न होत असला तरी धग कायम असल्याचेच राजकीय चित्र आहे. भाजपाच्या इच्छुकांकडून आंदोलनापासून ते आत्मदहन करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. यामुळे भाजपा हे आव्हान कसे पेलणार हे महत्त्वाचे ठरणार आहे. भाजपाच्या नेतृत्वाची ही अग्निपरीक्षा आणि कसोटी ठरणार आहे.

**विकासाच्या मुद्द्यांपेक्षा पक्षांतर्गत संतुलन, रणनीतीची परीक्षा :** एकूणच, सोलापूर महापालिका निवडणूक ही विकासाच्या मुद्द्यांपेक्षा पक्षांतर्गत संतुलन, नाराजी आणि रणनीतीची परीक्षा ठरणार आहे. कोण नाराजीवर नियंत्रण ठेवते आणि कार्यकर्त्यांना सोबत ठेवते, हेच निकाल ठरवणारे प्रमुख घटक ठरतील. यामुळे सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीत चक्रावून टाकणाऱ्या घटना घडामोडींमुळे उत्सुकता निर्माण झाली आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## उमरगा न.प.च्या नवनिर्वाचित नगराध्यक्षांचा पदभार स्वीकार




**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२९ डिसेंबर -**
उमरगा नगर परिषदेचे नवनिर्वाचित लोकनियुक्त नगराध्यक्ष किरण उषाताई रविंद्र गायकवाड यांनी आज अधिकृतरित्या आपल्या पदाचा पदभार स्वीकारला. पदभार स्वीकारताना नगरपरिषद कार्यालयात साध्या पण सन्मानपूर्ण वातावरणात कार्यक्रम पार पडला.

यावेळी मा.आ. ज्ञानराज चौगुले यांनी नगराध्यक्ष किरण गायकवाड यांचा सत्कार करत महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ हे महत्त्वाचे पुस्तक भेट देत पुढील यशस्वी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. नगरपरिषदेच्या कारभारात कायदेविषयक मार्गदर्शन उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



## संक्षिप्त वृत्त...



### शिक्षक प्रवीण अंगबरे यांचा सत्कार

**लोहारा, दि.२९ डिसेंबर -**
स्मृती शेष रामलिंग आप्पा वैरागकर सामाजिक प्रतिष्ठान च्या वतीने दिला जाणारा महात्मा फुले स्मृतीशेष शिक्षक पुरस्कार जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कानेगाव येथील शिक्षक प्रविण अंगबरे यांना जाहीर झाल्याबद्दल शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष दादासाहेब कदम, मुख्याध्यापक बालाजी साळुंखे, मच्छिंद्र बोकडे, श्रीशैल् जट्टे, जयशंकर जवादे, गोविंद श्रीखंडे, संगीता सूर्यवंशी, वर्षाराणी जवादे उपस्थित होते.



### नगरसेवक मारुती खारवे यांचा इटकळ येथे सत्कार

**मंगरूळ, दि.२९ डिसेंबर -**
नुकत्याच पार पडलेल्या नळदुर्ग नगर परिषदेच्या निवडणुकीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने प्रभाग क्रमांक २ मधून भरघोस मतांनी विजयी झाल्याबद्दल नगरसेवक मारुती खारवे यांचा इटकळ येथील मित्र परिवाराच्या वतीने शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. उच्चशिक्षित, सामाजिक बांधिलकी जपणारे व लढवय्या कार्यकर्ते नगरसेवक म्हणून निवडून आल्याबद्दल त्यांचा हा सत्कार करण्यात आला. यावेळी इटकळ येथील तंटामुक्त समितीचे अध्यक्ष लियाकत खुदादे, सामाजिक कार्यकर्ते अब्दुल शेख, पोलीस महासंचालक यांचे अंगरक्षक राज एखंडे, तसेच पत्रकार चांदसाहेब शेख उपस्थित होते.




### बेलवाडी येथे सोनाली जगताप व तनुजा पाटील यांचा सत्कार

**लोहारा, दि.२९ डिसेंबर -**
लोहारा तालुक्यातील बेलवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या सहशिक्षिका सोनाली जगताप यांची राज्यस्तरावर स्पर्धेसाठी निवड झाल्याने त्यांचा सत्कार करण्यात आला. व सोनाली जगताप यांनी लातूर येथे विभाग स्तरावर झालेल्या गणित विज्ञान जादूगार स्पर्धेत क्रमांक मिळवल्याने त्यांची राज्यस्तरीय शिक्षक व अधिकारी कर्मचारी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. राज्यस्तरावर निवड झाल्याने त्यांचा सत्कार करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी सीए फाउंडेशन परीक्षा उत्तीर्ण झाल्याने तनुजा तानाजी पाटील या विद्यार्थीनीचा शाळेतर्फे सत्कार करण्यात आला. दोघांनाही शामची आई पुस्तक भेट देण्यात आले. यावेळी सोनाली जगताप व तनुजा पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी दादा पाटील, राजेंद्र माळवदकर, राजकुमार क्षीरसागर, विकास घोडके, लक्ष्मण जाधव यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

### उमरगात घरफोडी, सोन्याचे दागिने लंपास

**उमरगा, दि.२९ डिसेंबर -**
उमरगातील शिवपुरी रोड, गजानन मंदीराजवळ चंदु चरणसिंग पवार (वय २३) यांच्या घराची २५ ते २६ डिसेंबर दरम्यान घरफोडी करण्यात आली. अज्ञात व्यक्तीने घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि लोखंडी कपाटातून १३ ग्रॅम सोन्याचे दागिने, चांदीचे दागिने व २०,००० रुपये रोख असा एकूण ८५,५०० रूपये किमतीचा माल चोरून नेला.

# नळदुर्ग न.पा.च्या लोकनियुक्त नगराध्यक्ष बसवराज धरणे यांचा पदग्रहण सोहळा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२९ डिसेंबर -**
नळदुर्ग नगरपालिकेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष बसवराज धरणे यांचा पदग्रहण सोहळा दि. २९ डिसेंबर रोजी मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी आमदार राणा जगजितसिंह पाटील व भाजपचे नेते सुनील चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत नगराध्यक्षांनी पदभार स्वीकारला.

पदग्रहणानिमित्त शास्त्री चौक ते नगरपालिका कार्यालय या मार्गावर नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्यासह सर्व नगरसेवक, आमदार राणा जगजितसिंह पाटील, भाजपचे नेते सुनील चव्हाण, भाजपचे जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य नितीन काळे तसेच असंख्य नागरिकांच्या उपस्थितीत वाजत-गाजत, फटाक्यांच्या आतषबाजीत भव्य मिरवणूक काढण्यात आली.

यानंतर नगरपालिका कार्यालयात नगरपालिकेचे मुख्याधिकारी रामकृष्ण जाधव यांनी आमदार राणा जगजितसिंह पाटील व सुनील चव्हाण यांच्या उपस्थितीत लोकनियुक्त नगराध्यक्ष बसवराज धरणे यांना औपचारिकरीत्या पदभार सोपविला. यावेळी मोठ्या प्रमाणावर फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली.

यानंतर झालेल्या सत्कार समारंभात शहरातील ज्येष्ठ नागरिक बलभिमराव मुळे, खंडेशा कोरे, सेवानिवृत्त सहाय्यक परिवहन अधिकारी नंदकुमार डुकरे, आमदार राणा जगजितसिंह पाटील, भाजपचे नेते सुनील चव्हाण, युवा नेते मल्हार पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्षा अर्चनाताई पाटील, भाजप जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, नितीन काळे यांच्या हस्ते नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्यासह सर्व नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास भाजप जिल्हा सरचिटणीस साहेबराव घुगे, भाजप नेते सुशांत भुमकर, ॲड. दीपक आलुरे, दत्ता राजमाने, विलास राठोड, सिद्धेश्वर कोरे, भाजयुमो जिल्हा सरचिटणीस श्रमिक पोतदार, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर घोडके, धीमाजी घुगे, पद्माकर घोडके, दमयंती महिला शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा सुभद्रा मुळे, माजी नगरसेवक सुधीर हजारे, व्यापारी मंडळाचे सुभाष कोरे, मुकुंद नाईक यांच्यासह धाराशिव जिल्हा, तुळजापूर तालुका व नळदुर्ग शहरातील भाजप-शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते. पदग्रहण सोहळ्यानिमित्त नगरपालिका कार्यालय फुलांनी सजविण्यात आले होते. रंगीबेरंगी फुगे, प्रवेशद्वार व कार्यालय परिसरात आकर्षक रांगोळी काढण्यात आली होती, त्यामुळे संपूर्ण परिसर उत्सवमय वातावरणाने नटला होता.

### शहराचा सर्वांगीण विकास हेच ध्येय : आ. राणाजगजितसिंह पाटील...

जगजितसिंह पाटील यांनी सांगितले की, शहरवासीयांनी दाखविलेला विश्वास सार्थ ठरवण्यासाठी नगराध्यक्ष व सर्व नगरसेवकांनी एकत्रितपणे शहराच्या सर्वांगीण विकासासाठी काम करावे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या माध्यमातून विविध विकास योजनांचा लाभ नळदुर्ग शहराला मिळवून देण्यात येईल. ते पुढे म्हणाले की, निवडणुकीत दिलेली सर्व आश्वासने पूर्ण करण्यासाठी पुढील दहा दिवसांत १०० दिवसांचा विकास आराखडा निश्चित करण्यात येईल, असे सांगितले.

### सर्वांना सोबत घेऊन विकास करणार : नगराध्यक्ष बसवराज धरणे...

कार्यक्रमात बोलताना नगराध्यक्ष बसवराज धरणे म्हणाले, आमदार राणा जगजितसिंह पाटील व भाजप नेते सुनील चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व नगरसेवक व नागरिकांना सोबत घेऊन नळदुर्ग शहराच्या विकासासाठी प्रामाणिकपणे काम करू, असे ते यावेळी म्हणाले.

# अर्पण केलेल्या फुलांपासून सेंद्रिय अगरबत्तीची निर्मिती

## तुळजाभवानी मंदिर संस्थानचा उपक्रम...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२९ डिसेंबर -**
महाराष्ट्राची कुलस्वामिनी असलेल्या आई तुळजाभवानी देवीच्या चरणी भाविकांकडून अर्पण करण्यात येणाऱ्या फुलांपासून सेंद्रिय अगरबत्ती तयार करून निर्माल्याचे पावित्र्य जपणारा एक अभिनव व पर्यावरणपूरक उपक्रम श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने राबविण्यास सुरुवात करण्यात आली आहे.

दररोज महाराष्ट्रासह कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश तसेच देशभरातून हजारो भाविक देवीच्या दर्शनासाठी तुळजापूरात दाखल होतात. दर्शनावेळी भाविक मोठ्या भक्तिभावाने देवीच्या चरणी फुले अर्पण करतात. मात्र वाढत्या भाविक संख्येमुळे मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर निर्माल्य साचत असल्याचे लक्षात आल्याने, या निर्माल्याचा पवित्र व योग्य उपयोग करण्याचा निर्णय मंदिर संस्थानने घेतला आहे. या उपक्रमाअंतर्गत देवीच्या चरणी अर्पण करण्यात आलेली फुले नियमितपणे गोळा केली जातात. ही फुले सेंद्रिय पद्धतीने वाळवून त्यांची बारीक पावडर तयार करण्यात येते. त्यानंतर या पावडरमध्ये सेंद्रिय घटक व आवश्यक नैसर्गिक तेल मिसळून पूर्णतः रसायनविरहित अगरबत्ती तयार केली जाते.

घटस्थापना करून श्री तुळजाभवानी देवींच्या शाकंभरी नवरात्रोत्सवास प्रारंभ झाला आहे. या शुभप्रसंगी मंदिर संस्थानच्या वतीने तयार करण्यात आलेली सेंद्रिय अगरबत्ती भाविकांसाठी विक्रीस उपलब्ध करून देण्यात आली आहे. भाविकांना आजपासून मंदिर परिसरातील लाडू विक्री केंद्रावरून ही अगरबत्ती खरेदी करता येणार आहे. अगरबत्तीबरोबरच धूप, उद तसेच हवन कपदेखील विक्रीस उपलब्ध करून देण्यात आले असून ही सर्व उत्पादने पूर्णतः सेंद्रिय व रसायनमुक्त असल्याने आरोग्य व पर्यावरणाच्या दृष्टीने सुरक्षित आहेत. या उपक्रमाच्या शुभारंभप्रसंगी तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने, लेखाधिकारी संतोष भेंकी, महंत तुकोजी बुवा, महंत वाकोजी बुवा, महंत हमरोजी बुवा, पुजारी मंडळाचे अध्यक्ष विपिन शिंदे, अमरराजे कदम, अनंत कोंडो, सहायक धार्मिक व्यवस्थापक अनुप ढमाले, रामेश्वर वाले, स्वच्छता निरीक्षक सुरज घुले, अक्षय साळुंके, नितीन भोयर आदी मान्यवर उपस्थित होते. हा उपक्रम श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी धाराशिव किर्ती किरण पुजार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच फुलकारीचे विवेक कानडे यांच्या सहकार्यातून राबविण्यात येत आहे. मंदिर संस्थानच्या स्वच्छता विभागामार्फत हा उपक्रम राबवला जात असून स्वच्छता निरीक्षक सुरज घुले हे या उपक्रमाचे समन्वयक म्हणून काम पाहत आहेत.

या उपक्रमामुळे निर्माल्य व्यवस्थापन, स्वच्छता, पर्यावरण संरक्षण आणि धार्मिक पावित्र्य यांचा सुंदर संगम साधला गेला असल्याचे मत भाविकांकडून व्यक्त होत आहे.

## अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ डिसेंबर -**
धाराशिव शहर पोलीस ठाण्यात एका गावातील १६ वर्षे ९ महिने वयाच्या अल्पवयीन मुलीच्या (नाव गावगोपनीय) बाबत गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि.२१ जानेवारी ते २३ डिसेंबर या कालावधीत त्याच गावातील एका तरुणाने सदर अल्पवयीन मुलीशी प्रेमसंबंध निर्माण केले. त्यानंतर तिचे बनावट आधारकार्ड तयार करून ती १९ वर्षांची असल्याचे भासवले. तसेच मुलगी व तिच्या आईला फसवून व दबावाखाली टाकून बालविवाह लावण्यात आला. या बालविवाहानंतर संबंधित तरुणाने अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी पीडितेच्या आईने दि.२८ डिसेंबर रोजी दिलेल्या प्रथम खबर अहवालावरून आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदर प्रकरणाचा पुढील तपास धाराशिव शहर पोलीस ठाण्याच्या वतीने सुरू असून, कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

## पहिल्याच वर्षी १४ विद्यार्थ्यांचे होमीभाभा बाल वैज्ञानिक परीक्षेत यश



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.२९ डिसेंबर -**
बॉम्बे सायन्स टीचर्स असोसिएशनतर्फे घेण्यात येणाऱ्या होमीभाभा बाल वैज्ञानिक संशोधक परीक्षेत श्री श्री गुरुकुल, अणदूर येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या परीक्षेसाठी शाळेच्या ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. ही परीक्षा दि.८ नोव्हेंबर रोजी नवोदय विद्यालय, तुळजापूर येथे पार पडली.

विशेष म्हणजे, परीक्षेला बसण्याचे हे शाळेचे पहिलेच वर्ष असून, पहिल्याच प्रयत्नात १४ विद्यार्थ्यांनी यश मिळवत पुढील फेरीसाठी पात्रता मिळवली आहे. या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने संस्थापक अध्यक्ष डॉ. जितेंद्र कानडे, संचालिका डॉ. रुपाली कानडे, मुख्याध्यापक शिवराज भुजबळ व मुख्याध्यापक लक्ष्मण नरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना डॉ. जितेंद्र कानडे यांनी विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून नावीन्यपूर्ण संशोधन करावे, यासाठी शाळा प्रशासन नेहमीच पाठबळ देईल, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामेश्वर सावंत यांनी केले, तर आभार प्रदर्शन बंडगर यांनी केले. या विद्यार्थ्यांना अनुजा कुलकर्णी, पृथ्वीराज कुलकर्णी व सम्यका मुके यांचे मार्गदर्शन लाभले.

### यशस्वी विद्यार्थी

**इयत्ता सहावी :** स्वामी कीर्ती नितीन, आलुरे वैभवी अच्युत, बनसोडे दिव्या दादाराव, कोरे सौरभी सचिन, अरबळे मनीषा महादेव, देशपांडे शुभ्रा गोपालकृष्ण, माने रुद्रप्रताप रविराज, डुकरे श्रीमंत स्वप्निल. **इयत्ता नववी :** मिटकर सई प्रशांत, कानडे अर्णव जितेंद्र, जाधव मयूर प्रकाश, मुळे श्रेयश शाहुराज, भोसले अभिषेक विजय, मोरे अभय भरत.

## 'अन्न हे परब्रह्म, त्याचा आदर करा'

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२९ डिसेंबर -**
इनरव्हील क्लब कळंबने नवीन वर्ष २०२६ साठी अन्न हे परब्रह्म, त्याचा आदर करा असा सामाजिक संदेश देणारा संकल्प घेतला. या संकल्पानुसार, जेवढ बसतं पोटात तेवढंच अन्न घ्या, तसेच अन्नाची नासाडी टाळावी. तसेच, तुम्ही जे अन्न टाकून देता, तेच अन्न खायला मिळावे यासाठी अनेक लोक प्रार्थना करत असतात, असे संदेश या प्रकल्पातून दिले गेले.

हा माहिती फलक जय भवानी फंक्शन हॉलच्या संचालिका मनिषा परमेश्वर मोरे, तसेच साई मंगल कार्यालय आणि तारा हॉटेल येथे लावण्यात आला.

हा प्रकल्प यशस्वी करण्यासाठी इनरव्हील क्लब कळंबच्या अध्यक्ष प्रतिभा भवर, डॉ. दिपाली लोंढे, रिजश्री देशमुख, पूर्वा पोरे, डॉ. वर्षा जाधव व उज्वला लोमटे यांनी सहकार्य केले.

## सन २०२६ वर्षातील स्थानिक सुट्ट्या जाहीर

**धाराशिव, दि.२९ डिसेंबर -**
जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी त्यांच्या अधिकार क्षेत्रातील सन २०२६ या वर्षातील स्थानिक सुट्ट्या जाहीर केल्या आहे.

यामध्ये ७ जानेवारी २०२६ (बुधवार) हजरत ख्वाजा शमशोद्दीन गाजी दर्ग्याचा उर्स, १८ सप्टेंबर २०२६ (शुक्रवार) ज्येष्ठा गौरी पूजन आणि ९ नोव्हेंबर २०२६ (सोमवार) अभ्यंगस्नान या तीन स्थानिक सुट्ट्यांचा समावेश आहे. जिल्ह्यातील सर्व राज्य शासकीय कार्यालये, जिल्हा परिषद अंतर्गत येणारी कार्यालये, नगरपालिका स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्यालये, कोषागार कार्यालय व इतर शैक्षणिक संस्थांना या सुट्ट्या लागू राहतील.

# तुळजापूर न.प.त नवनिर्वाचित नगराध्यक्ष विनोद गंगणे यांचा पदग्रहण सोहळा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२९ डिसेंबर -**
नगर परिषदेच्या माध्यमातून तुळजाई नगरीच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहून नागरिकांच्या पायाभूत सुविधा, विकासकामे, स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य व शिक्षण या क्षेत्रांमध्ये प्रभावी व लोकाभिमुख कार्य घडवून आणावे, असे आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी लोकनियुक्त नगराध्यक्ष विनोद गंगणे यांच्या पदग्रहण सोहळ्यानिमित्त आयोजित समारंभात सांगितले.

नगरपरिषदेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष विनोद गंगणे यांचा पदग्रहण समारंभ ३० डिसेंबर रोजी उत्साहात पार पडला. यावेळी महंत तुकोजी बाबा, महंत वाकोजी बुवा, आमदार राणाजगजितसिंह पाटील, अर्चना पाटील, मल्हार पाटील, तसेच नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे यांची प्रमुख उपस्थिती होती. सोहळ्याची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून, आई तुळजाभवानी मातेच्या प्रतिमेस पूजन करून करण्यात आली.

याप्रसंगी भाजपचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, सुनील चव्हाण, नितीन काळे, सचिन रोचकरी, सज्जनराव साळुंके, विशाल रोचकरी, आनंद कंदले, नरेश अमृतराव, अमर हंगरगेकर, शांताराम पेंदे, माऊली भोसले, रामचंद्र रोचकरी, लखन पेंदे, मनोज गवळी, पंडितराव जगदाळे, विजय कंदले, औदुंबर कदम, निलेश रोचकरी, संतोष परमेश्वर, नारायण नन्नवरे, विजय गंगणे, सुनील रोचकरी, इंद्रजीत साळुंके, किशोर गंगणे, बाळासाहेब भोसले, सचिन देशमुख, विशाल छत्रे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते व शहरवासी उपस्थित होते.

# शाकंभरी नवरात्रोत्सवात अतिक्रमणावर पोलीस प्रशासनाची धडक कारवाई

## महाद्वार परिसरातील ३४ व्यापाऱ्यांना नोटीस




**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२९ डिसेंबर -**
नाताळ सुट्ट्या आणि शाकंभरी नवरात्र महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी तुळजापूर शहरात भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत आहे. भाविकांच्या सोयीसाठी मंदिर प्रशासनाने बिडकर तलाव मार्गे दर्शनाची व्यवस्था केली आहे. मात्र, या गर्दीचा गैरफायदा घेत शहरातील काही व्यापाऱ्यांनी मुख्य रस्ते व फुटपाथवर अतिक्रमण केल्याचे निदर्शनास आले.

दीपक चौक ते मंदिर महाद्वार या मार्गावर अनेक दुकानदारांनी आपले साहित्य सार्वजनिक रस्त्यावर व फुटपाथवर ठेवून रहदारीस अडथळा निर्माण केला होता. त्यामुळे भाविकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाने अतिक्रमणधारक व्यापाऱ्यांवर धडक कारवाई करत एकूण ३४ व्यापाऱ्यांना नोटीस बजावल्या आहेत.

शाकंभरी नवरात्र महोत्सव सुरू असल्याने शहरात वाहन व पायी ये-जा मोठ्या प्रमाणावर वाढली आहे.

अशा परिस्थितीत सार्वजनिक रस्ते व फुटपाथ मोकळे ठेवणे आवश्यक असून, अतिक्रमणामुळे अपघाताची तसेच चेंगराचेंगरीची शक्यता नाकारता येत नाही.

या प्रकरण प्रथमवर्ग न्यायालय, तुळजापूर येथे बी.पी. ॲक्ट कलम १०२ अन्वये खटला दाखल करण्यात येणार असून, संबंधित व्यापाऱ्यांना दि.२ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता पोलीस ठाणे तुळजापूर येथे हजर राहण्याचे आदेश नोटीसद्वारे देण्यात आले आहेत.

### मंदिर परिसरातील कायमस्वरूपी अतिक्रमणाकडे दुर्लक्ष का?

मंदिर महाद्वारासमोर व मंदिर परिसरात अनेक व्यापाऱ्यांनी कायम स्वरूपी दुकाने थाटली आहेत. गर्दीच्या काळात भाविकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी मंदिर प्रशासन बिडकर तलाव मार्गे दर्शनाची व्यवस्था करते. मात्र, मंदिर महाद्वार परिसरात फेरीवाले, दोऱ्या-वाले, काठी-वाले तसेच बांगड्यावाल्या महिला मोठ्या प्रमाणावर गर्दी करताना दिसतात. या प्रकाराकडे मंदिर प्रशासन, नगरपरिषद व पोलीस प्रशासनाचे वारंवार दुर्लक्ष होत असल्याची भावना भाविकांतून व्यक्त केली जात आहे. भाविकांच्या सुरक्षिततेसह छोट्या व्यापाऱ्यांमध्येही शिस्त निर्माण करण्यासाठी प्रशासनाने सर्वांवर समान नियम लागू करणे गरजेचे असल्याची मागणी होत आहे.

CMYK

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.








# तुळजापूर तीर्थक्षेत्र विकास : काळाची गरज...

## सद्यस्थितीतील मंदिर व्यवस्थापनावरच प्रश्नचिन्ह...



राज्य सरकारकडून तुळजापूर तीर्थक्षेत्राला 'जागतिक दर्जाचे तीर्थक्षेत्र' बनवण्याची घोषणा वारंवार केली जात आहे. मात्र प्रत्यक्षात मंदिरातील दर्शन व्यवस्था, गर्दी नियंत्रण आणि प्रशासकीय नियोजन पाहता या दाव्यावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. सध्याची व्यवस्थापन व्यवस्था पाहता जागतिक दर्जा तर दूरच, मूलभूत सोयी-सुविधाही अपुऱ्या असल्याची भावना भाविकांतून व्यक्त होत आहे. तुळजापूर मंदिरात दररोज तसेच सण-उत्सव काळात मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होते. हे वास्तव सर्वश्रुत असतानाही प्रशासनाकडून कोणतेही शाश्वत व दीर्घकालीन नियोजन दिसून येत नाही. वाढती गर्दी हे कारण पुढे करत दर्शन बंदचा पर्याय मांडला जात असून, हा निर्णय म्हणजे प्रशासनाच्या अपयशाची कबुली असल्याचे बोलले जात आहे. मंदिराच्या दैनंदिन व्यवस्थापनाची जबाबदारी असलेले व्यवस्थापक तहसीलदारच गर्दी नियंत्रण व दर्शन नियोजनात हतबल ठरत असल्याचे स्पष्ट होत आहे. अपुरी बॅरिकेडिंग, स्वतंत्र रांगेचा अभाव, वेळनिश्चित दर्शन व्यवस्थेचा अभाव आणि अपुरे मनुष्यबळ यामुळे मंदिर परिसरात वारंवार गोंधळाची परिस्थिती निर्माण होत आहे.

## नुतन नगराध्यक्षांसमोर मोठे आव्हान !...



तुळजापूर शहराचा कारभार नुकत्याच निवडून आलेल्या नुतन नगराध्यक्षांकडे आला असला, तरी त्यांच्या समोर आव्हानांचा डोंगर उभा असल्याचे चित्र आहे. महाराष्ट्रासह देशभरातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या तुळजापूरमध्ये वाढती भाविकसंख्या, वाहतूक कोंडी आणि अपुऱ्या नागरी सुविधांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. श्री तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी दररोज हजारो भाविक तुळजापूरात दाखल होत असून सण-उत्सव, नवरात्र, पौर्णिमा व सुटीच्या दिवशी ही संख्या लाखोंच्या घरात जाते. मात्र या गर्दीच्या तुलनेत शहरातील रस्ते, पार्किंग व्यवस्था, स्वच्छता, पाणीपुरवठा आणि वाहतूक नियोजन अपुरे ठरत आहे. विशेषतः वाहतूक कोंडी ही तुळजापूरची कायमची डोकेदुखी ठरली असून शहर अनेक वेळा पूर्णतः ब्लॉक होत आहे. याचा फटका भाविकांसह स्थानिक नागरिक, व्यापारी आणि अत्यावश्यक सेवांना बसत आहे. तुळजापूर तीर्थक्षेत्र जागतिक दर्जाचे करण्याच्या अपेक्षा वाढत असताना नगरपालिकेच्या जबाबदाऱ्याही वाढल्या आहेत. पारदर्शक दर्शन व्यवस्था, डिजिटल टोकन प्रणाली, नियोजनबद्ध वाहतूक आराखडा, स्वच्छता, सांडपाणी व्यवस्था आणि आपत्कालीन व्यवस्थापन यांसारख्या मुद्द्यांवर ठोस निर्णय घेणे नुतन नगराध्यक्षांसमोर मोठे आव्हान ठरणार आहे. या आव्हानांना सामोरे जात विकासाभिमुख निर्णय घेतले जातात की नाही, याकडे भाविकांसह संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## व्हिजन आमदार राणा दादांचे...



स्वप्न पाहणे जितके महत्त्वाचे असते, तितकेच त्या स्वप्नांचा पाठलाग करणे कठीण असते. तहान-भूक विसरून, सातत्याने प्रयत्न केल्याशिवाय मोठे स्वप्न प्रत्यक्षात उतरू शकत नाही. तुळजापूरचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी श्री तुळजाभवानी मातेच्या तीर्थक्षेत्राच्या सर्वांगीण विकासाचे असेच एक भव्य स्वप्न पाहिले आहे. आमदार राणा दादांच्या स्वप्नवत व्हिजनला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भक्कम बळ देत तुळजापूर तीर्थक्षेत्र विकासासाठी तब्बल १८६६ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या निर्णयामुळे तुळजापूरच्या विकासाला नवे वळण मिळणार असून जागतिक दर्जाचे तीर्थक्षेत्र उभारण्याच्या दिशेने मोठे पाऊल टाकले गेले आहे. राज्याच्या विकास धोरणांची दिशा ठरवणाऱ्या महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्र) या महत्त्वाच्या संस्थेचे उपाध्यक्ष असलेल्या आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी तुळजापूरच्या धार्मिक, सांस्कृतिक आणि पर्यटन विकासासाठी सातत्याने पाठपुरावा केला. भाविकांच्या सोयीसुविधा, दर्शन व्यवस्था, वाहतूक, पायाभूत सुविधा आणि शहर विकास यांचा समन्वय साधत तुळजापूरला जागतिक नकाशावर नेण्याचा त्यांचा संकल्प आहे. या निधीतून तुळजापूर तीर्थक्षेत्राचा सर्वांगीण कायापालट होणार असून लाखो भाविकांना याचा लाभ होणार आहे. आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचे हे विकासाचे व्हिजन प्रत्यक्षात उतरत असताना तुळजापूरच्या विकासाच्या नव्या पर्वाची सुरुवात लवकरच होईल असे बोलले जात आहे.






अनिल आगलावे
मो. ९७६७०९९७११

तुळजापूर हे महाराष्ट्रासह देशभरातील लाखो देवीभक्तांचे श्रद्धास्थान आहे. श्री तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी दररोज हजारो भाविक तुळजापूरात दाखल होत असून सण-उत्सव, नवरात्र, पौर्णिमा व सुटीच्या दिवशी ही संख्या लाखोंच्या घरात जाते. मात्र वाढती गर्दी आणि अपुऱ्या सुविधा यामुळे भाविकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने तुळजापूर तीर्थक्षेत्राचा सर्वांगीण विकास करणे ही आता काळाची गरज बनली आहे, अशी जोरदार मागणी नागरिक व भाविकांकडून होत आहे.

तुळजापूर मंदिरासाठी चर्चेत असलेली मंदिर विकास कॅरिडोअर संकल्पना प्रत्यक्षात उतरवण्याची मागणी पुन्हा जोर धरू लागली आहे. या कॅरिडोअरमुळे दर्शन रांगांचे योग्य नियोजन, भाविकांसाठी स्वतंत्र मार्ग, आपत्कालीन सेवा, स्वच्छ व मोकळा परिसर उपलब्ध होऊ शकतो. काशी, उज्जैन, अयोध्या याठिकाणी राबवलेल्या विकास प्रकल्पांच्या धर्तीवर तुळजापूरातही नियोजित विकास होणे गरजेचे असल्याचे मत नागरिक व्यक्त करत आहेत. तुळजापूर हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे, तर देशभरातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. श्री तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी वर्षभर मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होत असते. मात्र जागतिक दर्जाचे तीर्थक्षेत्र म्हणून तुळजापूरचा विचार करता सध्याची पायाभूत सुविधा आणि व्यवस्थापन अपुरे ठरत असल्याचे वास्तव समोर येत आहे.

शहरातील अंतर्गत रस्ते अरुंद व जीर्ण अवस्थेत असल्याने दर्शनासाठी आलेल्या वाहनांमुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होते. याचा त्रास भाविकांसह स्थानिक नागरिकांनाही सहन करावा लागत आहे. त्यामुळे शहरातील प्रमुख व अंतर्गत रस्त्यांचा विस्तार, मजबुतीकरण व नियोजनबद्ध सुधारणा करणे अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे. तुळजापूरचा विकास केवळ धार्मिकच नव्हे तर सामाजिक, आर्थिक व पर्यटनाच्या दृष्टीनेही महत्त्वाचा आहे. शासन, मंदिर प्रशासन व स्थानिक प्रशासनाने एकत्रितपणे पुढाकार घेऊन तुळजापूर तीर्थक्षेत्राचा नियोजनबद्ध विकास आराखडा तातडीने राबवावा, अशी अपेक्षा भाविक, नागरिक आणि विविध संघटनांकडून व्यक्त होत आहे. सध्या मंदिर परिसरात दर्शनासाठी लागणाऱ्या लांबच लांब रांगा, अपुरी विश्रांती व्यवस्था, स्वच्छतेचा अभाव, वाहतूक कोंडी आणि पार्किंगची समस्या वारंवार समोर येत आहे. विशेषतः गर्दीच्या काळात भाविकांचे योग्य नियोजन नसल्याने प्रशासनातर्फे मंदिर दर्शन बंद केल्याची घटना समोर येत आहेत. त्यामुळे दैनंदिन देवीभक्तांची वाढती गर्दी लक्षात घेऊन आधुनिक व शास्त्रीय भाविक व्यवस्थापन प्रणाली राबवणे आवश्यक असल्याचे मत जाणकार व्यक्त करत आहेत. तुळजापूरचा विकास झाल्यास भाविकांना सुलभ दर्शन, सुरक्षित वातावरण आणि उत्तम सुविधा मिळतील, तसेच तुळजापूरची ओळख एक आदर्श व आधुनिक तीर्थक्षेत्र म्हणून अधिक बळकट होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

जागतिक स्तरावरील तीर्थक्षेत्रांमध्ये भाविकांना सुरक्षित, सुलभ आणि नियोजनबद्ध सुविधा दिल्या जातात. त्या धर्तीवर तुळजापूरमध्येही पुढील बाबी तातडीने राबविणे अपेक्षित असल्याचे भाविक व तज्ज्ञांकडून सांगण्यात येत आहे. भाविकांसाठी पारदर्शक आणि नियोजनबद्ध दर्शन व्यवस्था अत्यंत महत्त्वाची आहे. दर्शनासाठी लागणारा वेळ, रांगांचे नियोजन आणि माहिती स्पष्ट असणे गरजेचे आहे. यासोबतच डिजिटल टोकन आणि वेळनिश्चित दर्शन प्रणाली लागू केल्यास भाविकांची अनावश्यक गर्दी कमी होऊन त्यांचा वेळ व त्रास वाचू शकतो.

गर्दी नियंत्रणासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, सीसीटीव्ही, लाईव्ह मॉनिटरिंग, मोबाईल ॲपद्वारे सूचना व मार्गदर्शन व्यवस्था उभारणे आवश्यक मानले जात आहे. तसेच भाविकांना योग्य मार्गदर्शन मिळावे यासाठी प्रशिक्षित कर्मचारी आणि स्वयंसेवकांची संख्या वाढवणे ही काळाची गरज आहे. भाविकसंख्या, पर्यटनाचा वाढता ओघ आणि तुळजापूरचे धार्मिक महत्त्व लक्षात घेता दीर्घकालीन नियोजन, आधुनिक सुविधा आणि प्रशासनाच्या ठोस निर्णयांमुळेच तुळजापूर हे खऱ्या अर्थाने जागतिक दर्जाचे तीर्थक्षेत्र ठरू शकते, अशी अपेक्षा भाविकांकडून व्यक्त होत आहे.

तुळजापूरात येणाऱ्या भाविकांच्या वाहनांसाठी सुसज्ज व नियोजित कार पार्किंग सुविधा उपलब्ध नसणे ही मोठी समस्या आहे. रस्त्याच्या कडेला अस्ताव्यस्त पार्किंग होत असल्याने अपघातांचा धोका वाढतो. शहराबाहेर मोठ्या क्षमतेची पार्किंग व्यवस्था, शटल सेवा व दिशादर्शक फलक उभारण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

## भाविकांच्या संख्येत लक्षणीय वाढ; व्यवस्थापनाचा प्रश्न ऐरणीवर...



तुळजापूर नगरीत दररोज दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षणीय वाढत असून, श्री तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी महाराष्ट्रासह देशभरातून भक्त मोठ्या श्रद्धेने दाखल होत आहेत. पूर्वी केवळ सण-उत्सवांच्या काळात होणारी गर्दी आता दैनंदिन स्वरूपात दिसून येत असल्याने भाविक व्यवस्थापनाचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. सकाळपासून रात्री उशिरापर्यंत मंदिर परिसर, मुख्य रस्ते व अंतर्गत गल्लीबोळांमध्ये मोठी वर्दळ पाहायला मिळत आहे. यामुळे दर्शन रांगा, वाहतूक कोंडी, पार्किंगची अडचण, तसेच स्वच्छतेसंबंधी समस्या निर्माण होत आहेत. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला व लहान मुलांसाठी ही परिस्थिती अधिक त्रासदायक ठरत आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, तुळजापूरात येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षात घेता सध्याच्या सुविधा अपुऱ्या पडत आहेत. त्यामुळे दैनंदिन भाविकांची वाढ गृहीत धरून दीर्घकालीन विकास आराखडा तयार करणे आवश्यक आहे. दर्शन व्यवस्था, सुरक्षा यंत्रणा, आपत्कालीन सुविधा आणि स्वच्छता व्यवस्थेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची गरज व्यक्त होत आहे. दरम्यान, मंदिर विकास कॅरिडोअर, शहरातील रस्ते विस्तार, तसेच सुसज्ज कार पार्किंग सुविधा या मागण्या पुन्हा ऐरणीवर आल्या आहेत. भाविकांची वाढती संख्या ही तुळजापूरसाठी अभिमानाची बाब असली, तरी योग्य नियोजनाअभावी तीच गर्दी अडचणीचे कारण ठरत असल्याचे चित्र आहे. योग्य नियोजन, प्रशासनाची तत्परता आणि सर्वसमावेशक विकास यामुळे तुळजापूर नगरी भविष्यात एक आदर्श तीर्थक्षेत्र ठरू शकते, असा विश्वास भाविक व नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे.

## सुलभ दर्शनाची भाविकांची मागणी...



श्री तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी तुळजापूरात दररोज मोठ्या संख्येने भाविक दाखल होत आहेत. वाढत्या गर्दीमुळे अनेकदा भाविकांना दर्शनासाठी तासन्तास रांगेत उभे राहावे लागत असून, त्यामुळे सुलभ व सुव्यवस्थित दर्शन व्यवस्था लागू करावी, अशी जोरदार मागणी भाविकांकडून केली जात आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुले व अपंग भाविकांना दर्शनासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. गर्दीच्या काळात मंदिर परिसरात होणारी धावपळ, अपुरी बैठक व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची कमतरता आणि उन्हापावसापासून संरक्षणाचा अभाव यामुळे भाविकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. भाविकांच्या मते, दर्शन रांगांचे योग्य नियोजन, वेळेनुसार टोकन प्रणाली, स्वतंत्र मार्ग, तसेच ऑनलाइन दर्शन वेळ नोंदणीसारख्या आधुनिक सुविधांची अंमलबजावणी केल्यास ही समस्या मोठ्या प्रमाणात सुटू शकते. मंदिर प्रशासनाने भाविक-केंद्रित दृष्टीकोन ठेवून दर्शन व्यवस्था अधिक सुलभ करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. तसेच प्रस्तावित मंदिर विकास कॅरिडोअर प्रत्यक्षात आल्यास दर्शन प्रक्रिया अधिक वेगवान व सुरक्षित होईल, असे मत जाणकार व्यक्त करत आहेत. कॅरिडोअरमुळे गर्दीचे विभाजन होऊन भाविकांना शांत व शिस्तबद्ध वातावरणात दर्शन घेता येईल. एकूणच तुळजापूरातील वाढती भाविकसंख्या ही श्रद्धेचे प्रतीक असली, तरी त्यास अनुरूप सुविधा उपलब्ध न झाल्यास भाविकांचा अनुभव बाधित होत आहे. त्यामुळे सुलभ, सुरक्षित आणि वेळबद्ध दर्शन व्यवस्था तातडीने राबवावी, अशी ठाम मागणी भाविकांकडून केली जात आहे.

## वाहतूक व्यवस्था नियोजनाची गरज...



तुळजापूर तीर्थक्षेत्रात दररोज वाढत असलेल्या भाविकांच्या संख्येमुळे शहरातील वाहतूक व्यवस्था मोठ्या ताणाखाली आली आहे. श्री तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून, यामुळे शहराच्या मुख्य रस्त्यांसह अंतर्गत मार्गांवर वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. त्यामुळे तुळजापूर क्षेत्री नियोजनबद्ध व दीर्घकालीन वाहतूक व्यवस्था राबवणे अत्यावश्यक बनले आहे. विशेषतः सकाळ व सायंकाळच्या वेळेत मंदिर परिसर, बसस्थानक, प्रमुख चौक व प्रवेश मार्गांवर मोठ्या प्रमाणात वाहने अडकून पडत आहेत. अरुंद रस्ते, अपुरी पार्किंग व्यवस्था आणि एकमार्गी वाहतुकीचा अभाव यामुळे वाहनचालक, भाविक व स्थानिक नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. आपत्कालीन सेवांच्या वाहनांना मार्ग मोकळा करून देणेही अनेकदा कठीण होत असल्याचे चित्र आहे. स्थानिक नागरिक व व्यापाऱ्यांच्या मते, सध्याची वाहतूक व्यवस्था ही तात्पुरत्या उपायांवर आधारित असून वाढती भाविकसंख्या लक्षात घेता ती अपुरी ठरत आहे. त्यामुळे भाविक व स्थानिक नागरिक दोघांनाही सोयीची अशी स्वतंत्र वाहतूक नियोजन प्रणाली तयार करणे आवश्यक आहे. यात प्रवेश व निर्गमनासाठी स्वतंत्र मार्ग, एकमार्गी वाहतूक, वेळेनुसार वाहतूक नियंत्रण आणि स्पष्ट दिशादर्शक फलक यांचा समावेश करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त होत आहे. यासोबतच शहराबाहेर मोठ्या क्षमतेची पार्किंग व्यवस्था उभारून तेथून मंदिर परिसरापर्यंत शटल सेवा सुरू केल्यास वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. सण-उत्सवांच्या काळात विशेष वाहतूक आराखडा राबवणे, तसेच पोलीस व प्रशासनाचा समन्वय वाढवणेही तितकेच महत्त्वाचे मानले जात आहे. एकूणच तुळजापूर क्षेत्रातील वाहतूक समस्या ही केवळ असुविधेची नसून सुरक्षिततेशी संबंधित गंभीर बाब आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने लक्ष घालून सर्व संबंधित घटकांच्या सहभागातून वाहतूक व्यवस्थेचा शास्त्रीय आराखडा तयार करावा, अशी मागणी नागरिक, भाविक आणि विविध संघटनांकडून होत आहे.

## दर्शनानंतर पर्यटकांसाठी इतर पर्यटन केंद्रे विकसित व्हावीत



श्री तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी तुळजापूरात येणाऱ्या भाविक व पर्यटकांची संख्या सातत्याने वाढत आहे. मात्र दर्शनानंतर शहरात पर्यटकांसाठी पाहण्यासारखी, वेळ घालवण्यासारखी किंवा कुटुंबासह भेट देण्यासारखी पुरेशी पर्यटनस्थळे उपलब्ध नसल्याने बहुतांश भाविक लगेचच परतीचा प्रवास करतात. त्यामुळे दर्शनानंतर पर्यटकांना थांबवून ठेवण्यासाठी इतर पर्यटन केंद्रे विकसित करावीत, अशी मागणी भाविक, नागरिक व व्यापाऱ्यांकडून केली जात आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, तुळजापूरचा धार्मिक वारसा समृद्ध असला तरी त्याला पूरक अशी सांस्कृतिक, ऐतिहासिक व निसर्ग पर्यटनाची साधने विकसित करण्याची आवश्यकता आहे. देवीच्या मंदिराव्यतिरिक्त परिसरातील ऐतिहासिक स्थळे, प्राचीन मंदिरे, घाट, उद्याने, तसेच माहिती केंद्रे विकसित केल्यास पर्यटकांचा मुक्काम वाढू शकतो. तसेच कुटुंबांसाठी उद्याने, धार्मिक-सांस्कृतिक संग्रहालय, भक्त निवास परिसरात विश्रांती व मनोरंजनाच्या सुविधा, स्थानिक हस्तकला व प्रसाद विक्री केंद्रे उभारण्याची मागणी होत आहे. यामुळे भाविकांना दर्शनानंतर निवांत वेळ घालवता येईल आणि तुळजापूरची ओळख केवळ दर्शनापुरती न राहता एक सर्वसमावेशक पर्यटन केंद्र म्हणून निर्माण होईल. पर्यटन तज्ज्ञांच्या मते, दर्शनासोबत पर्यटनाची सांगड घातल्यास स्थानिक रोजगारनिर्मितीला चालना मिळेल. हॉटेल, वाहतूक, मार्गदर्शक सेवा, दुकाने व स्थानिक उद्योगांना याचा मोठा फायदा होऊ शकतो. एकूणच तुळजापूरचा विकास हा केवळ मंदिरापुरता मर्यादित न ठेवता दर्शनानंतरच्या पर्यटनाच्या दृष्टीने नियोजनबद्ध विकास करणे गरजेचे असल्याचे मत सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे. यासाठी शासन, पर्यटन विभाग व स्थानिक प्रशासनाने संयुक्तपणे पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लातूर-कल्याण दृतगती मार्ग वाशी तालुक्यातून नेण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२९ डिसेंबर -**



परंडा विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार राहुल मोटे यांनी प्रस्तावित लातूर-कल्याण (जनकल्याण) दृतगती मार्ग वाशी तालुक्यातून नेण्याची मागणी केली आहे.

सध्या हा दृतगती मार्ग लातूर-अंबेजोगाई-केज-बीड-जामखेड-अहिल्यानगर-कल्याण या मार्गाने जाण्याचे नियोजन आहे.

मात्र, माजी आमदार राहुल मोटे यांच्या मते हा मार्ग लातूर-कळंब-पारा-ईट-खर्डा-जामखेड-अहिल्यानगर-कल्याण असा केल्यास अधिक लाभदायक ठरेल.

या संदर्भात मोटे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री व वित्तमंत्री अजित पवार, तसेच उपमुख्यमंत्री व सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथ शिंदे यांना पत्राद्वारे मागणी केली आहे.



# उमरगा न.प.चा किरण गायकवाड यांचा नगराध्यक्षपदाचा पदभार स्वीकार

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२९ डिसेंबर -**

उमरगा नगर परिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षपदी किरण गायकवाड यांनी सोमवारी अधिकृतपणे पदभार स्वीकारला. याचवेळी शिवसेना व काँग्रेस पक्षाच्या नवनिर्वाचित नगरसेवकांनीही आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारत शहराच्या सर्वांगीण विकासासाठी काम करण्याची शपथ घेतली. नगर परिषद कार्यालयात पार पडलेल्या या पदग्रहण सोहळ्यास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



या कार्यक्रमास माजी खासदार प्रा. रवींद्र गायकवाड, माजी आमदार व शिवसेना उपनेते ज्ञानराज चौगुले, शिवसेना नेते जितेंद्र शिंदे, माजी सभापती नानाराव भोसले, काँग्रेस तालुकाध्यक्ष अर्जुन बिराजदार यांच्यासह दोन्ही पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

पदभार स्वीकारल्यानंतर बोलताना नगराध्यक्ष किरण गायकवाड म्हणाले की, उमरगा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व नगरसेवकांना विश्वासात घेऊन काम केले जाईल. पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, ड्रेनेज, आरोग्य व शिक्षण या मूलभूत सुविधांना प्राधान्य दिले जाईल. रखडलेली विकासकामे मार्गी लावून उमरग्याला विकासाच्या नव्या उंचीवर नेण्याचा निर्धार आहे.

पदग्रहणानंतर कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी व जल्लोष करत आनंद व्यक्त केला.

# सव्वा सात लाखाचे सोन्याचे मंगळसूत्र तुळजाभवानी देवीला अर्पण



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२९ डिसेंबर -**

चिकमहुद (ता. सांगोला, जि. सोलापूर) येथील भाविक शहाजी रामचंद्र जाधव हे आज सकाळी सपत्नीक श्री तुळजाभवानी देवींच्या दर्शनासाठी आले होते. देवीच्या दर्शनानंतर जाधव दांपत्याने भक्तिभावाने श्री तुळजाभवानी देवीच्या चरणी ७ लाख २७ हजार रुपये किमतीचे, ५१.५४० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र अर्पण केले.

याप्रसंगी श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने जाधव दांपत्याचा यथोचित सन्मान करण्यात आला. मंदिर संस्थानतर्फे त्यांना श्री तुळजाभवानी देवींची प्रतिमा व महावस्त्र भेट देऊन गौरव करण्यात आला. यावेळी सहायक धार्मिक व्यवस्थापक अमोल भोसले, राकेश पवार तसेच श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे कर्मचारी उपस्थित होते.

# येरमाळा प्राथमिक आरोग्य केंद्राला राज्यस्तरीय पथकाचा सकारात्मक अभिप्राय



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२९ डिसेंबर -**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम (NQS) अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र येरमाळा हे अत्यंत महत्त्वाचे केंद्र मानले जाते. सन २०२४ मध्ये राष्ट्रीय स्तरावरील पथकाने येथे भेट देऊन केलेल्या मूल्यांकनात येरमाळा प्राथमिक आरोग्य केंद्राने सर्व गुणवत्ता निकष पूर्ण करून संस्था प्रमाणन प्राप्त केले होते.

या प्रमाणनानंतरही संस्थेचे कामकाज गुणवत्तापूर्ण व नियमानुसार सुरू आहे की नाही, याची पडताळणी करण्यासाठी राज्य शासनाच्या राज्यस्तरीय पथकाने सोमवार, दि. २९ डिसेंबर २०२५ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र येरमाळा येथे तपासणीसाठी भेट दिली. या पथकात डॉ. सुनंदा घोलप (छत्रपती संभाजीनगर) व डॉ. स्वप्नील गायकवाड (पुणे) यांचा समावेश होता.

राज्यस्तरीय पथकाने रुग्णालयातील ओपीडी, आयपीडी, प्रसूती कक्ष, लसीकरण विभाग, औषध साठा, स्वच्छता व्यवस्था, विविध नोंदी तसेच एकूण प्रशासकीय व्यवस्थापनाचा दिवसभर सखोल आढावा घेतला. या पाहणीदरम्यान प्राथमिक आरोग्य केंद्रात दिल्या जाणाऱ्या आरोग्य सेवा व रुग्णसेवेबाबत पथकाने समाधान व्यक्त केले. तपासणीदरम्यान आरोग्य केंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचारी अथक परिश्रम, संघभावना व समन्वयाने काम करत असल्याचे स्पष्टपणे दिसून येत असल्याचे मत पथकाने नोंदवले. या मूल्यांकनावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. जे.एन. सय्यद, प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सुधाकर बिरादार, द्वितीय वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रतीक्षा काळे, जिल्हा स्तरावरील NQS समन्वयक किशोर गवळी, प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व कर्मचारी तसेच आशा स्वयंसेविका उपस्थित होत्या.

राज्यस्तरीय पथकाकडून मिळालेल्या सकारात्मक अभिप्रायामुळे येरमाळा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवेला पुन्हा एकदा मान्यता मिळाली असून, यामुळे आरोग्य विभागात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## हिप्परगा तांडा शिवारातून जनावरांची चोरी

**धाराशिव, दि.२९ डिसेंबर -**

नळदुर्ग पोलीस ठाण्याच्या हद्दीत जनावर चोरीची घटना घडली असून, अज्ञात चोरट्यांनी शेतातून सुमारे ६३ हजार रुपये किमतीची दोन म्हैस, एक रेडकू व एक बोकड चोरून नेल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

फिर्यादी किशोर बलभीम ढाले (वय ३०, रा. हिप्परगा तांडा, ता. तुळजापूर, ) यांच्या शेतातून ही चोरी झाली. सदर घटना दि.२५ डिसेंबर रोजी रात्री हिप्परगा तांडा शिवारात घडली. या प्रकरणी फिर्यादी किशोर ढाले यांच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# वाशी पोलिसांची १२ तासांत शेतमाल चोरीचा गुन्हा उघड

### १४,६०० रुपयांचा माल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२९ डिसेंबर -**

वाशी पोलिसांनी अवघ्या १२ तासांत शेतमाल चोरीचा गुन्हा उघडकीस आणत १४ हजार ६०० रुपयांचा चोरीचा शेतमाल जप्त करून आरोपीला ताब्यात घेतले आहे.

माहितीनुसार, दि.२८ डिसेंबर रोजी वच्छला लक्ष्मण वंजारे (वय ६५, रा. हातोला-वाशी) यांच्या शेतातील माल अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्याची घटना घडली होती. या प्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुप्त माहितीच्या आधारे पोहेकॉं लाटे यांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. चोरीचा शेतमाल पारगाव येथे विक्रीसाठी नेला जात



असल्याची माहिती मिळाल्यानंतर धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर सापळा रचण्यात आला. या कारवाईत लक्ष्मण ऊर्फ राजा विभीषण खवले (वय २३, रा. हातोला-वाशी) यास ताब्यात घेण्यात आले. ही कारवाई पोलीस निरीक्षक शंकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉं लाटे, कोरडे, सय्यद यांनी संयुक्तपणे केली.

आरोपीकडून चोरीचा शेतमाल जप्त करण्यात आला असून, त्याच्याविरुद्ध पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

# प्रादेशिक पर्यटन विकासाचा गुरुवारी लोकार्पण सोहळा

### ॲड. दीपक आलूरे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.२९ डिसेंबर -**

अणदूर दि.२९ येथील बसस्थानकते खंडोबा मंदिर हा प्रादेशिक विकास अंतर्गत पूर्ण झालेल्या महत्त्वपूर्ण विकास कामाचा लोकार्पण सोहळा गुरुवार दि.१ जानेवारी रोजी मोठ्या उत्साहात करण्यात येणार असून ग्रामस्थ व कार्यकर्त्यांनी या सोहळ्यास मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन भारतीय जनता पार्टीचे उपाध्यक्ष तथा माजी सभापती ॲड. दीपक दादा आलूरे यांनी दि.२७ डिसेंबर २०२५ रोजी पत्रकार परिषदेत सांगितले.

या लोकार्पण सोहळ्याचे उद्घाटन तुळजापूर मतदार संघाचे विद्यमान आमदार राणाजगजितसिंह पाटील, माजी मंत्री बसवराज पाटील, भाजपाचे नेते तथा माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, भाजपाचे नेते सुनील चव्हाण, भाजपा धाराशिव जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या हस्ते संपन्न होत आहे.

पर्यटन विकासाच्या दृष्टीने एकूण एक कोटी ९९ लाख रुपयांचा भरघोस निधी मंजूर करण्यात आला होता.

या निधीतून १ कोटी ६६ लाख रुपयांचा अत्यंत आकर्षक रुंद दर्जेदार रस्त्यांचे काम पूर्ण करण्यात आल्याचे सांगून ३३ लाख रुपयातून अयोध्येच्या धरतीवर अत्याधुनिक पथदिव्यांचे उभारणे करण्यात आले.

या रस्त्यामुळे शहराच्या सौंदर्यात भर पडण्याचे सांगितले.

यावेळी शहराध्यक्ष दीपक घोडके, माजी सरपंच धनराज मुळे, दयानंद मुडके, प्रवीण घोडके, लक्ष्मण बोंगरगे सह मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लातूर-कल्याण जनकल्याण द्रुतगती मार्गासाठी सुधारित मार्ग करा

### खा. ओम राजेनिंबाळकर यांची महामार्ग मंत्री गडकरी यांच्याकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ डिसेंबर -**

नियोजित लातूर-कल्याण (जनकल्याण द्रुतगती मार्ग) हा महामार्ग धाराशिव जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. हा मार्ग अधिक फायदेशीर व सोयीस्कर व्हावा, यासाठी लातूर-कळंब-पारा-ईट-खर्डा-जामखेड-अहिल्यानगर-कल्याण असा सुधारित मार्ग स्वीकारण्याची ठोस मागणी खासदार ओम राजे निंबाळकर यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे.



या संदर्भात खासदारांनी सविस्तर निवेदन देत मार्गबदलामुळे होणाऱ्या ठोस फायद्यांकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधले आहे.

अंतरात ६०-७० कि.मी. ची घट: कळंब-ईट-खर्डा हा सुधारित मार्ग अवलंबल्यास सध्याच्या प्रस्तावित मार्गाच्या तुलनेत प्रवासाचे एकूण अंतर सुमारे ६० ते ७० किलोमीटरने कमी होईल. परिणामी वेळ व इंधनाची बचत होईल. आकांक्षी जिल्ह्याला चालना: धाराशिव जिल्हा 'आकांक्षी जिल्हा' योजनेत समाविष्ट आहे. मोठ्या उद्योगांचा अभाव व बेरोजगारीची समस्या लक्षात घेता, हा महामार्ग जिल्ह्यातून गेल्यास दळणवळण सुधारून उद्योगांना चालना मिळेल. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढणार आहे.

कृषी पट्ट्यातून जाणाऱ्या या मार्गामुळे कळंब व परिसरातील शेतमाल मुंबई-ठाणे-कल्याणच्या बाजारपेठांमध्ये जलद पोहोचेल, ज्यातून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ अपेक्षित आहे.

दर्जेदार दळणवळणाचे जाळे: जिल्ह्याच्या विकासासाठी उच्च दर्जाच्या रस्त्यांचे जाळे आवश्यक असून, प्रस्तावित द्रुतगती मार्गात बदल केल्यास धाराशिवचा कायापालट होऊ शकतो, असा विश्वास खासदारांनी व्यक्त केला.

जनहितार्थ 'जनकल्याण द्रुतगती मार्गा'च्या आराखड्यात तातडीने बदल करावा, अशी ठाम मागणी खासदार ओम राजे निंबाळकर यांनी केंद्र सरकारकडे लावून धरली आहे.

# ढोकी परिसरात सोलार मोटार व केबलची चोरी; १८ हजारांचा मुद्देमाल लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ डिसेंबर -**

ढोकी पोलीस ठाण्याच्या हद्दीत शेतातील सोलार उर्जेच्या साहित्याची चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. अज्ञात चोरट्याने शेतातून सुमारे १८ हजार रुपये किमतीची सोलार मोटार व २०० फूट केबल चोरून नेली आहे.



फिर्यादी प्रभाकर दत्तात्रय घोगरे (वय ८१, रा. उपळा (मा.), ता. व जि. धाराशिव) यांचे खेड शिवारातील शेत गट क्रमांक ४०८ येथे ही चोरी झाली. सदर घटना दि.२० ऑगस्ट रोजी सकाळी १० ते दि. २१ नोव्हेंबर रोजी सकाळी ९.०० वाजेच्या दरम्यान घडल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी फिर्यादी प्रभाकर घोगरे यांनी दि. २८ डिसेंबर २०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबर अहवालावरून ढोकी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

घटनेचा पुढील तपास ढोकी पोलीस ठाण्याच्या वतीने सुरू आहे.

# धाराशिवच्या निखिल हाजगुडे यांना ऑटोमोबाईल एसी प्रणालीवरील संशोधनासाठी पेटेंट

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२९ डिसेंबर -**

तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालय, धाराशिव येथे शिक्षण घेतलेले व धाराशिव जिल्ह्यातील तुगाव येथील सुपुत्र निखिल हाजगुडे यांनी ऑटोमोबाईल इंडस्ट्रीतील एअर कंडिशनिंग (HVC) प्रणालीमध्ये अभिनव संशोधन करून त्यास पेटेंट मिळविले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल आदरणीय रणजितसिंह पाटील यांनी निखिल हाजगुडे यांचे अभिनंदन करून सत्कार केला.

ऑटोमोबाईल क्षेत्रात ऊर्जा कार्यक्षमता वाढवणे, इंधन बचत साधणे आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञान विकसित करणे या दृष्टीने निखिल हाजगुडे यांचे संशोधन अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे. एअर कंडिशनरच्या कार्यक्षमतेत सुधारणा घडवून आणणाऱ्या या नव्या तंत्रज्ञानामुळे भविष्यात वाहन उद्योगाला मोठा फायदा होण्याची शक्यता तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे.



वाहनांमध्ये एसी (HVC) सुरू असताना तयार होणारे कंडेन्सेट पाणी साचणे, दुर्गंधी निर्माण होणे किंवा वाहनाच्या भागांना गंज लागणे या समस्या अनेक वाहनचालकांना भेडसावत होत्या. या समस्यांवर उपाय म्हणून निखिल हाजगुडे यांनी कंडेन्सेट पाण्याच्या योग्य व सुरक्षित निचऱ्यासाठी नवी प्रणाली व पद्धत विकसित केली असून त्यासाठी पेटेंट दाखल करण्यात आले आहे. या नव्या तंत्रज्ञानामध्ये एसीमुळे तयार होणारे पाणी आपोआप आणि सुरक्षितपणे बाहेर काढले जाते, त्यामुळे पाणी साचत नाही तसेच वाहनातील इलेक्ट्रिकल भागांना कोणताही धोका राहत नाही. ही प्रणाली मेंटेनन्स-फ्री, कमी जागेत बसणारी असून इलेक्ट्रिक वाहनांसाठी विशेष उपयुक्त ठरणार आहे. या संशोधनामुळे वाहनांची विश्वसनीयता, टिकाऊपणा आणि प्रवाशांचा आराम वाढण्यास मदत होणार असून भविष्यातील इलेक्ट्रिक व पर्यावरणपूरक वाहनांसाठी हे तंत्रज्ञान महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

सत्कारप्रसंगी आदरणीय रणजितसिंह पाटील यांनी निखिल हाजगुडे यांच्या संशोधन कौशल्याचे कौतुक करत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी संशोधन व नवकल्पनांच्या माध्यमातून देशाच्या प्रगतीत योगदान द्यावे, असे आवाहन केले. तसेच तरुण संशोधकांना आवश्यक ते मार्गदर्शन व पाठबळ देण्याची ग्वाही दिली.

यावेळी दत्ता कुलकर्णी, नितीन काळे, नेताजी पाटील, संजय लोखंडे, सुधीर सस्ते, तुगावचे सरपंच अनिल भुतेकर, काका देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते. निखिल हाजगुडे यांच्या या यशाबद्दल त्यांचे तसेच त्यांना मार्गदर्शन करणारे काका देशमुख यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## महाराष्ट्र नागरी बँकेतर्फे आज सत्यनारायण महापुजा

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २९ डिसेंबर :** महाराष्ट्रामध्ये नावलौकिक मिळवलेल्या महाराष्ट्र नागरी सहकारी बँक, शाखा विवेकानंद चौक, लातूर या शाखेच्या स्थलांतरणानिमित्त ३० डिसेंबर २०२५ मंगळवारी सकाळी १०.३० वा एमएनएस बँकेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर व बँकेच्या संचालिका तथा जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा प्रतिभाताई पाटील कव्हेकर यांच्या शुभहस्ते सत्यनारायण पुजेचे आयोजन करण्यात आलेले आहे. यावेळी या कार्यक्रमाला महाराष्ट्र नागरी सहकारी बँकेचे उपाध्यक्ष एस.आर.मोरे, संचालक बाबासाहेब कोरे, संचालक सूर्यकांतराव शेळके, सुभाषअप्पा सुलगुडले, तज्ज्ञ संचालक अजित पाटील कव्हेकर, नितीन कोरे, रावसाहेब पाटील, ॲड.गंगाधर हामणे, शिवाजीराव देशमुख, महाराष्ट्र नागरी सहकारी बँकेचे कार्यकारी संचालक नितीन सराफ, जॉईंट एमडी किशनसिंह गहेरवार, मार्केट यार्ड शाखेचे शाखा व्यवस्थापक प्रविण जाधव, अहमदपूर शाखेचे शाखा व्यवस्थापक संतोष कदम, शिरूर अनंतपाळ शाखेचे शाखा व्यवस्थापक दत्ता पाटील आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.



# उमेदवारीविषयीची उत्सुकता आता शिगेला..!

## सर्वच प्रमुख राजकीय पक्षांची सावध भूमिका । कोण करणार कोणावर कुरघोडी?

**त.भा. वृत्तसेवा/श्रीधर स्वामी**

**लातूर, २९ डिसेंबर :** लातूर शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा मंगळवार , दि. ३० डिसेंबर हा शेवटचा दिवस आहे. आतापर्यंत भाजप-काँग्रेससह कोणत्याही प्रमुख पक्षाने आपल्या अधिकृत उमेदवारांची यादी घोषित केलेली नाही. त्यामुळे इच्छुकांसह सामान्य मतदारांतही उमेदवारीविषयीची उत्सुकता आता शिगेला पोहोचल्याचे पाहावयास मिळत आहे. यावेळी सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनी अतिशय सावध भूमिका अवलंबली आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या इतिहासात प्रथमच असे होताना दिसत असून एवढी सावधगिरी बाळगून कोण-कोणावर कुरघोडी करणार? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

लातूर शहर महानगरपालिकेच्या ७० जागांसाठी दि. १५ जानेवारीला मतदान होणार आहे. २०२२ मध्येच लातूर मनपाच्या मावळत्या पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ संपुष्टात आला आहे. तेव्हापासून मनपावर प्रशासकराज चालू आहे. या प्रशासक राजचा समारोप नूतन पदाधिकाऱ्यांनी मनपाची सूत्रे हाती

### स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इतिहासात प्रथमच असे होतेय

घेतल्यानंतर होणार आहे. लातूर शहर मनपाची ही तिसरी सार्वत्रिक निवडणूक आहे. पहिल्या निवडणुकीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने तर दुसऱ्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने बाजी मारली होती. या दोन्ही निवडणुकीच्या तुलनेत होऊ घातलेली तिसरी निवडणूक अतिशय अटीतटीची आणि चुरशीची होणार आहे. म्हणूनच की काय, उमेदवारी अर्ज दाखल करायचा अखेरचा दिवस आला तरी अद्याप एकाही प्रमुख राजकीय पक्षाने आपल्या उमेदवारांची घोषणा केलेली नाही. निवडणुकीचा हंगाम आला की, कार्यकर्ते-नेते या पक्षातून त्या पक्षात, त्या पक्षातून या पक्षात येत असतात. या निवडणुकीतही तो फॉर्म्युला मोठ्या प्रमाणात अवलंबला गेला आहे. यावेळी अपेक्षेप्रमाणे भाजपाकडे इनकमिंग मोठ्या प्रमाणात झाले आहे. राज्यातही सगळीकडे भाजपमध्ये प्रवेश करणाऱ्यांची संख्याही कमालीची वाढल्याचे दिसून आले.

भाजपमध्ये अन्य पक्षातून आलेल्या मोठ्या प्रमाणावरील कार्यकर्त्यांमुळे वर्षानुवर्षे निष्ठावंत म्हणून कार्यरत असलेल्या कार्यकर्त्याला तिकीट द्यायचे की पक्षात नव्याने आलेल्यांना? असा यक्षप्रश्न नेत्यांपुढे उभा आहे. जुन्यांना डावलले तर त्याचे दुष्परिणाम पक्षाला कमी-अधिक प्रमाणात भोगावे लागू शकतात. नवख्यांना डावलले गेल्यास त्याचे परिणाम तूर्तास तरी भाजपवर होण्याची सुतराम शक्यता नाही. त्यामुळे भाजप नेते नेमके याबाबतीत कोणती भूमिका-पर्याय निवडतात, त्यावर या निवडणुकीच्या निकालाचे भवितव्य विसंबून असणार आहे. भाजपचे अनेक प्रमुख कार्यकर्ते मागच्या अनेक वर्षांपासून मनपा निवडणुकीच्या मैदानात उतरण्याची तयारी करत होते. त्यांनी आपआपल्या प्रभागात वातावरण निर्मितीही करून ठेवली आहे.

अशावेळी त्याच्या ऐवजी पक्षात नव्याने प्रवेश केलेल्या कार्यकर्त्याला उमेदवारी बहाल केली गेल्यास वेगळेच परिणाम समोर येण्याची शक्यताही नाकारता येत नाही. अगोदरच भाजपमध्ये निष्ठावंतांवर सातत्याने अन्याय होत असल्याची ओरड केली जाते. ही बाब पक्षाच्या नेत्यांनाही ज्ञात आहे. या निवडणुकीतही तीच 'री' ओढली गेली तर निष्ठावंत म्हणून आयुष्य पणाला लावून उपयोग होणार तरी काय? अशी उद्विग्न अवस्था अनेकांची होणार आहे.

लातूर भाजपमध्ये मागच्या अनेक वर्षात, म्हणजे जेव्हापासून भाजप सत्तेच्या प्रवाहात आला आहे, तेव्हापासून निष्ठावंतांवर कायम अन्याय होत आला आहे, त्यांना सातत्याने लाभाच्या पदापासून दूर ठेवण्याचे प्रयत्न झाल्याची अनेकांची तक्रार असल्याचे ऐकिवात आहे. यामध्ये वास्तवताही आहे, याची जाण अनेकांना आहे. त्यामुळे किमान या मनपा निवडणुकीत तरी पक्षाच्या नेत्यांनी निष्ठावंतांवर विश्वास दाखवून न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करावा, अशी अपेक्षा अनेक निष्ठावंत बाळगून आहेत. भाजपने अन्य पक्षातील कार्यकर्त्यांना आपल्या पक्षात प्रवेश देताना त्यांना तात्काळ उमेदवारी, लाभाची पदे देण्याऐवजी सर्वप्रथम भाजपाची ध्येयधोरणे, भूमिका पूर्णतः अवगत करण्यासाठी किमान दोन-तीन वर्षांचा अवधी द्यावा, नंतरच अशा कार्यकर्त्यांचा उमेदवारीसाठी विचार करावा, यादृष्टीनेही प्रमुख नेत्यांनी विचारविनिमय करावा, अशी माफक अपेक्षा निष्ठावंत भाजप कार्यकर्ते बाळगून असल्याचे बोलले जाते. या मुद्याकडे नेत्यांनी गांभीर्याने पाहणे गरजेचे वाटते. एक मात्र खरे आहे की, लातूर मनपाची ही निवडणूक मागच्या दोन्ही निवडणुकांच्या तुलनेने लक्षवेधी ठरणार आहे.

## 'देवघरातील देव'चे प्रकाशन



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २९ डिसेंबर :** माजी खा. डॉ. सुनील गायकवाड लिखित माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या संसदीय कारकिर्दीचा आणि संवेदनशील व्यक्तिमत्वाचा वेध घेणाऱ्या 'देवघरातील देव : शिवराज पाटील चाकूरकर' या ग्रंथाचे प्रकाशन रविवारी लातुरात करण्यात आले.

या ग्रंथाचे प्रकाशन 'देवघर' निवासस्थानी शैलेश पाटील चाकूरकर, भाजप नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी ॲड. रुद्राली पाटील चाकूरकर, ॲड. ऋषिका पाटील चाकूरकर, वैशाली कलबुर्गी यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. सुनील गायकवाड यांनी लिहिलेला हा ग्रंथ केवळ एक राजकीय चरित्र नसून चाकूरकर यांच्या जीवनातील आठवणी, नातेसंबंधातील आपुलकी आणि त्यांच्या मूल्यनिष्ठ राजकारणाचा सखोल लेखाजोखा मांडण्यात आला आहे. डॉ. अर्चनाताई यांनी यावेळी आपल्या भावना व्यक्त करताना हा ग्रंथ पुढील पिढीसाठी प्रेरणादायी दीपस्तंभ असल्याचे सांगितले. या महान नेत्याच्या स्मृतीचा सुगंध या ग्रंथाच्या वाचनाने येणार आहे. डॉ. सुनील गायकवाड यांनी अतिशय सुतबाधा या ग्रंथाचे लेखन केल्याबद्दल त्यांनी डॉ. गायकवाड यांचे अभिनंदन केले. माजी खा. डॉ. सुनील गायकवाड यांनी यावेळी लेखक या नात्याने आपले मनोगत व्यक्त करताना शिवराज पाटील चाकूरकर यांचे नेतृत्व बहुआयामी होते. त्यांच्याकडून अनेक गोष्टी शिकायला मिळाल्याचे सांगितले.

## वाहतूक शिस्त, सुरक्षिततेसाठी वाहतूक नियंत्रण शाखेचा लढा



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २९ डिसेंबर :** वाहतूक ही केवळ वाहनांची हालचाल नसून ती नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत असलेली अत्यंत संवेदनशील, शिस्तप्रिय व नियोजनबद्ध व्यवस्था आहे. वाढती लोकसंख्या, वाहनांची झपाट्याने वाढणारी संख्या, मर्यादित रस्ते, बेशिस्त वाहनचालक तसेच अवैध प्रवासी वाहतूक या सर्व बाबी लक्षात घेता शहरातील वाहतूक नियंत्रण हे मोठे आव्हान बनले आहे. या पार्श्र्वभूमीवर लातूर शहर वाहतूक नियंत्रण शाखेचा वतीने प्रभावी लढा दिला जात आहे.

वाहतूक नियमांचे उल्लंघन, अवैध प्रवासी वाहतूक, ओव्हर स्पीड, कर्णकर्कश सायलेंसर, सिग्नल तोडणे, विनापरवाना वाहने, पेंडिंग दंड वसूली याविरुद्ध केलेल्या कारवाईमुळे वाहतूक शिस्त प्रस्थापित होण्यास मोठ्या प्रमाणात मदत झाली आहे. शहर वाहतूक नियंत्रण शाखेने जानेवारी ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीत एकूण १ लाख ४ हजार ६७९ केसेस दाखल करून तब्बल १० कोटी ५७ लाख ८६ हजार २०० इतकी दंडरक्कम आकारलेली आहे. ही कारवाई केवळ दंड आकारण्यापुरती मर्यादित न राहता नागरिकांमध्ये वाहतूक नियमांविषयी शिस्त, भीती व जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची ठरलेली आहे. यामध्ये अवैध प्रवासी वाहतूक प्रकरणी १६६ केसेस,मोटार वाहन कायदा अंतर्गत ८० हजार २९६ केसेस, इंटरसेप्टर वाहनाद्वारे ओव्हर स्पीड करणाऱ्या वाहनांवर १७ हजार ३३६ केसेस करून दंड आकारण्यात आला आहे.

लातूर शहरात विनापरवाना ऑटो रिक्षा, क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी भरणे, ठराविक थांब्याबाहेरून प्रवासी घेणे यासारख्या तक्रारी लक्षात घेता शहर वाहतूक नियंत्रण शाखेने विशेष मोहीम राबविली. यामध्ये ६४ ऑटो रिक्षांवर थेट कारवाई करून एकूण २ लाख ८ हजार ७०० रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. यासोबतच ऑटो रिक्षांवरील इतर वाहतूक नियमभंगाबाबत एकूण ११ हजार २७ केसेस करून ६३ लाख २४ हजार ८०० रु. दंड वसुल करण्यात आला आहे.

## मनपा निवडणूक प्रशिक्षणाला १६४ जणांची अनुपस्थिती

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २९ डिसेंबर :** लातूर शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी रविवारी आयोजित करण्यात आलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रशासनाने उपस्थिती अनिवार्य असल्याची तंबी देऊनही तब्बल १६४ कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणास दांडी मारल्याचे निदर्शनास आले.

लातूर मनपासाठी येत्या दि. १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. त्यादृष्टीने मनपा प्रशासन कामालाही लागले आहे. रविवारी सिद्धेश्वर-रत्नेश्वर देवालयाच्या सभागृहात अधिकारी- कर्मचाऱ्यांसाठी पहिले प्रशिक्षण शिबीर पार पडले. या प्रशिक्षणाचे उदघाटन मनपाचे अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे, निवडणूक निर्णय अधिकारी सुशांत शिंदे, रोहिणी नऱ्हे मंजुषा लटपटे, संदीप कुलकर्णी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सौदागर तांदळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. दोन सत्रात पार पडलेल्या या प्रशिक्षण शिबिरात संबंधितांना मतदान प्रक्रियेतील महत्वाच्या टप्प्यांविषयी माहिती देण्यात आली. यामध्ये निवडणूक साहित्य स्वीकृती व तपासणी, मतदानाच्या आदल्या दिवशीची मतदान केंद्रावरील पूर्वतयारी, प्रत्यक्ष मतदान होण्यापूर्वीची कामे, मतदानास प्रत्यक्ष सुरुवात व मतदान केंद्राध्यक्ष व कर्मचाऱ्यांची कामे त्याचप्रमाणे मतदान केंद्राध्यक्षांनी महत्वाच्या प्रकरणी करावयाची कार्यवाही यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. तसेच एजंट तपासणी, बॅलेट युनिटची तयारी, आदर्श मतदान केंद्रांची रचना,मतदान प्रतिनिधींची नियुक्ती चाचणी मतदान, मतदान प्रक्रियेतील आवश्यक जोडपत्रे या अत्यंत महत्वाच्या विषयावर कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणासाठी एकूण २ हजार २०० कर्मचाऱ्यांना उपस्थित राहण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यापैकी २ हजार ३६ कर्मचारी उपस्थित होते. निवडणूक प्रशिक्षणास अनुपस्थित असलेल्या कर्मचाऱ्यांविरुद्ध भारतीय दंड संहिता १८८ व लोक प्रतिनिधित्व अधिनियम १९५१ चे कलम १३४ मधील तरतुदीनुसार नोटीस बजावून पुढील कारवाई करण्यात येणार आहे. दुसरे प्रशिक्षण येत्या दि. १० जानेवारी रोजी होणार आहे.

## सायलेन्सरमुळे होणाऱ्या ध्वनी प्रदूषणावर पोलिसांची कारवाई

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २९ डिसेंबर :** लातूर शहरात वाढत असलेल्या फटाका सायलेन्सर लावलेल्या बुलेट मोटारसायकलींमुळे होणारे प्रचंड ध्वनी प्रदूषण, नागरिकांची होणारी गैरसोय, रुग्ण, वृद्ध, लहान मुले व विद्यार्थ्यांवर होणारा मानसिक ताण तसेच कायदा व सुव्यवस्थेवर होणारा विपरीत परिणाम लक्षात घेऊन एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या वतीने विशेष मोहीम राबविण्यात आली. यात १२ मॉडीफाय बुलेट दुचाकींवर कारवाई करून ९९ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत रात्री उशिरापर्यंत फटाका सायलेन्सर वाजवत, रस्त्यावरून बेदरकारपणे फिरून सार्वजनिक शांतता भंग करणाऱ्या, नागरिकांना त्रास देणाऱ्या व शहरातील वातावरण दूषित करणाऱ्या बुलेट दुचाकी वाहनांविरोधात एमआयडीसी पोलिसांनी कठोर भूमिका घेतली. या मोहिमेदरम्यान एकूण १२ बुलेट मोटारसायकली ज्या बेकायदेशीररित्या मॉडीफाय करून फटाका सायलेन्सर बसवून वापरण्यात येत होत्या, त्या ताब्यात घेण्यात आल्या. सदर सर्व दुचाकी वाहने एमआयडीसी पोलीस ठाण्यात डिटेन करून त्या मोटार वाहन कायदा तसेच ध्वनी प्रदूषण प्रतिबंधक नियमांचे उल्लंघन करणारी असल्याचे स्पष्ट झाल्याने १२ वाहनांवर एकूण ९९ हजार ५००/- रुपये इतक्या रकमेची दंडात्मक कारवाई करण्यात आली. संबंधित वाहनचालकांकडून दंडाची रक्कम वसूल करून, सदर फटाका सायलेन्सर काढून घेण्यात आले असून त्यानंतर वाहने संबंधित मालकांच्या ताब्यात देण्यात आली.

ही संपूर्ण कारवाई अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, लातूर, मंगेश चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, लातूर, तसेच समीरसिंह साळवे, उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर उपविभाग यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. एमआयडीसी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक समाधान चवरे यांच्या नेतृत्वाखाली डी.बी. पथकातील सहायक फौजदार भिमराव बेल्लाळे, पोलीस अमलदार बळवंत भोसले, कैलास चौधरी, मंगेश दिवे, मयुर मुगळे, गणेश बुजारे,राजाभाऊ म्हस्के, अक्षय डिगोळे यांनी ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली.



## लातूरच्या बाई-काकाजी पॉलिमर्स प्रा. लि. ची उद्योगजगतात गरुडझेप

**जिद्द, गुणवत्ता आणि आधुनिकतेच्या जोरावर आयपीओपर्यंतचा प्रेरणादायी प्रवास**

माणसाकडे जिद्द, चिकाटी आणि भविष्याचा वेध घेणारी दृष्टी असेल, तर सामान्य माणूसही असामान्य कामगिरी करू शकतो, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. मूळचे लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यातील कोष्टगाव येथील रहिवासी स्व. पांडुरंगजी मुंदडा व स्व. फुलाबाई मुंदडा या दांपत्याने दिलेल्या संस्कारातून उभा राहिलेला उद्योगसमूह आज संपूर्ण उद्योगविश्वाचे लक्ष वेधून घेत आहे. स्व. फुलाबाई यांच्या नावावरून स्थापन झालेल्या बाई-काकाजी पॉलिमर्स प्रा. लि. या कंपनीने लातूर जिल्ह्यातील पहिली आयपीओधारक कंपनी होण्याचा मान पटकावला आहे. ही यशस्वी झेप नवोदित उद्योजकांसाठी कायमस्वरूपी प्रेरणादायी ठरत आहे.

**छोट्या व्यवसायाचे वटवृक्षात रूपांतर**

मुंदडा कुटुंबाने सुरुवातीला विविध क्षेत्रांमध्ये व्यवसाय उभारले. त्यामध्ये आनंद मिल्क एजन्सीज, मुंदडा फुड्स, येडेश्र्वरी आईस फॅक्टरी, येडेश्र्वरी पॅकेजिंग इंडस्ट्रीज, गोल्ड जिम, मुंदडा पॉलिमर्स, बाई-काकाजी इंडस्ट्रीज, बाई-काकाजी अक्वा शुअर आणि अखेरीस बाई-काकाजी पॉलिमर्स प्रा. लि. यांचा समावेश आहे. आईच्या निधनानंतर सर्व व्यवसायांना एकत्रित करत बाई-काकाजी उद्योग समूह हे नाव देण्यात आले.

**सनरीच ॲक्वाचाही होतोय झपाट्याने विस्तार**

बाई - काकाजी उद्योग समूहाच्या सनरीच मिनरल वॉटरने आपल्या उत्पादनात सुरुवातीपासूनच



एक उच्च दर्जा कायम ठेवला आहे. महाराष्ट्रासोबतच हे उत्पादन आता देशाच्या अनेक राज्यातील ग्राहकांच्या पसंतीस उतरले आहे. आरोग्यासाठी आवश्यक आणि पूरक असणारे घटक सनरीच मिनरल वॉटरमध्ये मुबलक प्रमाणात आहेत. त्यामुळे अल्पावधीतच या उत्पादनाने आपल्या व्यवसायाच्या कक्षा रुंदावण्याचे काम केले आहे. भविष्यात हे उत्पादन यापेक्षाही अधिक वेगाने ग्राहकांच्या पसंतीस उतरेल, असा विश्वास आहे. गुणवत्तेच्या बाबतीत कधीही तडजोड न करण्याच्या धोरणामुळेच सनरीच एक्काचाही झपाट्याने विस्तार होतो आहे.

**दर्जेदार उत्पादन आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान**

पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या व शीतपेयांसाठी आवश्यक असणारे सर्व आकारांचे झएढ प्री-फॉर्म व कॅप क्लोजर उच्च दर्जाच्या प्लास्टिकपासून तयार केले जातात. यासाठी जर्मनी, जपान, इटली तसेच भारतातील अत्याधुनिक यंत्रसामग्रीचा वापर केला जातो. गुणवत्तेच्या बाबतीत कोणतीही तडजोड न करता ग्राहकांचा विश्वास संपादन करण्यात कंपनी यशस्वी ठरली आहे.

**पर्यावरणपूरक दृष्टिकोन**

औद्योगिक प्रगतीसोबतच पर्यावरणीय जबाबदारी जपत कंपनीने ५ मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प उभारला असून, त्यामुळे विद्युत खर्चात लक्षणीय बचत झाली आहे. गुणवत्ता, तांत्रिक प्रगती आणि सामाजिक बांधिलकी ही कंपनीची प्रमुख मूल्ये आहेत.

**भव्य कार्यक्षेत्र आणि नामांकित ग्राहक**

आज कंपनीचे कामकाज सुमारे ३३ हजार चौरस मीटर एवढ्या भव्य परिसरात चालते. आयआरसीटीसी (इंडियन रेल्वे), रिलायन्स कॅम्पा कोला, पार्ले बेली, पतंजली, टाटा वॉटर, सनरीच यांसारख्या नामांकित कंपन्या बाई-काकाजी पॉलिमर्स प्रा. लि. च्या ग्राहकांमध्ये आहेत, याचा कंपनीला विशेष अभिमान आहे. या यशस्वी वाटचालीत साडेतीनशेहून अधिक कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमांचे मोलाचे योगदान लाभले आहे.

**आयपीओपर्यंतची ऐतिहासिक झेप**

बाई-काकाजी पॉलिमर्स प्रा. लि. ने औद्योगिक क्षेत्रात आयपीओपर्यंत यशस्वी मजल मारली आहे. पहिल्या टप्प्यात १०५ कोटी रुपयांची शेअर विक्री करून आर्थिक गुंतवणूकदारांचा विश्वास संपादन करण्यात कंपनी यशस्वी ठरली आहे.कंपनीचा आयपीओ शेअर बाजारात दि. २३ ते २६ डिसेंबर २०२५ या कालावधीत खुला होता, तर ३१ डिसेंबर २०२५ रोजी कंपनीची यशस्वी लिस्टिंग होत आहे, ही लातूर जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे.

**भविष्याकडे आशावादी वाटचाल**

भविष्यात याहून अधिक प्रगती साधत, गुंतवणूकदारांचा विश्वास कायम ठेवून उद्योगसमूहाची यशस्वी वाटचाल सुरू ठेवण्याचा निर्धार बाई-काकाजी पॉलिमर्स प्रा. लि. ने व्यक्त केला आहे.

## राज प्रतिष्ठानच्या वतीने क्षयरुग्णांना फूड बास्केटचे वाटप



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २९ डिसेंबर :** प्रधानमंत्री टी बी मुक्त भारत अभियान मोहिमे अंतर्गत राज प्रतिष्ठानच्या वतीने ५० क्षयरुग्णाना सोमवारी (दि.२९) फूड बास्केट किट वाटप करण्यात आले.

येथील जिल्हा आरोग्य प्रशिक्षण केंद्रात संपन्न झालेल्या या कार्यक्रमाच्या अद्यक्षस्थानी आरोग्य उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड होत्या. आयएमए लातूरचे अध्यक्ष डॉ. अभय कदम, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सुमित्रा तांबारे, जिल्हा प्रशिक्षण केंद्राचे अधिकारी डॉ. बाळासाहेब जाधव, डॉ.अविनाश देशमुख, राज प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते डॉ. हर्षवर्धन राऊत आदिंची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. गायकवाड यांनी यांनी राज प्रतिष्ठानच्या कार्याचे व सामाजिक बांधिलकीचे कौतूक केले. डॉ. ताबारे यांनी क्षयरुग्णांनी घ्यावयाच्या काळजीबद्दल मार्गदर्शन केले. डॉ. अभय कदम यांनी प्रतिष्ठानच्या उपक्रमाचे कौतूक करीत क्षयरुग्णांना फुड बास्केट देण्यासाठी समाजातील दानशूर लोकांनी योगदान द्यावे असे आवाहन केले. प्रास्ताविक व सुत्रसंचालन आभार प्रदर्शन डॉ. बाळासाहेब जाधव यांनी केले. आभार डॉ. हर्षवर्धन राऊत यांनी मानले. कार्यक्रम यशस्वितेसाठी जिल्हा क्षयरोग केंद्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यानी परिश्रम घेतले.